सुंदर वासीलिसा

रशियन
परीकथा



सुंदर वासीलिसा

रशियन परीकथा

रादुगा प्रकाशन
मॉस्को

लोकवाङ्मय गृह प्रा.लि.
मुंबई

सुंदर वासीलिसा

खूप खूप वर्षांपूर्वी एका राज्यात एका छोटचा झोपडीत रहात होती म्हातारा-म्हातारी आणि त्यांची मुलगी वासीलिसा. त्यांचे आयुष्य छान सुखाचे चालले होते, पण एकदा त्यांच्यावर दुःख कोसळले. आई खूप आजारी पडली. आपले मरण जवळ आल्याचे तिला जाणवले. तिने छोटचा वासीलिसाला जवळ बोलाविले आणि एक पिटुकली बाहुली दिली.

"ऐक मुली," म्हातारी म्हणाली, "ह्या बाहुलीला जपून ठेव आणि कुण्णा कुण्णाला दाखवू नको. जर तुझ्यावर काही संकट आलं तर तिला थोडं खायला दे आणि तिला सल्ला विचार. बाहुली खाईल आणि तुझ्या संकटाचं निवारण करायला तुला मदत करील, मुली."

आईने वासीलिसाची पापी घेतली आणि ती मरण पावली.

म्हाताऱ्याने काही काळ शोक केला, पण नंतर दुसऱ्या बाईशी लग्न केले. वासीलिसाला आई देण्याचा त्याचा इरादा होता, पण त्याऐवजी त्याने तिला दुष्ट सावत्र आई दिली.

सावत्र आईला दोन मुली होत्या: दुष्ट, मूर्ख, अतिचोखंदळ. सावत्र आई त्या दोघींवर प्रेम करायची, त्यांचे लाड करायची, पण वासीलिसाला मात्र सतत छळायची. वासीलिसाचे जिणे अवघड झाले. सावत्र आई आणि सावत्र बहिणी तिला सतत टोचून बोलायच्या, तिची उणीदुणी काढायच्या, तिच्यावर कामाचे भारे लादायच्या. अतिकष्टांपायी वासीलिसा हडकुळी बनावी, उन्हा-वाऱ्यात काळी पडावी, अशी त्यांची इच्छा होती. सबंध दिवसभर सारखे ऐकू यायचे: "वासीलिसा, वास्का, वासीलिस्का! जेवण शिजव, झोपडी झाडून काढ, सर्पण आण, गायींचं दूध काढ, झटपट काम

कर, हसऱ्या चेहऱ्यानं वावर!"

बिचारी वासीलिसा सगळे करतेय, सर्वांचे समाधान करतेय, सगळ कामे पार पाडतेय. आणि दर दिवसागणिक वासीलिसा अधिक सुंदर बनतेय रूपवान सुंदरी! तिच्या सौंदर्याचे वर्णन परीकथेत करणे अवघड, लेखणी चितारणे अशक्य. ती बाहुली वासीलिसाला सगळ्या बाबतीत मदत करतेय

भल्या पहाटे वासीलिसा दूध काढते, मग कोठीघरात स्वतःला बं करून घेते आणि बाहुलीला दूध पाजून म्हणते:

"पी दूध माझ्या छकुली आणि ऐक माझं दुःख."

बाहुली दूध पिते, वासीलिसाचे सांत्वन करते आणि तिची सर्व का पार पाडते. वासीलिसा गारव्याच्या ठिकाणी बसून फुले माळतेय आणि तोव तिच्यासाठी भाजीपाल्याच्या वाफ्यांमधले तण उपटून झाले, पाणी भरू झाले, चुलाणा पेटविण्यात आला आणि कोबीला पाणी घालण्यात आले

शिवाय उन्हात कांती करपू नये म्ह णून बाहुली औषधी मुळी वासी लिसाला दाखविते. आणि वासीलिस पूर्वीपेक्षाही जास्त सुंदर दिसू लागते

एकदा वडील घरापासून खूप काळासाठी दूर प्रवासाला गेले.

सावत्र आई मुलींसह झोपडीत बसून होती. खिडक्यांबाहेर मिट्ट काळोख, पाऊस कोसळतोय, वाऱ्याचा घूं घूं आवाज, शरदाच्या मोसमातले शेवटचे दिवस. झोपडीभोवती दाट जंगल पसरलेले आणि जंगलात राहतेय चेटकीण बाबा-यागा*, कोंबडीची पिल्ले गट्ट करावी त्याप्रमाणे माणसांना गट्ट करतेय.

---

* रशियन परीकथांमधील चेटकिणीची प्रसिद्ध व्यक्तिरेखा – अनु.

सावत्र आईने मुलींवर कामे सोपविली : एकीला विणकामाला बसविले, दुसरीला पायमोजे बनवायला सांगितले आणि वासीलिसाला सूत कातायची आज्ञा केली. मग तिने घरातील सर्व दिवे मालवले, मुली जेथे काम करीत होत्या तेथे फक्त एक जळता ढलपा ठेवला आणि स्वतः झोपी गेली.

भोजाच्या झाडाचा तो ढलपा काही काळपर्यंत तडतडत पेटत राहिला आणि विझला.

"आता काय करायचं?" सावत्र आईच्या मुली म्हणाल्या. "सबंध घरात अजिबात उजेड नाही, पण काम तर केलं पाहिजे. विस्तवासाठी बाबा-यागाकडं जाणं आलं!"

"मी नाही जाणार," थोरली मुलगी म्हणाली. "मी लेस विणतेयं, माझ्या सुईचा उजेड मला पुरेसा आहे."

"आणि मी पण जाणार नाही," मधली मुलगी म्हणाली, "मी पायमोजे विणतेय आणि माझ्या दोन सुयांची चकचक मला पुरेशी आहे."

दोघीही एकदम ओरडल्या :

"वासीलिसानं, वासीलिसानं विस्तव आणायला गेलं पाहिजे! जा बघू बाबा-यागाकडं!" आणि त्यांनी वासीलिसाला झोपडीबाहेर ढकलून दिले.

भोवती काळोखी रात्र, दाट जंगल, वारा भणभणतोय. वासीलिसाला रडू कोसळले. तिने खिशातून छोटी बाहुली बाहेर काढली. "माझ्या लाडक्या बाहुली, विस्तव आणण्यासाठी बाबा-यागाकडं मला धाडताहेत. बाबा-यागा माणसांना चघळून खाते, त्यांची हाडंसुद्धा कडाकडा फोडते."

"घाबरू नको," बाहुली म्हणाली. "मी असताना तुला काहीही अपाय होणार नाही! जोवर मी तुझ्याबरोबर आहे, तोवर वाईट घडणार नाही."

"बाहुली, तुझ्या भल्या शब्दांबद्दल आभार," वासीलिसा म्हणाली आणि वाट चालू लागली.

भोवती जंगलाची भिंत उभी, आकाशात तारे चमकत नव्हते, चंद्राची कोर उगवली नव्हती.

वासीलिसा थरथरत चालत होती, तिने बाहुलीला छातीशी घट्ट आवळून धरले होते.

अचानक जवळून एक घोडेस्वार दौडत गेला. त्याचा पोषाख शुभ्र



पांढरा, त्याचा घोडाही शुभ्र पांढरा, घोडयावरचे खोगीर चंदेरी. पहाट फुटत होती. वासीलिसा चालत होती, झाडांच्या मुळांना आणि खुंटांना ठेच-काळत होती. तिच्या वेणीवर दवाचा थर बसला, तिचे हात थंडीने गोठले.

अचानक दुसरा घोडेस्वार दौडत गेला – त्याचा पोषाख लाल, त्याचा घोडा लाल, घोडयावरचे खोगीर लाल.

सूर्य उगवला. त्याने वासीलिसाला प्रेमाने कुरवाळले, तिच्या अंगात ऊब आणली, तिच्या वेणीवरचे दव वाळविले.

वासीलिसा सबंध दिवसभर चालत होती. संध्याकाळच्या सुमाराला ती एका मोकळ्या मैदानात आली.

बघते – एक झोपडी उभी. झोपडीभोवतीचे कुंपण माणसांच्या हाडांचे. कुंपणाच्या टोकांवर माणसांच्या कवटया लटकावलेल्या. फाटकाऐवजी माणसां-च्या पायांची हाडे, कडयांऐवजी माणसांच्या हातांची हाडे, कुलूपाऐवजी धारदार दात.

वासीलिसाची बोबडी वळली. ती पुतळ्याप्रमाणे जागच्याजागी खिळून

उभी राहिली. अचानक एक घोडेस्वार दौडत आला. त्याचा पोषाख काळा, त्याचा घोडा काळा, घोड्यावरचे खोगीर काळे. फाटकापर्यंत तो दौडत गेला आणि अदृश्य झाला. जणू हवेत विरून गेला.

रात्र पडली. कुंपणावरच्या सगळ्या कवट्यांचे डोळे चमकू लागले. मोकळ्या मैदानात दिवसासारखा उजेड पडला.

वासीलिसा भीतीपायी थरथर कापत होती. तिचे पाय पुढे सरकत नव्हते, त्या भयानक जागेपासून रेसभरही हलत नव्हते.

अचानक वासीलिसाला जाणवले – जमीन थरथरतेय, पायांखाली डळमळतेय. बाबा-यागा उखळामधून उडत येत होती, हातातील मुसळ चाबकाप्रमाणे फिरवत होती, झाडूने खुणा पुसून टाकत होती. फाटकापाशी येताच ती एकदम किंचाळू लागली:

"फू-फू-फू, रशियन माणसाचा वास येतोय! इथं कोण आहे?"

वासीलिसाने बाबा-यागाला खाली झुकून नमस्कार केला.

"मी, वासीलिसा आहे, आजी. माझ्या सावत्र बहिणींनी विस्तवासाठी

मला तुझ्याकडं धाडलंय."

"अस्सं," बाबा-यागा म्हणाली. "तुझी सावत्र आई माझ्या नात्याची. ठीक आहे! माझ्याकडं रहा, काम कर, मग पुढं ठरवू काय करायचं ते!"

मग ती मोठ्या आवाजात किंचाळली:

"ए भक्कम कोयंड्यानो, उघडा! माझ्या रुंद फाटका, सताड उघडा!"

फाटक सताड उघडले, बाबा-यागा आत गेली, वासीलिसा तिच्या पाठोपाठ गेली. फाटकापाशी भोजाचे झाड होते. त्याच्या फांद्यांनी वासीलिसा-ला फटकारायचा प्रयत्न केला.

"भोजाच्या झाडा. मुलीला मारू नको! मी तिला आत आणलंय," बाबा-यागा म्हणाली.

दारापाशी एक कुत्रा पहुडला होता. तो वासीलिसाला चावायला धावला.

"तिला धक्का लावू नको, मी तिला घेऊन आलेय," बाबा-यागा म्हणाली.

पडवीत एक गुरगुरणारा बोका वासीलिसाला बोचकारायला धावला.

"गुरगुरणाऱ्या बोक्या, तिला बोचकारू नको. मी तिला आणलंय," बाबा-यागा म्हणाली.

"बघितलंस वासीलिसा, माझ्यापासून पळून जाणं सोपं नाही: बोका बोचकारतो, कुत्रा चावतो, भोजाचं झाडं झोडपून काढतं, फाटक उघडत नाही." बाबा-यागा झोपडीत शिरली आणि बाकावर ऐसपैस पसरली.

"ए काळ्या भुवयांच्या पोरी, खायला दे!"

काळ्या भुवयांची पोरगी धावत आली आणि बाबा-यागाला खायला घालू लागली: कढईभर बोर्श*, बादलीभर दूध, वीस कोंबडीची पिले, चाळीस बदके, अर्धा बैल, दोन आख्खी पिरोगी**; शिवाय क्वास*** मधाची दारू, घरात बनवलेली बीयर किती प्यायली त्याचा हिशेबच नाही.

---

* एक खास रशियन सार – अनु.

** रशियन गोड पक्वान्न – अनु.

*** काळा पाव आंबवून बनवलेले थंड पेय – अनु.

बाबा-यागानं ह्या सगळ्या पदार्थांना फस्त केले, पण वासीलिसाला मात्र पावाचा एक लहान तुकडा दिला.

"ऐक," बाबा-यागा म्हणाली, "वासीलिसा, ते धान्याचं पोतं घे, दाणे निवड, काळे खडे काढून टाक. जर हे काम पार पाडलं नाहीस, तर तुला खाऊन टाकीन."

आणि बाबा-यागा जोरजोराने घोरू लागली.

वासीलिसाने पावाचा लहान तुकडा स्वतःच्या बाहुलीसमोर ठेवला आणि ती म्हणाली:

"माझ्या छकुली, माझ्या बाहुली, पावाचा तुकडा खा आणि माझं दुःख ऐक! बाबा-यागानं मला फार अवघड काम दिलंय. जर मी ते पार पाडलं नाही, तर ती मला खाऊन टाकील अशी धमकी घालतेय ..."

बाहुली उत्तरली:

"तू रडू नको, दुःख करू नको, त्यापेक्षा बिनधास्त झोपून जा! संध्याकाळपेक्षा सकाळ जास्त शहाणी!"

वासीलिसा ज्या क्षणी झोपली, त्या क्षणी बाहुली ओरडली:

"पक्ष्यांनो-पाखरांनो, चिमण्यांनो-कबूतरांनो, लौकर लौकर इकडे या, वासीलिसाला संकटातून वाचवा!"

ताबडतोब पक्ष्यांचे कळपच्या कळप उडत आले, धान्य निवडू लागले, खडे वेचू लागले. निवडलेले धान्य पोत्यात, खडे फेकले कोपऱ्यात. त्यांनी धान्यातील सगळा कचरा निवडून काढला.

त्यांनी हे काम पुरे केले न केले, तोच फाटकाजवळून पांढऱ्या पोषाखातील पांढऱ्या घोड्यावरचा स्वार दौडत गेला. पहाट फुटली.

बाबा-यागा झोपेतून जागी झाली. वासीलिसाला तिने विचारले:

"काय, काम पूर्ण केलंस?"

"सगळं तयार आहे, आजी."

बाबा-यागा चिडली, पण बोलण्यासारखे काहीच नव्हते.

"हूं," ती फूत्कारली, "मी आता शिकारीसाठी उड्डाण करते, तू ते पोतं घे. त्यात वाटाणे आणि पॉपीच्या बिया एकत्र मिसळलेल्या आहेत. वाटाणे आणि बिया वेगवेगळे कर, त्यांचे दोन ढीग लाव. जर हे नाही केलंस, तर मी तुला खाईन!"

बाबा-यागा अंगणात गेली आणि तिने शीळ वाजविली. मुसळासकट उखळ तिच्यापाशी उडत आले.

तांबडा घोडेस्वार दौडत गेला. सूर्य उगवला.

बाबा-यागा उखळात बसली, अंगणातून बाहेर उडत गेली. मुसळाला ती चाबकाप्रमाणे फिरवत होती, रस्त्यावरच्या खुणा झाडूने पुसून टाकत होती.

वासीलिसाने पावाचा तुकडा बाहुलीला खाऊ घातला आणि म्हटले:

"माझ्या छकुली, माझ्या बाहुली, माझी कर करुणा! मला कर मदत!"

बाहुली खणखणीत आवाजात ओरडली:

"धावत या उंदरांनो – शेतांमधल्या, घरांमधल्या, कोठ्यांमधल्या!"

उंदरांच्या झुंडीच्या झुंडी धावत आल्या. एका तासात उंदरांनी कामाचा फडशा पाडला.

संध्याकाळच्या सुमाराला काळ्या भुवयांच्या पोरीने टेबलावर जेवणाची मांडामांड केली आणि बाबा-यागाची ती वाट पाहू लागली. फाटकाजवळून काळा घोडेस्वार दौडत गेला. रात्र पडली. कवट्यांचे डोळे पेटले. झाडे कडकडू लागली, पाने सळसळू लागली. बाबा-यागा येत होती, हडकुळी थेरडी येत होती.

"काय ग वासीलिसा? काम पुरं केलंस?"

"सगळं तयार, आजी."

बाबा-यागा खूप संतापली, पण बोलण्यासारखे काहीच नव्हते.

"जर काम संपलंय तर जा झोपायला, मी पण आत्ता निजते."

वासीलिसा चुलाण्यापाशी गेली. तेवढ्यात बाबा-यागाचे बोलणे तिने ऐकले:

"ए काळ्या भुवयांच्या पोरी, चुलाणा धडाडून पेटव, आगीचा जाळ कर, मी झोपून उठले म्हणजे वासीलिसाला भाजते."

बाबा-यागा बाकावर निजली, तिने ओठ फडताळावर ठेवले, पावलाने स्वतःला झाकून घेतले. तिच्या घोरण्याने सबंध जंगल दणाणत होते.

वासीलिसाला रडू कोसळले. तिने बाहुली बाहेर काढली, तिच्यासमोर पावाचा तुकडा ठेवला.

माझ्या छकुला, माझ्या बाहुली, खा पाव, एक माझं दुःख. बाबा यागा मला भाजून खाणार आहे."

बाहुलीने वासीलिसाला सगळे शिकविले: काय करायचे, कसे वागायचे संकटावर मात कशी करायची.

वासीलिसाने काळ्या भुवयांच्या पोरीसमोर सपशेल लोटांगण घातले.

"काळ्या भुवयांच्या पोरी, मला मदत कर! तू लाकडं पेटवायच्या आधी त्यांच्यावर पाणी शिंपड. त्याबद्दल हा घे माझा रेशमी रुमाल."

काळ्या भुवयांची पोरगी उत्तरली:

"ठीक आहे लाडके, मी तुला मदत करते. चुलाणा पेटवायला खूप वेळ लावीन, बाबा-यागाला गाढ झोप लागावी म्हणून तिच्या पायांचे तळवे खाजवत बसेन. तोवर तू पळून जा, वासीलिसा!"

"मला घोडेस्वार पकडणार नाहीत? परत माघारी आणणार नाहीत?"

"नाही," काळ्या भुवयांची पोरगी म्हणाली. "पांढरा घोडेस्वार म्हणजे तेजस्वी दिवस, तांबडा घोडेस्वार म्हणजे सोनेरी सूर्य, काळा घोडेस्वार म्हणजे अंधारी रात्र. ते तुझ्या केसाला धक्का लावणार नाहीत."

वासीलिसा पडवीत धावली. गुरगुरणारा बोका तिला ओरबाडायला धावला. वासीलिसाने त्याच्यासमोर पिरोगचा तुकडा फेकला. त्याने तिला धक्का लावला नाही.

वासीलिसा बाहेर धावत आली. कुत्रा एकदम उठला, आणि तिला चावायला त्याने झेपेचा पवित्रा घेतला. वासीलिसाने त्याच्यासमोर पावाचा तुकडा फेकला. कुत्र्याने तिला जाऊ दिले.

वासीलिसा अंगणातून धावत निघाली. भोजाचे झाड तिला झोडपून काढायच्या बेतात होते. पण तिने झाडाला फीत बांधली आणि झाडाने तिला सोडले.

फाटक खाडदिशी बंद व्हायच्या बेतात होते, पण वासीलिसाने त्याच्या बिजागरींना वंगण माखले. फाटक तिच्यासाठी सताड उघडले.

वासीलिसा काळ्या जंगलामधून धावत सुटली. तेवढ्यात काळा घोडेस्वार दौडत गेला. जंगलात प्रचंड काळोख दाटला. विस्तवाशिवाय घरी कसे जायचे? विस्तवाशिवाय झोपडीत पाऊल कसे टाकायचे? सावत्र आईने जिवे मारले असते. पण बाहुलीने वासीलिसाला काय करायचे ते सांगितले.

वासीलिसाने कुंपणावरची एक कवटी घेतली आणि काठीच्या टोकावर धरली.

अंधाऱ्या जंगलातून वासीलिसा पळत होती. कवटीचे डोळे पेटले. अंधाऱ्या रात्रीत दिवसाप्रमाणे उजेड पडला.

बाबा-यागा जागी झाली, तिने अंगाला आळोखेपिळोखे दिले. वासीलिसा नाहीशी झालेली तिच्या ध्यानात आले, तेव्हा ती पडवीत धावली.

"गुरगुरणाऱ्या बोक्या, मुलगी तुझ्याजवळून धावत गेली तेव्हा तू तिला बोचकारलंस?"

गुरगुरणारा बोका उत्तरला:

"बाबा-यागा, मी तुझ्याकडं दहा वर्षं सेवा करतोय, पण तू मला एक तुकडा खायला घातला नाहीस कधी!.. म्हणून मी तिला सोडलं!"

बाबा-यागा अंगणात धावली.

"माझ्या विश्वासू कुत्र्या, त्या हट्टी मुलीला तू चावलास?"

कुत्रा उत्तरला :

"मी तुझी अनेक वर्षं सेवा करतोय, तू मला हाडसुद्धा दिलं नाहीस, पण तिनं मला पावाचा तुकडा दिला. म्हणून मी तिला सोडलं."

यागा संतापून ओरडली :

"भोज़ा, माझ्या भोजा, तू त्या वासीलिसाचे डोळे फोडलेस?"

भोज उत्तरला :

"मी तुझ्या अंगणात दहा वर्षं वाढतोय, पण तू कधी माझ्या फांद्यांना साधी सुतळी बांधली नाहीस. तिनं मला फीत बांधली. म्हणून मी तिला सोडलं!"

बाबा-यागा फाटकापाशी धावली.

"माझ्या भक्कम फाटका, त्या हट्टी मुलीला तुम्ही अडवून ठेवलंत?"

फाटक उत्तरले :

"आम्ही तुझी खूप सेवा केली, पण तू आमच्या बिजागरींवर पाणीसुद्धा ओतलं नाहीस. तिनं आम्हाला वंगण लावलं. म्हणून तिला सोडून दिलं."

बाबा-यागा खूप खूप चिडली. ती कुत्र्याला मारू लागली, बोक्याला झोडपू लागली, फाटकाला मोडू लागली, भोजाला तोडू लागली. ह्या सगळ्या भानगडीत ती एवढी दमली, की वासीलिसाचा पाठलाग करण्याचा विचार तिने सोडून दिला.

वासीलिसा घरी पळत आली.

बघते – घरात उजेड नाही. तिच्या सावत्र बहिणी बाहेर धावल्या, वासीलिसावर ओरडू लागल्या, शिव्या घालू लागल्या.

"विस्तव आणायला तुला एवढा वेळ का लागला? घरात एकही दिवा पेटत नाही. खूप वेळा गारगोटचा घासून ठिणगी पाडायचा प्रयत्न केला, पण व्यर्थ! शेजाऱ्याकडून एक दिवा आणला, पण झोपडीत आणताच तो विझला. कदाचित तुझा दिवा पेटेल."

त्यांनी कवटी झोपडीत नेली. कवटीचे डोळे सावत्र आईवर आणि तिच्या दोन्ही मुलींवर रोखले गेले व एकदम आगीप्रमाणे ते पेटले. त्या तिघीजणी लपू लागल्या, पण त्या कुठेही लपल्या तरी कवटीचे डोळे त्यांचा पाठलाग करू लागले.

सकाळपर्यंत कवटीने त्या तिघींचा जाळून अक्षरशः कोळसा केला



पण वासीलिसाला मात्र मुळीच धक्का लावला नाही.

वासीलिसाने कवटीला जमिनीत पुरले. त्या जागी लाल गुलाबाचे रोपटे उगवले.

त्या घरात पुढे रहायची वासीलिसाची इच्छा नव्हती. ती शहरात गेली व एका म्हातारीपाशी राहू लागली.

एकदा ती म्हातारीला म्हणाली:

"आजी, कामाशिवाय नुसतं बसून रहायचा मला कंटाळा आलाय. माझ्यासाठी सर्वात उत्तम ताग विकत आण."

आजीने तिला ताग विकत आणून दिला. वासीलिसा तागाचा धागा काढू लागली. ती भराभर सूत कातत होती; चरख्याचे चाक गरगरत होते, सोनेरी केसाप्रमाणे सरळ, बारीक धागा निघत होता. वासीलिसा कापड विणू लागली. तिने एवढे तलम कापड विणले की, सुताप्रमाणे सुईच्या भोकातून ते ओवणे शक्य होते. तिने कापडाला हिमाप्रमाणे पांढरेशुभ्र बनविले.

"घे, आजी," वासीलिसा म्हणाली, "हे कापड विक आणि पैसे स्वत:ला घे."

आजीने कापडावर नजर टाकली आणि तिच्या तोंडून चीत्कार उमटला.

"नाही, मुली, असं कापड फक्त झारपुत्राशिवाय दुसऱ्या कुणालाही शोभणार नाही. मी राजवाड्यावर त्याला हे कापड नेऊन देते."

झारपुत्राने ते कापड पाहिले. तो चकित झाला.

"तुला ह्या कापडाच्या मोबदल्यात काय पाहिजे?" त्याने म्हातारीला विचारले.

"ह्या कापडाला मोल नाही. मी तुला भेट म्हणून द्यायला आणलंय."

झारपुत्राने म्हातारीचे आभार मानले व भरपूर भेटी देऊन तिची बोळवण केली. त्या कापडाचे सदरे शिवण्याची झारपुत्राची इच्छा होती, पण ते काम कुणीही पत्करेना. काम खूप नाजुक! झारपुत्राने म्हातारीला बोलावून घेतले आणि तो म्हणाला:

"असं सुरेख कापड तू विणू शकलीस, आता तसेच सुरेख सदरे शिवून दे."

म्हातारी उत्तरली:

"झारपुत्रा, मी नाही सूत कातलं, मी नाही कापड विणलं. हे काम

केलं त्या वासीलिसानं!"

"तर मग तिला सांग सदरे शिवायला!"

म्हातारी घरी परतली, तिने वासीलिसाला सर्व हकीकत सांगितली ासीलिसाने सदरे शिवले, त्यांच्यावर रेशमाचा कशीदा काढला, गोल टप्पो ोती जडवले. म्हातारी सदरे घेऊन राजवाड्यावर गेली.

वासीलिसा खिडकीपाशी बसून कशीदाकाम करू लागली. अचान तिला दिसले – झारचे सेवक धावत येत होते.

"तुला झारपुत्र राजवाड्यावर बोलावतोय."

वासीलिसा राजवाड्यावर गेली. झारपुत्राने ज्या क्षणी सुंदर वासीलिस ाहिली, त्या क्षणी तो घायाळ झाला.

"तुझा विरह मला सहन होणार नाही," तो वासीलिसाला म्हणाला तू माझी पत्नी हो."

त्याने तिचे शुभ्र हात आपल्या हाती घेतले, तिला स्वतःपाशी बसविले ांचे धूमधडाक्यात लग्न झाले.

लौकरच वासीलिसाचा बाप परतला आणि मुलीपाशी राहू लागला ासीलिसाने म्हातारीला सोबत घेतले, बाहुलीला सतत खिशात बाळगले शा रीतीने ती जगली, आज जगताहेत आणि आपण त्यांच्याकडे पाहुण ्हणून केव्हा जातो ह्याची वाट पाहताहेत.

राजपुत्र इवान आणि भुरा लांडगा

कोणे एके काळी बेरेन्देई नांवाचा एक झार रहात होता. त्याला तीन मुलगे होते. सर्वात धाकटचा मुलाचे नांव होते इवान.

झारची सुंदर बाग होती. त्या बागेत सफरचंदाचे एक झाड होते आणि त्या झाडावर सोनेरी सफरचंदे येत.

एके दिवशी झारच्या लक्षात आले की, त्याची सोनेरी सफरचंदे कुणीतरी चोरीत होते. झारला ह्या गोष्टीचे खूप दु:ख झाले. त्याने बागेत पहारेकरी पाठविले, पण चोराला पकडणे त्यांना शक्य झाले नाही.

झार एवढा दु:खी बनला की, अन्न-पाण्याला तो स्पर्श करीना. त्याचे मुलगे त्याला आनंदी करण्याचा प्रयत्न करू लागले. "बाबा, तुम्ही कष्टी होऊ नका," ते म्हणाले, "बागेवर खुद्द आम्ही पहारा करू."

सर्वात मोठा मुलगा म्हणाला: "आज पहारा देण्याची माझी पाळी!"

आणि तो बागेत गेला. संध्याकाळभर तो फिरत राहिला, पण त्याला कुणीही दिसले नाही. म्हणून त्याने मऊ गवतावर अंग झोकून दिले व तो झोपी गेला.

सकाळी झारने त्याला विचारले: "काही चांगली बातमी माझ्यासाठी आणलीस का? तुला चोराचा शोध लागला का?"

"नाही बाबा, सबंध रात्रभर मी माझे डोळे मिटले नव्हते, पण मला कुणीही दिसलं नाही."

दुसऱ्या रात्री मधला मुलगा बागेत पहारा करायला गेला व तोसुद्धा झोपला. त्यानंतरच्या सकाळी तो म्हणाला की, त्याने चोर पाहिला नव्हता.

आता बागेत पहारा करण्याची सर्वात धाकट्या मुलाची पाळी आली. राजपुत्र इवान जेव्हा वडिलांच्या बागेत पहारा करायला गेला तेव्हा तो नुसता खाली बसलासुद्धा नाही, मग झोपणे तर दूरच. जर त्याला पेंगुळल्यासारखे वाटले तर दंवाने तो आपला चेहरा धुवायचा आणि तात्काळ खडखडीत जागा व्हायचा.

ऐन मध्यरात्री त्याला बागेत एकदम प्रकाश चमकलेला दिसला. तो प्रकाश अधिकाधिक तेजस्वी होत गेला आणि त्याने भोवतालचा परिसर उजळून काढला. एक अग्नि-पक्षी सफरचंदाच्या झाडावर बसून सोनेरी सफरचं-दांना चोच मारीत होता.

राजपुत्र इवान हळूच झाडापर्यंत सरपटत गेला आणि त्याने पक्ष्याची शेपूट धरली. पण अग्नि-पक्ष्याने जोराने फडफड करून स्वतःला मुक्त केले आणि तो उडून गेला. मात्र त्याच्या शेपटीचे एक पीस राजपुत्राच्या हातात राहिले.

दुसऱ्या दिवशी सकाळी राज-पुत्र इवान वडिलांकडे गेला.

"काय मुला, चोराला पक-डलंस?" झारने विचारले.

"बाबा, मी चोराला पकडलं नाही," राजपुत्र इवान म्हणाला, "पण चोर कोण आहे ह्याचा मला शोध लागला. पहा, तुमच्या संग्रही ठेवण्यासाठी त्यानं हे पीस पाठवलंय. अग्नि-पक्षी चोर आहे."

झारने ते पीस घेतले. तेव्हा-पासून त्याच्या चित्तवृत्ती उल्हसित बन-ल्या व तो पुन्हा व्यवस्थित खाऊ-पिऊ लागला. पण एके दिवशी त्याला अग्निपक्ष्याच्या विचाराने घेरले. आपल्या मुलांना बोलावून तो म्हणाला:

विशाल जग बघायला बाहेर पडावं, अशी माझी इच्छा आहे. कदाचि तुम्हाला अग्नि-पक्षी भेटेल!"

मुलांनी वडिलांना वाकून नमस्कार केले, आपल्या विश्वासू घोड्यांव त्यांनी खोगीरे चढविली आणि ते प्रवासाला निघाले. सर्वात मोठ्या मुला एक रस्ता धरला, मधल्याने दुसरा मार्ग पकडला आणि राजपुत्र इवान तिस वाटेने निघाला.

राजपुत्र इवानने किती दूरपर्यंत प्रवास केला हे सांगणे कठीण आहे, प एका तळपत्या दुपारी तो एवढा दमला की, घोड्यावरून खाली उतर विश्रांतीसाठी तो निजला.

तो जागा झाला तेव्हा त्याचा घोडा तेथून नाहीसा झाला होता. म्हणून त घोड्याच्या शोधावर निघाला. खूप खूप चालल्यानंतर सरतेशेवटी त्या आपल्या घोड्याचे अवशेष आढळले. फक्त हाडे पडली होती – चाटूनपुस स्वच्छ केलेली!

राजपुत्र इवान प्रचंड संकटात पडला. घोड्याशिवाय तो पुढे प्रवास क करणार?

"ठीक आहे, आलीया भोगा सादर झालं पाहिजे," तो स्वतः म्हणाला.

आणि तो पायी चालत निघाला. अगदी खूप दमून जाईपर्यंत तो चा राहिला. नंतर कष्टी आणि हताश मनःस्थितीत तो मऊ गवतावर बस अचानक कसा कुणास ठाऊक, पण एक भुरा लांडगा तेथे धावत आ

"राजपुत्र इवान, तू असा कष्टी आणि हताश बनून का बसला आहेस भुऱ्या लांडग्याने विचारले.

"भुऱ्या लांडग्या, दुःखी होऊ नको तर काय करू? माझा विश्व घोडा मी गमावला!"

"राजपुत्र इवान, तुझा घोडा मी खाल्ला! पण मला आता तुझ्याब वाईट वाटतं. घरापासून इतक्या दूर तू काय करतो आहेस आणि कुठं निघा आहेस?"

"अग्नि-पक्ष्याचा शोध घेण्यासाठी माझ्या वडलांनी मला विशाल ज पाठवलंय."

सुद्धा अग्नि-पक्ष्यापर्यंत तू पोहोचू शकला नसतास. तो पक्षी कुठं राहतो हे फक्त मला एकट्यालाच ठाऊक आहे. तर असो – ज्याअर्थी मी तुझा घोडा खाल्ला, तर त्याची भरपाई म्हणून मी तुझा खरा आणि निष्ठावंत सेवक बनतो. माझ्या पाठीवर बैस आणि घट्ट पकड!"

राजपुत्र इवान भुऱ्या लांडग्याच्या पाठीवर बसला आणि भुरा लांडगा विजेच्या वेगाने धावत निघाला. हिरवी जंगले पसार झाली, निळी सरोवरे चमकून गेली आणि सरतेशेवटी ते एका किल्ल्यापाशी पोहोचले. त्या किल्ल्याभोवती उंच भिंत होती.

"राजपुत्र इवान, लक्षपूर्वक ऐक," भुरा लांडगा म्हणाला, "आणि मी जे काही सांगतो त्याची आठवण ठेव. त्या भिंतीवरून चढून जा. तू भिण्याचं काही कारण नाही, कारण आपण फार सुदैवी वेळेला इथं आलोय. सगळे पहारेकरी झोपलेले आहेत. मनोऱ्यातल्या दालनात तुला एक गवाक्ष दिसेल, त्या गवाक्षात सोनेरी पिंजरा टांगलेला आहे आणि त्या पिंजऱ्यात अग्नि-पक्षी आहे. पक्ष्याला घे आणि तुझ्या छातीशी त्याला लपव. पण ध्यानात ठेव, त्या पिंजऱ्याला अजिबात स्पर्श करू नकोस!"

राजपुत्र इवान भिंत चढून गेला आणि मनोऱ्यातील दालनामधील गवाक्षात



सोनेरी पिंजरा टांगलेला त्याने पाहिला. पिंजऱ्यात अग्नि-पक्षी होता. त्याने पक्ष्याला बाहेर काढले व आपल्या छातीशी लपविले, पण त्या पिंजऱ्या-वरून त्याची नजर ढळेना. "ओहो, किती सुंदर सोनेरी पिंजरा!" आसावल्या नजरेने तो स्वतःशी म्हणाला. "हा पिंजरा मी इथंच कसा टाकून जाऊ?" आणि तो लांडग्याने दिलेला इशारा विसरला. ज्या क्षणी त्याने पिंजऱ्याला स्पर्श केला त्याच क्षणी सबंध किल्ल्यात एकच हलकल्लोळ माजला – तुताऱ्या वाजू लागल्या, ढोल घुमू लागले, पहारेकरी जागे झाले, त्यांनी राजपुत्र इवानला पकडले आणि झार आफ्रोनसमोर हजर केले.

"तू कोण आहेस आणि कुठून आलास?" झार आफ्रोनने रागाने विचारले.

"मी राजपुत्र इवान, झार बेरेन्देईचा मुलगा."

"छी:! धिक्कार असो तुझा! एक राजपुत्र चोर निघावा म्हणजे काय!"

"पण आमच्या बागेतल्या सफरचंदांची चोरी करण्याची तुमच्या पक्ष्याला तुम्ही मनाई करायला हवी होती!"

"जर तू माझ्यापाशी येऊन मला सगळी खरी हकीकत सरळ सांगितली असतीस, तर तुझ्या वडलांच्या, झार बेरेन्देई यांच्या आदरापोटी मी तुला हा पक्षी भेट म्हणून दिला असता. पण आता तुझ्या घराण्याची दुष्कीर्ती मी चारही दिशांना पसरवणार. अथवा नाही – कदाचित मी तसं करणारही नाही. जर तू माझ्यावर एक अनुग्रह केलास, तर मी तुला क्षमा करीन. एका राज्यात कूस्मान नांवाचा एक झार आहे. त्याच्यापाशी सोनेरी आयाळीचा एक घोडा आहे. मला तो घोडा आणून दे आणि मी तुला अग्नि-पक्षी बक्षीस देईन, शिवाय पिंजराही देईन."

अत्यंत खजिल झालेला राजपुत्र इवान भुऱ्या लांडग्यापाशी परत गेला.

"पिंजऱ्याला स्पर्श करू नको असं मी तुला बजावलं होतं," लांडगा

म्हणाला. "माझ्या इशाऱ्याकडं तू दुर्लक्ष का केलंस?"

"भुऱ्या लांडग्या, मला खूप वाईट वाटतं, कृपया मला क्षमा कर!"

"नुसतं वाईट वाटून काही भलं होत नाही. पण ठीक आहे, बैस परत माझ्या पाठीवर. माझा शब्द मला पाळला पाहिजे."

आणि राजपुत्र इवानला पाठीवर बसवून भुरा लांडगा वेगाने निघाला. किती दूरपर्यंत त्यांनी प्रवास केला हे सांगणे अवघड आहे, पण सोनेरी आयाळीचा घोडा जेथे ठेवलेला होता त्या किल्ल्यापाशी सरतेशेवटी ते जाऊन ठेपले.

"राजपुत्र इवान, भिंत चढून जा, पहारेकरी झोपलेले आहेत. तबेल्यात जाऊन घोडा घे, पण लक्षात ठेव – लगामाला स्पर्श करू नकोस."

राजपुत्र इवान किल्ल्यात चढून गेला. सगळे पहारेकरी गाढ झोपलेले होते. तो तबेल्यात गेला आणि त्याने सोनेरी आयाळीच्या घोड्याला धरले, पण लगामाला स्पर्श करण्याचा मोह त्याला आवरेना. तो लगाम सोन्याचा होता व त्यात मौल्यवान रत्ने जडविलेली होती. अशा घोड्याला तो अगदी लायक लगाम होता.

राजपुत्र इवानने लगामाला स्पर्श करताच किल्ल्यात एकच हलकल्लोळ माजला. शिंगे वाजू लागली, नगारे घुमू लागले, पहारेकरी जागे झाले, त्यांनी राजपुत्र इवानला पकडले व झार कूस्मानसमोर हजर केले.

"तू कोण आहेस आणि कुठून आलास?"

"मी राजपुत्र इवान."

"आणि तू घोडा चोरतोस म्हणजे कमाल आहे! किती मूर्खपणा! सामान्य शेतकरीसुद्धा असलं कृत्य करणार नाही. पण राजपुत्र इवान, माझ्या साठी तू एक काम केलंस तर मी तुला क्षमा करीन. झार दाल्मत ह्याला सुंदरी येलेना नांवाची एक मुलगी आहे. तिला चोरून माझ्याकडं आण. मग मी तुला माझा सोनेरी आयाळीचा घोडा बक्षीस देईन, शिवाय त्याचा लगामही देईन."

राजपुत्र इवान अधिकच खजिल झाला आणि भुऱ्या लांडग्याकडे तो परत गेला.

"राजपुत्र इवान, तू लगामाला हात लावू नकोस असं मी आधीच बजावून सांगितलं होतं," लांडगा म्हणाला. "माझ्या इशाऱ्याकडं दुर्लक्ष का केलंस?"

मला खूप वाईट वाटते भुऱ्या लांडग्या, कृपया क्षमा कर.

"नुसतं वाईट वाटून काही फारसं भलं होणार नाही. पण असो! बैस माझ्या पाठीवर परत!"

आणि राजपुत्र इवानला पाठीवर बसवून भुरा लांडगा वेगाने निघाला. अखेरीस झार दाल्मतच्या राज्यात ते पोहोचले. किल्ल्यातील बागेमध्ये सुंदरी येलेना आपल्या सख्या व दासी यांच्यासमवेत विहार करीत होती.

"यावेळी मी जाईन," भुरा लांडगा म्हणाला. "आपण आलो त्या रस्त्यानं तू परत जा आणि लौकरच मी तुला गाठीन."

म्हणून राजपुत्र इवान आल्या वाटेने परत गेला व भुरा लांडगा भिंतीवरून उडी मारून बागेत आला. झुडुपामागे दडून तो डोकावून पाहू लागला. सुंदरी येलेना आपल्या सख्यांसह आणि दासींसह तेथे फिरत होती. फिरता फिरता येलेना आपल्या सख्या आणि दासींपासून मागे एकटी पडली. ती संधी साधून भुऱ्या लांडग्याने तिला पकडले, आपल्या पाठीवर आडवे टाकले व भिंतीवर उडी मारून त्याने धूम ठोकली.

राजपुत्र इवान आल्या वाटेने परत चालत होता. अचानक भुरा लांडगा त्याला दिसला. लांडग्याच्या पाठीवर सुंदरी येलेना होती. राजपुत्र खूष झाला. "तूसुद्धा माझ्या पाठीवर बैस, घाई कर, नाही तर ते आपल्याला पकडतील!" भुरा लांडगा म्हणाला.

राजपुत्र इवान व सुंदरी येलेना ह्यांना पाठीवर घेऊन भुरा लांडगा वेगाने निघाला. हिरवीगार जंगले मागे पडली, निळी सरोवरे व नद्या पार झाल्या. लांडगा किती काळ धावत होता हे सांगणे अवघड आहे, पण सरतेशेवटी ते झार कूस्मानच्या राज्यात जाऊन पोहोचले.

"राजपुत्र इवान, तू गप्प आणि दुःखी का आहेस?" भुऱ्या लांडग्याने विचारले.

"भुऱ्या लांडग्या, दुःख करू नको तर काय करू? अशा सुंदरीचा वियोग होणार ह्या विचारानं माझ्या काळजाचे तुकडे तुकडे होताहेत. एका घोड्यासाठी सुंदरी येलेना देऊन टाकण्याची कल्पना मला सहन होत नाही."

"अशा सुंदरीला तू देऊन टाकण्याची काही गरज नाही. आपण तिला कुठंतरी लपवून ठेवू, मी स्वतः सुंदरी येलेनाचं रूप घेतो आणि तिच्याऐवजी मलाच तू झारकडं घेऊन जा."

भुऱ्या लांडग्याने एक कोलांटी उडी मारली व जेव्हा त्याचे पाय जमिनील टेकले तेव्हा तो सुंदरी येलेनाची हुबेहूब प्रतिमा बनला होता. राजपुत्र इवा त्याला झार कूस्मानकडे घेऊन गेला. झार खूप आनंदित झाला व त्या कृतज्ञता व्यक्त केली.

"राजपुत्र इवान, मला नवरी आणून दिल्याबद्दल आभारी आहे आता या क्षणापासून सोनेरी आयाळीचा घोडा आणि लगाम तुझ्या मालकीचे!

राजपुत्र इवान घोड्यावर स्वार झाला व सुंदरी येलेनासाठी गेला. त्या तिला आपल्याबरोबर घोड्यावर बसविले आणि ते दौडू लागले.

झार कूस्मानने शानदार विवाहसमारंभ केला व सबंध दिवसभर मेजवान दिली. रात्री झोपण्याची वेळ झाली तेव्हा सुंदरी येलेनाला तो शय्यागृहा घेऊन गेला. तिच्यासह तो पांघरुणात शिरला आणि काय चमत्कार! त्याच्य तरुण पत्नीऐवजी त्याला लांडग्याचे मुंडके दिसले! झारने घाबरून किंकाळ फोडली व तो पलंगावरून खाली कोसळला. भुरा लांडगा ताडकन उठला आणि धूम पळाला.

राजपुत्र इवानला भुऱ्या लांडग्याने गाठले व विचारले:

"राजपुत्र इवान, तू दुःखी का?"

"दुःखी बनू नको तर काय करू? सोनेरी आयाळीच्या घोड्याच्य मोबदल्यात अग्नि-पक्षी घेण्याची कल्पना मला सहन होत नाही!"

"मी तुला मदत करीन, आनंदी हो!" लांडगा म्हणाला.

लौकरच ते झार आफ्रोनच्या राज्यात पोहोचले. "त्या घोड्याला आणि सुंदरी येलेनाला लपवून ठेव," लांडगा म्हणाला. "मी स्वतः सोनेरी आया ळीच्या घोड्याचं रूप घेतो आणि तू मला झार आफ्रोनकडं घेऊन जा."

म्हणून त्यांनी सुंदरी येलेना व सोनेरी आयाळीचा घोडा ह्यांना जंगलात लपविले. भुऱ्या लांडग्याने एक कोलांटी उडी मारली व तो सोनेरी आयाळीच घोडा बनला. राजपुत्र इवान त्याला झार आफ्रोनकडे घेऊन गेला. झार खू झाला आणि सोनेरी पिंजऱ्यासह अग्नि-पक्षी त्याने भेट दिला.

राजपुत्र इवान जंगलात परतला, सोनेरी आयाळीच्या घोड्यावर त्याने सुंदरी येलेनाला बसविले, सोनेरी पिंजऱ्यासह अग्नि-पक्षी सोबत घेतला व तो घराकडे निघाला.

दरम्यान झार आफ्रोनने त्याला भेट मिळालेला घोडा स्वत:कडे आणवून घेतला आणि तो त्या घोड्याच्या पाठीवर स्वार होणार, तोच त्या घोड्याचे भुऱ्या लांडग्यात रूपांतर झाले. झार एवढा घाबरला की, जागच्या जागी तो खाली पडला आणि भुरा लांडगा तेथून वेगाने पसार झाला. थोड्याच वेळात लांडग्याने राजपुत्र इवानला गाठले.

"आता तुझा निरोप घेतो," लांडगा राजपुत्राला म्हणाला. "यापुढं मी जाऊ शकत नाही!"

राजपुत्र इवान घोड्यावरून खाली उतरला, त्याने तीनदा लवून प्रणाम केला व भुऱ्या लांडग्याचे विनयपूर्वक आभार मानले.

"माझा कायमचा निरोप घेऊ नकोस, कदाचित अजूनही तुला माझी गरज भासेल," भुरा लांडगा म्हणाला.

"कशाला ह्याची मला परत गरज भासेल?" राजपुत्र इवानच्या मनात विचार आला. "माझ्या सर्व इच्छा पूर्ण झाल्यात."

सोनेरी आयाळीच्या घोड्यावर स्वार होऊन सुंदरी येलेना व अग्नि-पक्षी यांच्यासह तो दौडू लागला. मायदेशी पोहोचल्यानंतर थोडे थांबून खाण्याचे त्याने ठरविले. त्यांच्यापाशी थोडा पाव होता आणि झऱ्याचे ताजे पाणी ते प्यायले. मग विश्रांतीसाठी पहुडले.

राजपुत्र इवानला झोप लागली न लागली तोच त्याचे भाऊ तेथे आले व त्यांनी जवळ जवळ त्याच्या अंगावर आपले घोडे घातले. अग्नि-पक्ष्याच्या शोधात ते परदेशी गेले होते आणि आता रिकाम्या हातांनी घरी परतत होते.

राजपुत्र इवानपाशी सर्व काही होते असे पाहताच ते म्हणाले :

"आपला भाऊ इवान ह्याला ठार मारू, म्हणजे त्याची सर्व लूट आपल्या मालकीची होईल."

त्यासरशी त्यांनी इवानला ठार मारले. मग ते सोनेरी आयाळीच्या घोड्यावर स्वार झाले, अग्नि-पक्ष्याला त्यांनी घेतले, सुंदरी येलेनाला घोड्यावर बसविले व म्हणाले :

"याद राख! ह्याबद्दल घरी तोंडातून चकार शब्द काढायचा नाही!"

बिचारा इवान जमिनीवर पडला होता. त्याच्या डोक्याभोवती डोंबकावळे घिरट्या घालीत होते. अचानक भुरा लांडगा तेथे आला व त्याने एका डोंबकावळीला आणि तिच्या पिल्लाला धरले.

"डोंबकावळी, उडत जा आणि माझ्यासाठी मृत आणि जिवंत पाणी

आणून दे!" लांडगा म्हणाला. "तसं वागलीस तरच तुझ्या पिल्लाला मी सोडीन!"

डोंबकावळी उडाली. दुसरा उपायच काय होता? तिने मृत आणि जिवंत पाणी आणून देईपर्यंत लांडग्याने तिचे पिल्लू धरून ठेवले. भुऱ्या लांडग्याने राजपुत्र इवानच्या जखमांवर मृत पाणी शिंपडले व त्या जखमा भरून आल्या. मग त्याने त्याच्यावर जिवंत पाणी शिंपडले आणि राजपुत्र इवान जिवंत झाला.

"बापरे, अगदी मुडद्यासारखा झोपलो होतो!" राजपुत्र इवान म्हणाला:

"होय," भुरा लांडगा म्हणाला, "आणि मी नसतो तर तू कधीच जागा झाला नसतास! तुझ्या सख्ख्या भावांनी तुला ठार मारलं होतं आणि तुझी संपदा पळवून नेली. लौकर माझ्या पाठीवर बैस!"

त्यांनी जोरदार पाठलाग करून दोघा भावांना पकडले. भुऱ्या लांडग्याने त्यांचे तुकडे तुकडे केले व त्या तुकड्यांना मैदानात विखरून टाकले.

राजपुत्र इवानने भुऱ्या लांडग्याला लवून नमस्कार केला व त्याचा कायमचा निरोप घेतला.

मग राजपुत्र इवान सोनेरी आयाळीच्या घोड्यावरून घरी आला. आपल्या वडिलांसाठी त्याने अग्नि-पक्षी आणला व स्वतःसाठी पत्नी आणली – सुंदरी येलेना आणली.

झार बेरेन्देई अत्यंत खूष झाला आणि त्याने आपल्या मुलाला अनेक प्रश्न विचारले. भुऱ्या लांडग्याने आपल्याला कशी मदत केली आणि झोपेत असताना भावांनी आपल्याला कसे ठार मारले व पुढे भुऱ्या लांडग्याने त्यांचे कसे तुकडे तुकडे केले, ही सर्व हकीकत राजपुत्र इवानने वडिलांना सांगितली.

प्रथम झार बेरेन्देई अत्यंत दुःखी बनला, पण लौकरच तो ते दुःख विसरला. राजपुत्र इवानने सुंदरी येलेनाशी लग्न केले आणि ते सुखाने नांदू लागले.



दोन इवान



कोणे एके काळी रहात होते दोन भाऊ – दोन इवान : श्रीमंत इवान आणि गरीब इवान. श्रीमंत इवानचे घर समृद्धीने भरलेले, कोठारांमध्ये भरपूर धान्य खचलेले. धष्टपुष्ट गायी हिरव्यागार कुरणांमध्ये चरत होत्या, गुबगुबीत मेंढ्या ओढ्यापाशी बागडत होत्या. भट्टीमध्ये गरम गरम पाव भाजत होते. सगळी अगदी रेलचेल होती. पण त्याचे कुटुंब मात्र लहान होते – फक्त बायको. श्रीमंत इवानला ना छोटी मुले, ना मोठी मुले.

गरीब इवानपाशी फक्त चिखलातली एक बेडकी आणि चुलाण्यापाशी एक मांजर. मुले सात. सारी सातही मुले बाकड्यावर घोळका करून बसायची, खीर खायला मागायची. पण घरात धान्याचा ना कण, दुधाचा ना थेंब. काही उपाय सापडेना, म्हणून गरीब इवान त्याच्या श्रीमंत भावाकडे गेला.

"नमस्ते, भाऊ!"

"रामराम, दरिद्री इवान! कशाला आलास? घरात मुकाट बसून का नाही राहिलास?"

"भाऊराया, मला पीठ उसनं दे. मग मी ते परत करीन."

"छान," श्रीमंत इवान म्हणाला, "हे घे पसाभर पीठ, पण मला परत दे पोतंभर."

"हे काय रे भाऊराया, पसाभराला पोतंभर परत? हे जरा फारच वाटत नाही का?"

"फार वाटत असेल तर उंबरठ्याबाहेर चालता हो, दुसऱ्या जागी जा!"

काही उपाय नव्हता. गरीब इवानने रडत रडत पसाभर पीठ घेतले

आणि तो घरी निघाला. त्याच्या घराच्या फाटकापाशी तो पोहोचला न् पोहोचला, तोच एकदम सोसाट्याचा वारा सुटला. घू घू आवाज करीत वाऱ्याची वावटळ आली आणि इवानच्या भांड्यातील सगळे पीठ त्याने उडवून लावले. फक्त भांड्याच्या तळाशी चिमूटभर पीठ उरले आणि वाऱ्याची वावटळ निघून गेली.

गरीब इवान खूप चिडला.

"अरे नाठाळ उत्तरेच्या वाऱ्या! माझ्या पोरांचं तू वाट्टोळं केलंस, त्यांना उपाशीपोटी ठेवलंस! तुला मी शोधून काढीन आणि तुझ्या नाठाळपणाची किंमत मोजायला लावीन!"

आणि गरीब इवान वाऱ्याच्या पाठलागावर निघाला. वारा वाटेवर, इवान त्याच वाटेवर. वारा जंगलात – इवान पाठोपाठ जंगलात. दोघेही एका प्रचंड ओक वृक्षापाशी आले. वारा झाडाच्या ढोलीत घुसला, इवान ताबडतोब ढोलीत घुसला.

वाऱ्याने इवानला पाहिले आणि तो म्हणाला: "काय रे भल्या माणसा, माझ्याकडं पाहुणा आलास?" "ऐक माझं," इवान म्हणाला, "माझ्या भुकेल्या पोरांसाठी भांडंभर पीठ घेऊन जात होतो, पण तू नाठाळा, घू घू करत वावटळ उडवलीस आणि माझं पीठ उडवून लावलंस. आता मी घरी कोणत्या तोंडानं जाऊ?"

"एवढंच होय!" वारा म्हणाला. "दुःख करू नको! हे घे तुला जादूचं मेजावरचं कापड. तुला ते पाहिजे तेवढं खायला-प्यायला देईल!"

इवान खूप आनंदला, वाऱ्याला त्याने वंदन केले आणि तो घरी धावला.

घरी कापड त्याने मेजावर पसरले आणि तो म्हणाला:

"जादूच्या कापडा, मला खायला-प्यायला दे!"

नुसता सांगायचा अवकाश – कापडावर समोसे, कडबोळी, मांसाच्या तुकड्यांसकट कोबीचं सार, डुकराची चरबी आणि बकऱ्याची सागुती एवढे पदार्थ झकास मांडलेले.

इवानने आणि त्याच्या मुलांनी पोटभर खाल्ले. सगळेजण झोपी गेले. सकाळी परत सगळे न्याहरीला बसले होते, तेवढ्यात श्रीमंत इवान आला.

श्रीमंत इवानने जेव्हा खाद्यपदार्थांनी गच्च भरलेले मेज पाहिले, तेव्हा संतापाने तो लालेलाल झाला.

"काय रे बंधू, तू श्रीमंत बनलास?"

"श्रीमंत झालो अथवा नाही, हे सांगता यायचं नाही. पण मी पोटभर खाईन आणि तुलाही खाऊ घालीन. तुला मी पोतंभर पीठ देणं आहे ना? आत्ता देतो. जादूच्या कापडा, पोतंभर पीठ दे!"

सांगायचा अवकाश – मेजावर पीठाचे पोते उभे झाले.

श्रीमंत इवानने पीठ घेतले आणि एकही अक्षर न बोलता तो झोपडीतून बाहेर पडला.

संध्याकाळ झाली आणि श्रीमंत इवान परत भावाकडे धावत आला.

"भाऊराया, लाडक्या, मला मदत कर, मला एकटा सोडू नको! एका श्रीमंत खेड्यातली माणसं माझ्याकडं पाहुणी आलीत. पण माझा चुलाणा पेटवलेला नाही, घरात पाव भाजलेला नाही. पाहुण्यांना खायला घालायला माझ्यापाशी काहीही नाही. भाऊराया, फक्त एक-दोन तासांसाठी तुझं कापड दे!"

गरीब इवानने त्याला जादूचे कापड दिले.

श्रीमंत इवानने पाहुण्यांची झकास सरबराई केली, त्यांना अंगणापर्यंत बाहेर जाऊन निरोप दिला, मग जादूचे कापड स्वतःच्या पेटीत लपविले आणि अगदी तसेच दिसणारे साधे कापड घेऊन तो गरीब इवानकडे गेला.

"तुझे मोठे उपकार झाले भाऊराया," तो म्हणाला. "सगळे भरपूर जेवले."

रात्रीच्या जेवणासाठी इवान त्याच्या मुलांबरोबर मेजापाशी बसला.

मेजावर कापड घालण्यात आले.

"जादूच्या कापडा, रात्रीचं जेवण दे!"

पांढरे स्वच्छ कापड मेजावर पडून होते, पण जेवणाचा मात्र पत्ता नाही.

गरीब इवान धावत धावत श्रीमंत इवानकडे गेला.

"अरे भाऊ, माझ्या कापडाचं तू काय केलंस?"

"मला काय माहीत? मी काहीच केलं नाही! जसं तुझ्याकडून घेतलं, तसंच तुला परत दिलं!"

गरीब इवान रडत रडत घरी परतला. एक दिवस उलटला, दुसरा दिवस गेला, मुले रडत होती, खायला मागत होती. पण घरात ना धान्याचा कण, ना दुधाचा थेंब, काही उपाय सापडेना, म्हणून गरीब इवान त्याच्या श्रीमंत भावाकडे गेला.

"नमस्ते, बंधू!"

"रामराम, दरिद्री इवान! कशाला आलास? घरात मुकाट बसून का रहात नाहीस?"

"पोरं रडताहेत, खायला मागताहेत. भाऊराया, दे मला पीठ, किंवा रवा, किंवा पावाचा तुकडा."

"तुला देण्यासाठी माझ्यापाशी ना पीठ, ना रवा, ना पावाचा तुकडा. जर इच्छा असेल तर कोठीघरात लाकडी पिंपावर मुरंब्याची एक बशी आहे, ती घेऊन जा."

गरीब इवानने मुरंब्याची बशी घेतली आणि तो घरी निघाला. तो वाट चालत होता तेव्हा सूर्य प्रकाशत होता, ऊब देत होता, बशीतील मुरंब्यावर त्याचे किरण खेळत होते. मुरंबा विरघळू लागला आणि बशीमधून खाली ओघळू लागला, सबंध वाटेवर तो सांडला. वाटेवर नुसते एक छोटे

डबके उरले. गरीब इवान खूप चिडला.

"अरे महामूर्ख सूर्या! तुझा होतो खेळ, पण माझा पोरांच्या नशीबी दुःख. तुला धरतो आणि तुझ्या नाठाळपणाची किंमत मोजायला लावतो!"

आणि इवान सूर्याच्या पाठलागावर निघाला. तो खूप खूप अंतर चालला, पण सूर्य सतत पुढेच. शेवटी संध्याकाळी सूर्य डोंगरापलिकडे खाली बसला. तात्काळ इवानने त्याला तेथे गाठले.

सूर्याने इवानला पाहिले आणि विचारले: "काय रे इवान, माझ्याकडं पाहुणा आलास?"

"ऐक माझं," इवान म्हणाला, "माझ्या भुकेल्या पोरांसाठी मुरंबा घेऊन जात होतो, पण तू महामूर्खा सूर्या, जसा तू गरम व्हायला लागलास, माझ्या मुरंब्याशी खेळू लागलास, तसा मुरंबा लागला वितळायला आणि सबंध रस्त्यावर गळून गेला. आता कोणत्या तोंडानं घरी परतू?"

"काही विशेष नाही," सूर्य म्हणाला, "मी तुला दुःख दिलं, आता मीच तुला मदत करतो. माझ्या कळपातली एक शेळी मी तुला देतो. तिला तू सीतासुपारीची फळं खाऊ घाल. मग ती तुला दुधाऐवजी सोनं देईल."

इवानने सूर्याला लवून नमस्कार केला आणि शेळीला घरापर्यंत पिटाळत आणले. त्याने तिला सीतासुपारीची फळे चारली व तो तिचे दूध काढू लागला. आणि खरोखरीच दुधाऐवजी सोन्याच्या धारा शेळीच्या आचळांमधून धावू लागल्या. इवान छान राहू लागला, मुलांना पोटभर खाऊ घालू लागला.

श्रीमंत इवानच्या कानांवर शेळीची वार्ता गेली. तो भावापाशी धावत गेला.

"नमस्ते, भाऊराया!"

"नमस्ते, श्रीमंत इवान!"

"भाऊराया, लाडक्या, मला मदत कर. एक-दोन तासांपुरती तुझी शेळी मला दे. मला कर्ज फेडायचं आहे, पण माझ्यापाशी पैसे नाहीत."

"घेऊन जा, मात्र मला फसवू नको."

श्रीमंत इवान शेळी घेऊन गेला, तिच्या आचळांमधून त्याने सोने काढले, मग शेळीला पिंजऱ्यात लपविले आणि गरीब इवानपाशी साधी शेळी त्याने पिटाळत नेली.

"तुझे मोठे उपकार झाले, भाऊराया! संकटात मला मदत केलीस."

गरीब इवानने शेळीला सीतासुपारीची फळे खाऊ घातली व तो तिचे आचळ पिळू लागला... आचळांमधून दूध गळू लागले, शेळीच्या खुरांपर्यंत दुधाच्या धारा वाहू लागल्या, पण सोन्याचा मात्र पत्ता नाही!

गरीब इवान श्रीमंत इवानपाशी धावत गेला. पण श्रीमंत इवान म्हणाला:

"मला काही माहीत नाही! मी काहीच केलं नाही! जी शेळी घेतली, तीच तुला परत दिली!"

गरीब इवान रडत रडत घरी परतला. दिवस उलटले, आठवडे लोटले, मुले रडत होती, खायला मागत होती. हिवाळा फार कडक होता आणि घरात ना धान्याचा कण, ना दुधाचा थेंब. काही उपाय सापडेना, म्हणून गरीब इवान त्याच्या श्रीमंत भावाकडे गेला.

"पोरं रडताहेत, खायला मागताहेत. भाऊराया, एक भांडंभर पीठ दे."

"ना तुला पीठ मिळेल, ना रवा. जर पाहिजेच असेल तर त्या कपाटातल्या फळीवर कालचं कोबीचं सार आहे – ते घेऊन जा."

गरीब इवानने शिळया साराचे भांडे घेतले आणि तो घरी निघाला. तो चालत होता तेव्हा बर्फाचे वादळ घोंघावत होते, हिम-आजोबा कडकडत होता, इवानचे शरीर बधीर होत होते. हिम-आजोबाने कोबीच्या साराशी खेळायला सुरुवात केली: प्रथम बर्फाचा पातळ थर त्यावर पसरला, मग हिमाची भुकटी शिंपडली. असे खेळत खेळत त्याने त्या कोबीच्या साराला पूर्ण गोठवून टाकले. भांड्यात फक्त काळसर बर्फाचा तुकडा उरला, खायला काहीच नाही.

गरीब इवान खूप चिडला.

"अरे तांबडनाक्या हिम-आजोबा! तुझा होतो खेळ, पण माझी पोरं दु:खी! तुला पकडतो आणि तुझ्या नाठाळपणाची किंमत मोजायला लावतो!"

आणि गरीब इवान हिम-आजोबाच्या पाठलागावर निघाला. हिम-आजोबा मैदानांमधून जात होता, इवान त्याच्यापाठी मैदानांमधून धावत होता. हिम-आजोबा जंगलांमध्ये, तर इवानही जंगलांमध्ये. हिम-आजोबा एका मोठ्या बर्फखंडाखाली निजला, तर इवानही तिथे घुसला.

हिम-आजोबाने आश्चर्याने विचारले:

"काय रे इवान, तू माझ्याकडं पाहुणा आलास?"

"ऐक माझं," इवान म्हणाला, "माझ्या पोरांसाठी कालचं शिळं कोबीचं सार घेऊन जात होतो, पण तू त्याच्याशी खेळलास, सार गोठवून टाकलंस. आता मी घरी कोणत्या तोंडानं परतू? जादूचं कापड आणि सोनं देणारी शेळी माझ्या भावानं पळवली, आता तू कोबीचं सार नासवून टाकलंस."

"एवढंच ना!" हिम-आजोबा म्हणाला. "आता मी तुला मदत करणारी थैली देतो. म्हणायचं: 'दोघं थैलीतून बाहेर या!' दोघेजण बाहेर उडी मारून येतील. परत म्हणालास: 'दोघं थैलीत जा!' ताबडतोब दोघे थैलीत लपतील."

इवानने हिम-आजोबाला लवून नमस्कार केला आणि तो घरी निघाला. घरी आल्यानंतर त्याने थैली बाहेर काढली आणि तो म्हणाला:

"दोघं थैलीतून बाहेर या!"

त्याच क्षणी देवदाराच्या लाकडाचे दोन सोटे ताडकन थैलीमधून बाहेर पडले आणि इवानला झोडपत म्हणाले:

"अरे दरिद्रचा, त्या श्रीमंतावर विश्वास ठेवू नको! अरे इवान, श्रीमंत भावावर विश्वासू नको! शहाणपणानं वागायला शीक!"

सोटयांचा मार खाता खाता इवान कसाबसा ओरडू शकला: "दोघं थैलीत जा!"

सोटे गुपचूप थैलीत जाऊन पडले.

संध्याकाळच्या सुमाराला श्रीमंत इवान धावत धावत आला.

"कुठं गेला होतास इवान? काय घेऊन आलास?"

"भाऊराया, मी गेलो होतो हिम-आजोबाकडं. त्यानं मला जादूची थैली दिलीय. नुसतं म्हणायचं: 'दोघं थैलीतून बाहेर या!' दोघं बाहेर उडी मारून येतील आणि तुझ्या इच्छेप्रमाणं सर्व कामं करतील."

"अरे भाऊराया, दरिद्री इवाना, ती थैली मला एका दिवसापुरती दे! माझ्या घराचं छप्पर मोडलंय, ते शाकारायला कुणी माणूस नाही."

"घेऊन जा, श्रीमंत इवाना!"

श्रीमंत इवान त्या थैलीला स्वतःच्या घरी घेऊन आला, त्याने दारे घट्ट बंद करून घेतली.

"दोघं थैलीतून बाहेर या!"

तात्काळ देवदाराचे दोन सोटे थैलीमधून ताडकन बाहेर पडले, त्यांनी
ीमंत इवानला चोप द्यायला सुरुवात केली आणि ते म्हणाले :

"अरे श्रीमंता, त्या गरीबाचा अपमान करू नको! अरे श्रीमंता
वानला कापड आणि शेळी परत दे!"

श्रीमंत इवान धावत धावत गरीब इवानकडे गेला – सोटे त्याच्यामागू
निघाले.

"मला वाचव, भाऊराया! तुझं जादूचं कापड आणि तुझी शेळ
ी तुला परत देतो!"

"दोघं थैलीत जा!" गरीब इवान ओरडला.

सोटे थैलीत जाऊन लपले. अर्धमेला श्रीमंत इवान कसाबसा घ
रतला आणि त्याने गरीब इवानला जादूचे कापड व सोने देणारी शेळ
रत दिली.

तेव्हापासून गरीब इवान त्याच्या मुलांसह सुखासमाधानाने राहू लागला
ाता सातही मुले बाकावर बसतात आणि खीर भुरकतात. त्यांचे चम
ुंदर रंगीत, त्यांची खीर तुपासकट साग्रसंगीत!

तेजस्वी बहिरीससाणा-फीनिस्त

कोणे एके काळी एक शेतकरी रहात होता. त्याची बायको वारली आणि तिने तीन मुली त्याच्याबरोबर माघारी ठेवल्या. घराची व्यवस्था पाहण्यासाठी एखाद्या मोलकरणीला नोकरीवर ठेवण्याचा म्हाताऱ्याचा विचार होता. पण त्याची सर्वात धाकटी मुलगी मार्यूष्का म्हणाली :

"बाबा, मोलकरणीला कामावर ठेवू नका. मी एकटी घराची व्यवस्था पाहीन."

अशा रीतीने मार्यूष्का घराची व्यवस्था पाहू लागली आणि खरोखरीच ती अत्यंत छान रीतीने घर चालवू लागली. तिला सर्व गोष्टी करता येत होत्या व अत्यंत सुरेख रीतीने ती सर्व गोष्टी पार पाडत होती. मार्यूष्कावर तिचे वडील खूप प्रेम करीत. अशी हुशार आणि कष्टाळू मुलगी असल्याचा त्यांना आनंद वाटे. शिवाय ती किती सुंदर होती! पण तिच्या दोन बहिणी मात्र कुरूप होत्या, मत्सरी आणि लोभी होत्या. सदैव तोंडाला रंगरंगोटी करण्यात, पावडरी फासण्यात आणि उत्तमोत्तम कपडे घालून नटण्यात त्या गुंतलेल्या असत. आख्खा दिवस नवनवे कपडे घालून आहे त्यापेक्षा सुंदर दिसण्याचा त्यांचा प्रयत्न चालायचा. पण कशानेही त्यांचे फार काळ समाधान होत नसे – ना कपड्यांनी, ना शालींनी, ना उंच टाचांच्या बुटांनी!

एके दिवशी त्यांचे वडील बाजारात जायला निघाले. त्यांनी आपल्या मुलींना विचारले :

"लाडक्या मुलींनो, तुमच्यासाठी काय विकत आणू? तुम्हाला कसं खूष करू?"

"आम्हा प्रत्येकीला एक रुमाल विकत घ्या," थोरल्या दोन मुली

म्हणाल्या. "आणि लक्षात ठेवा, त्याच्यावर सोन्याची मोठ्ठी फुलं हवीत."

पण सर्वात धाकटी मुलगी मार्यूष्का गप्प उभी राहिली. म्हणून वडिलांनी तिला विचारले:

"आणि मार्यूष्का, तुला काय आवडेल?"

"बाबा, तेजस्वी बहिरीससाणा फीनिस्त ह्याचं एक पीस माझ्यासाठी विकत आणून द्या."

वडील बाजाराहून परतले तेव्हा दोन रुमाल घेऊन आले होते, पण पीस काही त्यांना सापडले नव्हते.

काही काळानंतर ते परत बाजाराला निघाले. "मुलींनो, तुमच्या मागण्या सांगा," ते म्हणाले. आणि थोरल्या दोन मुली अधीरपणे म्हणाल्या:

"आम्हा प्रत्येकीला चांदीच्या जडावाची बुटांची जोडी आणा."

पण मार्यूष्का परत म्हणाली:

"बाबा, तेजस्वी बहिरीससाणा फीनिस्त ह्याचं एक पीस माझ्यासाठी विकत आणा."

सबंध दिवसभर बाजारात भटकून वडिलांनी बूट विकत घेतले, पण पीस काही त्यांना सापडले नाही. शेवटी पीसाविनाच ते परत आले.

तर तिसऱ्यांदा ते बाजारात निघाले. त्यांच्या थोरल्या दोन मुली म्हणाल्या:

"आम्हा प्रत्येकीला नवे झगे विकत घ्या." पण मार्यूष्का परत म्हणाली:

"बाबा, तेजस्वी बहिरीससाणा फीनिस्त ह्याचं पीस माझ्यासाठी विकत आणा."

सबंध दिवसभर वडिलांनी बाजारात पीसाचा शोध घेतला, पण पीस काही त्यांना सापडले नाही. अखेरीस ते शहरामधून बाहेर पडले. तेवढ्यात वाटेत त्यांना एक छोटा म्हातारा भेटला.

"रामराम आजोबा!"

"रामराम भल्या माणसा! कुठं निघालास?"

"माझ्या खेड्यात परत निघालोय आजोबा. आणि काय करावं ते मला सुचत नाही. माझ्या सर्वात धाकट्या मुलीनं तेजस्वी बहिरीससाणा फीनिस्त ह्याचं पीस विकत आणायला मला सांगितलं होतं, पण मला काही ते सापडलं नाही."

"तुला हवं असलेलं पीस माझ्यापाशी आहे. ते मंत्रानं भारलेलं आहे.

पण तू फार भला माणूस आहेस असं मला दिसतंय, म्हणून ते पीस मी तुला देतो. मग काय वाट्टेल ते होवो!"

छोटचा म्हाताऱ्याने पीस बाहेर काढले आणि मुलीच्या वडिलांना दिले. तसे ते पीस अगदी सामान्य दिसत होते. घरी परतताना शेतकऱ्याच्या मनात विचार येत होता: "ह्या पीसानं माझ्या मार्यूष्काचं काय चांगलं होणार?"

काही वेळानंतर शेतकरी घरी आला व त्याने आपल्या मुलींना भेटवस्तू दिल्या. थोरल्या दोघींनी आपले नवे झगे घालून पाहिले आणि मार्यूष्काची त्या थट्टा करीत राहिल्या:

"तू मूर्ख होतीस आणि अजूनही मूर्ख आहेस! आता खोव ते पीस तुझ्या केसात! फार सुंदर ध्यान दिसेल तुझं!"

पण मार्यूष्काने प्रत्युत्तर केले नाही. ती त्यांच्यापासून दूर राहिली. सगळे घर जेव्हा झोपी गेले तेव्हा तिने ते पीस फरशीवर ठेवले आणि हळूच ती म्हणाली:

"लाडक्या फीनिस्त, तेजस्वी बहिरीससाण्या, माझ्यापाशी ये! माझ्या स्वप्नातल्या पतीराजा, माझ्यापाशी ये!"

आणि खरोखरीच एक अत्यंत देखणा तरुण तिच्यापाशी आला. सकाळच्या प्रहरी त्याने पाय फरशीवर आपटला व त्याचे बहिरीससाण्यात रूपांतर झाले. मार्यूष्काने खिडकी उघडली आणि बहिरीससाण्याने निळ्या आकाशात भरारी घेतली.

अशा रीतीने तीन रात्री तिने त्याचे स्वागत केले. दिवसा तो निळ्या नभात बहिरीससाणा बनून विहार करायचा. रात्र

पडताच तो मार्यूष्काकडे परतायचा आणि त्याचे देखण्या युवकात रूपांतर व्हायचे.

पण चौथ्या दिवशी दुष्ट बहिणींनी त्यांना पाहिले आणि त्या वडिलांपाशी कागाळी सांगायला गेल्या.

"लाडक्या मुलींनो," वडील म्हणाले, "उगीच दुसऱ्यांच्या भानगडीं-मध्ये तुमचं नाक खुपसू नका!"

"ठीक आहे," बहिणींनी विचार केला. "पुढं काय घडतं ते आम्ही पाहू."

त्यांनी खिडकीच्या चौकटीत तीक्ष्ण सुऱ्यांची रांग रोवून ठेवली व त्या लपून पाहू लागल्या.

थोड्या वेळानंतर तेजस्वी बहिरीससाणा तेथे आला. तो खिडकीपर्यंत उडत आला, पण मार्यूष्काच्या खोलीत त्याला जाता येईना. पंख फडफडवीत त्याने तावदानावर खूप धडका मारल्या. त्याची संपूर्ण छाती सुऱ्यांच्या जखमांनी भरून गेली. मार्यूष्का गाढ झोपली होती आणि तिला काहीही ऐकू गेले नाही. शेवटी बहिरीससाणा म्हणाला:

"ज्याला माझी गरज असेल, तो मला शोधून काढील, पण त्याला वेदना झाल्याशिवाय राहणार नाहीत. जोवर तू तीन लोखंडी बुटांच्या जोड्या झिजवणार नाहीस, तीन लोखंडी दांड्या मोडणार नाहीस आणि तीन लोखंडी टोप्या फाडणार नाहीस, तोवर मी तुला सापडणार नाही."

मार्यूष्काने हे ऐकले आणि बिछान्यावरून एकदम उठून ती खिडकीपाशी धावली. पण बहिरीससाणा एव्हाना निघून गेला होता. खिडकीपाशी फक्त त्याच्या लाल रक्ताची खूण उरली होती. मार्यूष्काला जोरात रडू कोसळले. तिच्या अश्रूंच्या छोट्या थेंबांनी लाल रक्ताची खूण धुवून निघाली व मार्यूष्का अधिकच सुंदर दिसू लागली.

नंतर ती आपल्या वडिलांकडे जाऊन म्हणाली:

"मला रागावू नका बाबा, पण मला माझ्या अवघड वाटेनं जाऊ द्या. जर मी जगले-वाचले तर तुम्हाला भेटीन, जर तसं घडलं नाही तर माझ्या नशीबात तसंच होतं असं समजा."

आपल्या गोड मुलीचा वियोग घडणार म्हणून शेतकऱ्याला खूप दुःख झाले, पण शेवटी त्याने तिला जाऊ दिले.

मार्यूष्काने तीन लोखंडी बुटांच्या जोड्या, तीन लोखंडी दांडे व तीन



लोखंडी टोप्यांची खरेदी केली. आपल्या हृदयेश्वराच्या प्राप्तीसाठी, तेजस्वी बहिरीससाणा फीनिस्त ह्याच्या भेटीसाठी, प्रदीर्घ अवघड प्रवासाला ती निघाली. उघडचा मैदानांमधून ती चालत गेली, दाट जंगले तिने पार केली व उंच पर्वत ती चढून गेली. छोटचा पक्ष्यांची गाणी ऐकून तिचे मन प्रफुल्लित झाले, निर्झरांनी तिचा गोरा चेहरा धुतला, दाट जंगलांनी तिचे स्वागत केले. मार्यूष्काला कुणीही इजा करू शकत नव्हते, कारण सगळे जंगली पशू – भुरे लांडगे, तपकिरी अस्वले आणि लाल कोल्हे – तिच्याकडे धावत येत. अखेरीस लोखंडी बुटांची एक जोडी झिजून गेली, एक लोखंडी दांडा मोडला आणि एक लोखंडी टोपी फाटली.

जंगलामधील एका घळीपाशी मार्यूष्का आली. तेथे कोंबडीच्या पायावर एक छोटी झोपडी गरगर फिरत असल्याचे तिने पाहिले.

"छोटचा झोपडी, छोटचा झोपडी," मार्यूष्का म्हणाली, "झाडांकडं पाठ कर आणि माझ्याकडं तोंड कर. भाकर खायला मला आत घे."

छोटचा झोपडीने आपली पाठ झाडांकडे केली, तोंड मार्यूष्काकडे फिरविले व मार्यूष्का झोपडीत गेली. तेथे तिच्या दृष्टीस पडली हडकुळी, लांबनाकी चेटकीण बाबा-यागा. लांब दांडचाची झाडू घेऊन बसलेली.

बाबा-यागाने मार्यूष्काला पाहताच ती गुरगुरली: "हूं हूं, रशियन रक्ताची पूर्वी कधी गाठ पडली नव्हती माझ्याशी, आता त्याचा वास येतोय माझ्या दाराशी! कोण आहे? कुठून आलंय? कुठं चाललंय?"

"लाडक्या आजीबाई, तेजस्वी बहिरीससाणा फीनिस्त ह्याचा मी शोध घेतेय."

"सुंदर पोरी, ती वाट खूप लांबची आहे. त्याला शोधण्यासाठी तुला तिप्पट-नऊ भूमींमधून, तिप्पट-दहा राज्यांकडं गेलं पाहिजे. तिथली राणी एक दुष्ट जादुगारीण आहे. तिनं जादूनं भारलेलं पेय देऊन त्याला मुग्ध केलं आणि तिच्याशी लग्न करायला लावलं. पण मी तुला मदत करीन. ही घे चांदीची थाळी आणि सोन्याचं अंडं. जेव्हा तू तिप्पट-दहा राज्यात पोहोचशील तेव्हा राणीकडं मोलकरीण म्हणून कामाला लाग. दिवसभराचं काम संपल्यानंतर ही चांदीची थाळी घे आणि तिच्यात हे सोन्याचं अंडं ठेव. ते आपोआप गडगडू लागेल. त्यांनी ते विकत मागितलं तर विकू नकोस – तेजस्वी बहिरीससाणा फीनिस्तला भेटायची परवानगी माग."

मार्यूष्काने बाबा-यागाचे आभार मानले व ती निघाली. जंगले अधिक अंधारी बनली आणि पुढे जाण्याची तिला भीती वाटू लागली. पण अचानक तेथे एक मांजर आले. मार्यूष्कापाशी उडी मारून येत त्याने लाडाने म्यांव म्यांव केले:

"भिऊ नकोस मार्यूष्का, पुढं आणखीच वाईट संकटं येतील, पण पुढं जात रहा आणि मागं पाहू नको."

मांजराने तिच्या पायांना आपले अंग घासले व ते निघून गेले. मार्यूष्का आणखी पुढे गेली. जंगलात ती जेवढी अधिक आत जात होती, तेवढा जास्त काळोख जाणवत होता. ती अखंड चालत राहिली. शेवटी तिची लोखंडी बूटांची दुसरी जोडी झिजली, दुसरा लोखंडी दांडा मोडला व दुसरी लोखंडी टोपी फाटली, लौकरच ती कोंबडीच्या पायावर उभ्या असलेल्या एका छोटया झोपडीपाशी आली. त्या झोपडीभोवती बळकट कुंपण होते व खुंटांवर भयानक चमकणाऱ्या कवटया होत्या.

मार्यूष्का म्हणाली: "छोटया झोपडी, छोटया झोपडी, झाडांकडं पाठ कर, माझ्याकडं तोंड कर. भाकर खायला आत घे."

छोटया झोपडीने झाडांकडे पाठ केली, मार्यूष्काकडे तोंड केले व मार्यूष्का झोपडीत गेली. तेथे हडकुळी, लांबनाकी चेटकीण बाबा-यागा लांब दांडयाची झाडू घेऊन बसल्याचे तिने पाहिले.

बाबा-यागा मार्यूष्काला पाहताच गुरगुरली:

"हूं, हूं, रशियन रक्ताची भेट पूर्वी कधी झाली नव्हती माझ्याशी, आता त्याचा वास येतोय माझ्या दाराशी! कोण आहे? कुठून आलंय? कुठं चाललंय?"

"तेजस्वी बहिरीससाणा फीनिस्तला मी शोधतेय."

"माझ्या बहिणीला भेटलीस?"

"होय आजीबाई, मी तुमच्या बहिणीला भेटले."

"ठीक आहे. सुंदर पोरी, मी तुला मदत करीन. ही सोनेरी सुई आणि चांदीची चौकट घे. सुई आपोआप काम करते आणि लाल मखमालीवर सोनेरी-रुपेरी कशिदा काढते. त्यांनी विकत मागितली तर विकू नकोस – तेजस्वी बहिरीससाणा फीनिस्तला भेटायंची परवानगी माग."

मार्यूष्काने बाबा-यागाचे आभार मानले व ती आपल्या वाटेने पुढे

निघाली . जंगलामध्ये कडकड , दणदण आवाज येत होते , शीळ वाजत होती व भोवताली टांगलेल्या कवटयांमधून चमत्कारिक प्रकाश चमकत होता . किती भयंकर होते ते ! पण अचानक एक कुत्रा धावत आला :

" भू: , भू: , लाडक्या मार्यूष्का भिऊ नकोस . याहून वाईट संकटं येतील , पण पुढं जात रहा आणि कधीही मागं पाहू नकोस . "

असे बोलून तो कुत्रा निघून गेला . मार्यूष्का सतत चालत राहिली . जंगले अधिक अंधारी बनली , तिचे गुडघे खरचटून निघाले , तिच्या बाह्यांची लक्तरे लोंबू लागली . पण तरीही मार्यूष्का पुढे पुढे चालत राहिली व तिने कधीही मागे वळून पाहिले नाही .

अशी किती वेळपर्यंत ती चालत राहिली ते सांगणे अवघड आहे , पण लोखंडी बुटांची तिसरी जोडी झिजली , तिसरा लोखंडी दांडा मोडला व तिसरी लोखंडी टोपी फाटली . जंगलातील एका घळीपाशी ती पोहोचली व कोंबडीच्या पायावर उभी असलेली एक छोटी झोपडी तिच्या नजरेस पडली . झोपडी-भोवती उंच खुंटांचे कुंपण होते आणि खुंटांवर घोडयांच्या कवटया चमकत होत्या .

मार्यूष्का म्हणाली : " छोटया झो-पडी , छोटया झोपडी , झाडांकडं पाठ कर आणि माझ्याकडं तोंड कर . "

झोपडीने झाडांकडे पाठ केली व मार्यूष्काकडे तोंड केले . मार्यूष्का झो-पडीत गेली . तेथे हडकुळी , लांबनाकी चेटकीण बाबा-यागा लांब दांडयाची झाडू घेऊन बसलेली तिने पाहिली .

बाबा-यागा मार्यूष्काला पाहताच गुरगुरली :

"हूं, हूं, रशियन रक्ताची पूर्वी भेट कधी झाली नव्हती माझ्याशी, आता त्याचा वास येतोय माझ्या दाराशी! कोण आहे? कुठून आलंय? कुठं चाललंय?"

"आजीबाई, तेजस्वी बहिरीससाणा फीनिस्तला मी शोधतेय."

"सुंदर पोरी, त्याला शोधणं सोपं नाही, पण मी तुला मदत करीन. ही चांदीची चरकी आणि सोन्याची चाती घे. चाती तुझ्या हातात पकड आणि ती आपोआप फिरू लागेल, संपूर्ण सोन्याचा धागा तिच्यामधून बाहेर पडेल."

"धन्यवाद, आजीबाई."

"तुझे आभार नंतर मान आणि आधी मी काय सांगत्ये ते ऐक. त्यांनी सोनेरी चाती विकत मागितली तर विकू नकोस. पण तेजस्वी बहिरीससाणा फीनिस्तला भेटण्याची परवानगी माग."

मार्यूष्काने बाबा-यागाचे आभार मानले आणि ती पुढे निघाली. जंगलात गर्जना ऐकू येत होत्या, गडगडाट होत होता व शीळ वाजत होती. वटवाघुळे घिरट्या घालत होती, उंदीर बिळांमधून सरपटत बाहेर पडत होते आणि थेट मार्यूष्कावर धावून जात होते. अचानक एक भुरा लांडगा तिच्यापाशी धावत आला व म्हणाला: "भिऊ नकोस मार्यूष्का. माझ्या पाठीवर बैस आणि कधीही मागं पाहू नकोस."

तर ती लांडग्याच्या पाठीवर बसली आणि क्षणात ते दृष्टीआड झाले. विशाल स्तेप त्यांनी पार केले, मखमाली कुरणे ओलांडली, दह्याचे किनारे असलेल्या मधाच्या नद्या ओलांडल्या, ढगांना स्पर्शणारे उंच पर्वत त्यांनी उल्लंघिले. शेवटी ती बिलोरी राजवाड्यापाशी पोहोचली. तेथे दर्शनी दालन कोरीव होते आणि रंगीबेरंगी गवाक्षे होती. एका गवाक्षामधून खुद्द राणी बाहेर पहात बसली होती.

"तर आपण पोहोचलो, मार्यूष्का," लांडगा म्हणाला. "आता माझ्या पाठीवरून खाली उतर आणि ह्या राजवाड्यात दासी म्हणून काम कर."

मार्यूष्का खाली उतरली, तिने आपले बोचके काखोटीला मारले व लांडग्याचे आभार मानले. मग राणीपाशी जाऊन तिने लवून मुजरा केला.

"मला क्षमा करा", मार्यूष्का म्हणाली, "मला आपलं नांव माहीत नाही. पण तुम्हाला एखाद्या दासीची गरज नाही का?"

"होय," राणी म्हणाली, "खूप दिवसांपासून मी दासी शोधतेय, पण जिला विणायला, कातायला आणि कशीदाकाम करायला येतं, अशीच दासी मला हवीय!"

"ही सर्व कामं मी करू शकते," मार्यूष्का म्हणाली.

"तर मग आत ये आणि कामाला लाग."

अशा रीतीने मार्यूष्का राजवाड्यात दासी बनली. सबंध दिवसभर आणि रात्र पडेपर्यंत तिने काम केले. मग तिने सोन्याचे अंडे व चांदीची थाळी घेऊन म्हटले:

" सोनेरी अंड्या , तुझ्या चांदीच्या थाळीवर गडगडत रहा, माझ्या लाडक्या फीनिस्तचं दर्शन घडवा ! "

आणि खरोखरीच तेजस्वी बहिरीससाणा फीनिस्त तिच्या-समोर हजर होईपर्यंत ते अंडे गड-गडत राहिले. मार्यूष्का टक लावून फीनिस्तकडे पहात राहिली व तिच्या डोळ्यांमधून आसवांच्या धारा वाहू लागल्या.

" फीनिस्त, माझ्या लाड-क्या फीनिस्त, तुझ्याविना अश्रू ढाळत बसायला मला एकटीला का सोडलंस ? "

राणीने तिचे हे बोलणे आडून ऐकले व ती म्हणाली :

" मार्यूष्का, तुझी चांदीची थाळी आणि सोन्याचं अंडं मला विक. "

" नाही, " मार्यूष्का उत्तर-ली, " त्या वस्तू विकायच्या नाहीत, पण तेजस्वी बहिरीससाणा फी-निस्तला भेटायला तुम्ही मला पर-वानगी दिलीत तर ह्या वस्तू मी मोफत देईन. "

राणीने थोडा वेळ विचार केला आणि मग ती म्हणाली :

" ठीक आहे, तसं घडेल. आज रात्री त्याला झोप लागली

म्हणजे मी तुला त्याच्यापाशी जायला देईन."

रात्र झाली तेव्हा मार्यूष्का त्याच्या शयनखोलीपाशी गेली व तिने तेजस्वी बहिरीससाणा फीनिस्त ह्याला पाहिले. तिचा लाडका गाढ झोपला होता आणि त्याला जागे करणे अशक्य ठरले. ती त्याच्याकडे खूप खूप पहात राहिली, पण तरीही तिचे समाधान होईना. त्याच्या साखरेसारख्या तोंडाचे तिने चुंबन घेतले, आपल्या शुभ्र उराशी त्याला कवटाळले, पण तिचा लाडका तसाच झोपून राहिला; त्याला जाग आली नाही. सकाळ झाली, पण तरीही मार्यूष्का आपल्या प्रियकराला जागा करू शकली नाही.

तो सबंध दिवसभर तिने काम केले आणि संध्याकाळी तिने आपली चांदीची चौकट आणि सोनेरी सुई हाती घेतली. सुई शिवणकाम करीत होती तेव्हा मार्यूष्का बोलत राहिली:

"छोटचा टुवाला, कशिदा काढून घे, कशिदा काढून घे, माझा तेजस्वी बहिरीससाणा फीनिस्त तोंड पुसायला तुला वापरू दे!"

राणीने तिचे बोलणे आडून ऐकले व ती म्हणाली:

"मार्यूष्का, तुझी चांदीची चौकट आणि सोन्याची सुई मला विक."

"मी विकणार नाही," मार्यूष्का उत्तरली, "पण तेजस्वी बहिरीससाणा फीनिस्तला भेटू दिलंत, तर मी ह्या वस्तू तुम्हाला मोफत देईन."

राणीने बराच विचार केला, पण शेवटी ती म्हणाली: "ठीक आहे, तुझ्या मनासारखं होईल. आज रात्री त्याला येऊन भेट."

रात्र झाली आणि मार्यूष्का शयनखोलीत शिरली. पण तिचा तेजस्वी बहिरीससाणा फीनिस्त गाढ झोपलेला तिला आढळला.

"माझ्या फीनिस्त, तेजस्वी बहिरीससाण्या, ऊठ, जागा हो!"

पण तिचा फीनिस्त नेहमीप्रमाणे गाढ झोपला होता आणि मार्यूष्काने कितीही प्रयत्न केले तरी त्याला ती जागा करू शकली नाही.

दिवस उजाडल्यावर मार्यूष्का कामाला लागली व तिने आपली चांदीची चरकी आणि सोन्याची चाती बाहेर काढली. राणीने त्या वस्तू पाहिल्या व त्यांना ती विकत मागू लागली. पण मार्यूष्का उत्तरली:

"मी ह्या वस्तू विकणार नाही, पण तेजस्वी बहिरीससाणा फीनिस्तला जर भेटू दिलंत तर त्या मी तुम्हाला मोफत देईन."

"ठीक आहे," राणी म्हणाली आणि तिने स्वतःशी विचार केला:

"काही झालं तरी ही त्याला जागं करू शकणार नाही."

रात्र झाली व मार्यूष्का शयनखोलीत शिरली, पण फीनिस्त नेहमीप्रमाणे झोपलेला होता. "माझ्या फीनिस्त, तेजस्वी बहिरीससाण्या, ऊठ, जागा हो!"

पण फीनिस्त झोपूनच राहिला व जागा होईना.

त्याला उठविण्याचे मार्यूष्काने पुनःपुन्हा प्रयत्न केले, पण तिला ते जमेना. आता लौकरच सकाळ झाली असती. मार्यूष्काला जोरात रडू कोसळले आणि ती म्हणाली: "प्रियतम फीनिस्त, ऊठ आणि तुझे डोळे उघड, तुझ्या मार्यूष्काकडं पहा, तिला घट्ट कवटाळ!"

आणि एक कढत अश्रू मार्यूष्काच्या डोळ्यांमधून फीनिस्तच्या उघडय
खांद्यावर टपकला व त्याला चटका बसला. तेजस्वी बहिरीससाणा फीनिस्त
अंगाची हालचाल केली व त्याने डोळे उघडले तेव्हा त्याला मार्यूष्का दिसली
मग त्याने तिला आपल्या बाहुपाशात कवटाळले व तिची चुंबने घेतली

"माझी मार्यूष्का तूच आहेस का? तीन लोखंडी बुटांच्या जोडय
झिजवल्यास, तीन लोखंडी दांडे मोडलेस आणि तीन लोखंडी टोप्या फाडल्यास
आता अधिक रडू नको. आता आपण घरी जाऊ!"

आणि घराकडे परत जाण्याच्या प्रवासाची ते तयारी करू लागले. पण
राणीच्या हे ध्यानात आले आणि तिने दवंडी पिटवून सबंध राज्यात तिच्य
नवऱ्याच्या विश्वासघातकी वर्तनाची बातमी पसरविली.

तिच्या राज्यातील सर्व सरदार आणि धनिक व्यापाऱ्यांची बैठक भरली
तेजस्वी बहिरीससाणा फीनिस्तला कशा प्रकारे शासन करावे ह्याबद्दल त्यांच
विचारविनिमय सुरू झाला.

मग तेजस्वी बहिरीससाणा फीनिस्त उठून उभा राहिला व म्हणाला

"खरी बायको कोण असं तुम्हाला वाटतं? जी माझ्यावर खरंखुरं प्रेम
करते ती, अथवा जी मला विकते आणि माझा विश्वासघात करते ती?"

फक्त मार्यूष्काच त्याची बायको व्हायला लायक होती, हे प्रत्येकाल
मान्य करावे लागले.

त्यानंतर ते आपल्या देशात परत गेले. तेथे त्यांनी थाटात मेजवानी
दिली. त्यांच्या लग्नाच्या वेळी तोफांनी सलामी दिली, तुताऱ्या वाजल्या
त्यांची मेजवानी एवढी भव्य होती की, अजूनही तिची आठवण काढण्यात
ते. त्यानंतर ती दोघे सुखाने जगू लागली.



बहीण आल्योनुष्का आणि भाऊ इवानुष्का

को णे एके काळी रहात होते एक म्हातारे जोडपे. त्या जोडप्याला आल्योनुष्का नांवाची एक मुलगी होती व इवानुष्का नांवाचा एक लहान मुलगा होता.

म्हातारा आणि म्हातारी मरण पावले व आल्योनुष्का आणि इवानुष्का जगात एकाकी पडले.

आल्योनुष्का काम करण्यासाठी बाहेर निघाली. आपल्या छोटचा भावाला तिने सांगाती घेतले. त्यांना खूप दूर जायचे होते. वाटेत एक शेत ओलांडत असताना इवानुष्काला तहान लागली.

"आल्योनुष्काताई, मला तहान लागलीय," तो म्हणाला.

"भाऊराया, जरा दम धर. लौकरच आपण विहीरीपाशी पोहचू."

बराच वेळपर्यंत ते चालत राहिले. आता सूर्य माथ्यावर आला होता. हवा तापली होती आणि कोरडी पडली होती. पाण्याने भरलेल्या एका गायीच्या खुरापाशी ते आले.

"आल्योनुष्काताई, ह्या खुरामधलं पाणी मी पिऊ का?"

"नको रे भाऊराया, तू वासरू बनशील!"

छोटचा इवानुष्काने बहिणीचे ऐकले व ते आणखी थोडे अंतर पुढे चालत गेले.

सूर्य आणखी वर चढला होता. हवा खूप गरम आणि कोरडी होती. पाण्याने भरलेल्या एका घोडचाच्या खुरापाशी ते आले.

"आल्योनुष्काताई, ह्या खुरामधलं पाणी मी पिऊ का?"

"नको रे भाऊराया, तू शिंगरू बनशील!"

इवानुष्काने एक उसासा टाकला व ते पुढे चालू लागले.

असे बरेच अंतर ते चालत राहिले. आकाशात सूर्य अजून चांगलाच तळपत होता. हवा गरम आणि कोरडी होती. पाण्याने भरलेल्या एका बकऱ्याच्या खुरापाशी ते आले.

"आल्योनुष्काताई. तहानेनं माझा जीव अगदी कासावीस झालाय. मी ह्या खुरामधलं पाणी पिऊ का?" इवानुष्काने विचारले.

"नको रे भाऊराया, तू करडू बनशील!"

पण इवानुष्काने आपल्या बहिणीचे सांगणे मानले नाही व बकऱ्याच्या खुरामधले पाणी तो प्यायला.

ज्या क्षणी तो पाणी प्यायला त्याच क्षणी तो करडू बनला.

आल्योनुष्काने आपल्या भावाला हाक मारली तेव्हा इवानुष्काऐवजी एक छोटे पांढरे करडू तिच्यापाशी धावत आले.

आल्योनुष्काच्या डोळ्यांमधून आसवांच्या धारा वाहू लागल्या. जमिनीवर बसकण घालून ती हुंदके देऊ लागली. ते करडू तिच्या भोवती बागडू लागले.

तेवढ्यात योगायोगाने एक व्यापारी तेथे आला.

"हे सुंदर मुली, तू का रडतेस?" त्याने विचारले.

आल्योनुष्काने त्याला आपले दुःख सांगितले.

व्यापारी म्हणाला: "हे सुंदरी, माझ्याशी लग्न कर. तुला मी सोन्याचांदीनं मढवीन. आणि हे करडू आपल्याबरोबर राहील."

आल्योनुष्काने थोडा वेळ विचार केला व व्यापाऱ्याशी लग्न करायला होकार दिला.

ते सुखाने एकत्र राहू लागले. करडू त्यांच्याबरोबर रहात होते व आल्योनुष्काच्या ताटात एकत्र खातपीत होते.

एके दिवशी व्यापारी घरापासून दूर गेला होता. आणि अचानक कुठूनतरी एक चेटकीण तेथे अवतरली. ती आल्योनुष्काच्या खिडकीखाली उभी राहिली व नदीवर आपल्याबरोबर आंघोळीला चल म्हणून आल्योनुष्का-

ला लाडीगोडी लावू लागली.

आल्योनुष्का चेटकिणीपाठोपाठ नदीवर गेली. त्या दोघी नदीवर पोहोचल्या तेव्हा चेटकिणीने आल्योनुष्कावर झडप घातली, तिच्या गळ्या-भोवती दगड बांधला आणि तिला नदीत फेकून दिले.

नंतर चेटकिणीने स्वतः आल्योनुष्काचे रूप घेतले, तिचे कपडे अंगात घातले व तिच्या घरी ती गेली. ती चेटकीण होती हे कुणाच्याही ध्यानात आले नाही. व्यापारी घरी परतला आणि त्याच्यासुद्धा लक्षात आले नाही.

पण जे काही घडले होते ते फक्त करडू जाणत होते. मान खाली घालून ते वावरू लागले. अन्न-पाण्याला ते स्पर्श करीना. सकाळ-संध्याकाळ नदीतीरापाशी जाऊन ते साद घालू लागले.

"लाडक्या आल्योनुष्काताई लौकर ये!
पाण्यातून पोहत माझ्यापाशी ये!"

चेटकिणीला जेव्हा हे समजले तेव्हा ह्या छोटचा बकऱ्याला ठार मारावे असा तिने नवऱ्यापाठी लकडा लावला.

व्यापाऱ्याला करडाची दया आली. त्याला त्याचा खूप लळा लागला होता. पण चेटकीण व्यापाऱ्यापाशी एवढी लाडीगोडी लावीत राहिली, की सरतेशेवटी तो तिला वश झाला.

"ठीक आहे, मार ठार त्याला!" तो म्हणाला.

चेटकिणीने मोठी चूल पेटविली, मोठे हंडे तापत ठेवले आणि मोठे सुरे धार लावून लखलखीत केले.

आपल्याला ठार मारणार आहेत ही बातमी करडाला समजली तेव्हा ते आपल्या धर्मपित्यापाशी जाऊन म्हणाले:

"मरणापूर्वी नदीवर जाऊन शेवटचं पाणी प्यायची मला परवानगी द्या!"

"जा," व्यापारी म्हणाला.

करडू नदीवर पळत गेले आणि तीरापाशी उभे राहून केविलवाण्या आवाजात ओरडले:

"लाडक्या आल्योनुष्काताई
लौकर ये!
पाण्यातून पोहत माझ्यापाशी ये!
चुली पेटल्यात धडाधडा,
हंडे उकळतात भडाभडा,
सुरे परजतात खणाखणा,
मारणार मला कचाकचा!"

पिंगट-करडा घोडा

कोणे एके काळची गोष्ट. एक होता म्हातारा. त्याला तीन मुलगे होते. दोघे थोरले मुलगे झकपक पोषाख करीत व ते अत्यंत व्यवहारी शेतकरी होते. पण सर्वात धाकट्यापाशी, मूर्ख इवानपाशी, ह्यांपैकी कोणताही गुण नव्हता. बहुतेक सारा वेळ तो घरातील चुलाण्याच्या काठाशी बसून राही, अथवा जंगलात अळंब्या गोळा करायला जाई.

म्हाताऱ्याचे मरण जवळ आले तेव्हा त्याने आपल्या तीनही मुलांना बोलावून घेतले व तो म्हणाला:

"जेव्हा मी मरीन तेव्हा तुम्ही माझ्या थडग्यापाशी ओळीनं तीन रात्री आलं पाहिजे आणि मला खाण्यासाठी थोडा पाव आणला पाहिजे."

म्हातारा मेला आणि त्याला पुरण्यात आले. रात्र झाली व म्हाताऱ्याच्या थडग्यापाशी सर्वात मोठ्या मुलाने जाण्याची वेळ झाली. पण तो तरुण माणूस खूप आळशी होता, अथवा स्मशानात जायला खूप घाबरत होता. म्हणून तो मूर्ख इवानला म्हणाला:

"इवान, आज रात्री जर तू माझ्याऐवजी आपल्या वडलांच्या थडग्यापाशी गेलास, तर मी तुला एक केक विकत घेऊन देईन."

इवान ताबडतोब कबूल झाला. त्याने थोडा पाव बरोबर घेतला व तो आपल्या वडिलांच्या थडग्यापाशी पोहोचला. थडग्याजवळ बसून पुढे काय घडते याची तो वाट पाहू लागला. मध्यरात्रीच्या ठोक्याला जमीन दुभंगली व थडग्यामधून म्हातारे वडील उठत म्हणाले:

"कोण आहे तिथं? माझा पहिला मुलगा का? रूसची परिस्थिती कशी आहे? कुत्री भुंकतात, लांडगे ओरडतात अथवा माझं बाळ रडतंय?"

इवान उत्तरला:

"बाबा, मी आहे, तुमचा मुलगा! आणि रूसमध्ये सारं काही शांत आहे."

मग इवानने आणलेला पाव वडिलांनी पोटभर खाल्ला आणि ते परत थडग्यात निजले. इवान घरी परतला. मात्र वाटेत अळंब्या गोळा करण्यासाठी तो थोडा वेळ थांबला.

जेव्हा तो घरी आला तेव्हा त्याच्या सर्वात मोठचा भावाने विचारले:

"आपल्या वडलांना तू पाहिलंस?"

"होय, पाहिलं," इवान उत्तरला.

"तू घेऊन गेलेला पाव त्यांनी खाल्ला?"

"होय. अगदी पोटभर खाल्ला!"

आणखी एक दिवस उलटला व दुसऱ्या भावाची थडग्याकडे जाण्याची पाळी आली. पण तो खूप आळशी होता, अथवा त्याला स्मशानात जाण्याची खूप भीती वाटत होती. म्हणून तो इवानला म्हणाला:

"इवान, जर माझ्याऐवजी तू गेलास, तर मी तुला सालीच्या बुटांची जोडी बनवून देईन."

"ठीक आहे," इवान म्हणाला, "मी जाईन."

त्याने थोडा पाव घेतला व आपल्या वडिलांच्या थडग्यापाशी जाऊन तो वाट पहात बसला. मध्यरात्रीच्या ठोक्याला जमीन दुभंगली, म्हातारे वडील थडग्यातून उठले व म्हणाले:

"कोण आहे तिथं? माझा दुसरा मुलगा का? रूसची परिस्थिती कशी आहे? कुत्री भुंकतात, लांडगे ओरडतात, अथवा माझं बाळ रडतंय?"

इवान उत्तरला:

"बाबा, मी तुमचा मुलगा आणि रूसमध्ये सारं काही शांत आहे."

मग इवानने आणलेला पाव वडिलांनी पोटभर खाल्ला व ते परत थडग्यात निजले. इवान घरी परतला. वाटेत काही अळंब्या गोळा करायला तो थांबला. घरी आल्यानंतर त्याच्या मधल्या भावाने त्याला विचारले:

"तू नेलेला पाव आपल्या वडलांनी खाल्ला का?"

"होय," इवान उत्तरला. "त्यांनी अगदी पोटभर खाल्ला."

तिसऱ्या रात्री थडग्याकडे जाण्याची इवानची पाळी होती. तो आपल्या भावांना म्हणाला:

"दोन रात्री मी आपल्या वडलांच्या थडग्याकडं गेलो. आता जायची तुमची पाळी. मी घरी बसून विश्रांती घेतो."

"छेः, छेः" भाऊ म्हणाले. "इवान, तूच परत गेलं पाहिजे, कारण तुला तिथं जायची सवय झालीय."

"ठीक आहे," इवान कबूल झाला. "मी जाईन."

त्याने थोडा पाव घेतला व तो थडग्यापाशी गेला. मध्यरात्रीच्या ठोक्याला जमीन दुभंगली आणि म्हातारे वडील थडग्यामधून उठले.

"कोण आहे तिथं?" त्यांनी विचारले. "माझा तिसरा मुलगा का? रूसची परिस्थिती कशी आहे? कुत्री भुंकतात, लांडगे ओरडतात, अथवा माझं बाळ रडतंय?"

आणि इवान उत्तरला:

"बाबा, मी तुमचा मुलगा. आणि रूसमध्ये सारं काही शांत आहे."

इवानने आणलेला पाव वडिलांनी पोटभर खाल्ला व ते त्याला म्हणाले:

"इवान, माझ्या आज्ञेचं पालन तू फक्त एकट्यानंच केलंस. तीन रात्री माझ्या थडग्यापाशी यायला तू घाबरला नाहीस. आता उघड्या मैदानांमध्ये जा आणि मोठ्यांदा ओरड: 'पिंगट-करड्या घोड्या, ऐक माझी आज्ञा! जवळ ये लौकर, इच्छा माझी पुरी कर!' जेव्हा घोडा तुझ्या समोर उभा राहील तेव्हा त्याच्या उजव्या कानातून आत जा आणि डाव्या कानातून बाहेर पड. म्हणजे तुझं अत्यंत देखण्या तरुणात रूपांतर होईल. मग घोड्यावर स्वार हो आणि तुला हवं तिकडं जा."

वडिलांनी दिलेला लगाम इवानने हाती घेतला, त्यांचे आभार मानले व वाटेत थोड्या अळंब्या गोळा करायला थांबून पुढे तो घरी गेला. घरी त्याला त्याच्या भावांनी विचारले:

"इवान, तुला आपले वडील भेटले?"

"होय," इवान उत्तरला.

"तू नेलेला पाव त्यांनी खाल्ला?"

"होय, त्यांनी पोटभर पाव खाल्ला आणि परत कधी थडग्यापाशी येऊ नकोस असं मला सांगितलं."

त्याचवेळी झारने देशोदेशी दवंडी पिटली होती की, सर्व देखण्या, अविवाहित तरुणांनी त्याच्या दरबारात हजर व्हावे. झारची मुलगी राजकन्या

सुंदरी हिने स्वतःसाठी बारा खांबांचा आणि ओकच्या ओंडक्यांच्या बारा थरांचा किल्ला बांधण्याचा हुकूम केला होता. ह्या किल्ल्याच्या सर्वात उंच दालनात ती गवाक्षात बसणार होती व कोणता शूर पुरुष घोड्यावरून तिच्या गवाक्षापाशी झेप घेऊन तिच्या ओठांचे चुंबन घेतो, ह्याची वाट पाहणार होती. ज्या कुणाला ह्यात यश येणार होते – मग तो उच्च वा नीच कुळातील असो – त्याच्याशी झार आपली मुलगी राजकन्या सुंदरी हिचा विवाह करून देणार होता व शिवाय अर्धे राज्य बक्षीस देणार होता.

इवानच्या भावांच्या कानांपर्यंत ही बातमी येऊन पोहोचली व त्या दोघांनी आपले नशीब अजमावून पाहण्याचे ठरविले.

त्यांनी आपल्या उमद्या घोड्यांना कसदार ओट खाऊ घातले, त्यांना तबेल्यांमधून बाहेर काढले, स्वतः ऐटबाज पोषाख केले. चुलाण्याच्या कडेशी धुरांड्यामागे बसलेला इवान त्यांना म्हणाला:

"बंधूंनो, मला तुमच्याबरोबर घेऊन चला ना! माझंही नशीब मला अजमावून बघू दे!"

"अरे चुलाण्यावरच्या मूर्खा!" हसून ते म्हणाले. "आमच्याबरोबर तू आलास तर तुझी फक्त टिंगलच होईल. त्यापेक्षा जंगलात जाऊन अळंब्या गोळा कर."

दोघे भाऊ आपल्या उमद्या घोड्यांवर स्वार झाले, आपल्या डोक्यावरील टोप्या त्यांनी ऐटीत तिरप्या बसविल्या, शीळ घालून मोठ्यांदा आरोळी ठोकली व धुळीचा लोट उठवीत रस्त्यावरून ते दौडत गेले. वडिलांनी दिलेला लगाम घेऊन इवान मोकळ्या मैदानात गेला आणि वडिलांनी शिकविल्याप्रमाणे मोठ्यांदा ओरडला:

"पिंगट-करडया घोडया, ऐक माझी आज्ञा! जवळ ये लौकर, इच्छा माझी पुरी कर!"

आणि पाहतो तो काय! एक लढाऊ घोडा त्याच्याकडे धावत आला. त्याच्या टापांखाली जमीन हादरत होती, त्याच्या नाकपुडयांमधून ज्वाला बाहेर पडत होती, त्याच्या कानांमधून धुराचे लोट उमटत होते. तो लढाऊ घोडा इवानपाशी दौडत गेला व म्हणाला:

"इवान, तुझी काय इच्छा आहे?"

इवानने घोडयाची मान थोपटली, त्याला लगाम घातला, त्याच्या उजव्या कानामधून चढून डाव्या कानामधून तो बाहेर पडला आणि काय! पहाटेच्या वेळी आकाश जसे सुंदर दिसते तशा अत्यंत देखण्या तरुणात त्याचे रूपांतर झाले. पिंगट-करडया घोडयाच्या पाठीवर स्वार होऊन इवान झारच्या राजवाडयाकडे निघाला.

सरतेशेवटी इवान दरबारात पोहोचला तेव्हा राजवाडयाचे आवार माणसांनी फुलून गेले होते. तेथे बारा खांबांचा आणि ओकच्या ओंडक्यांच्या बारा थरांचा किल्ला उभा होता व त्या किल्ल्याच्या सर्वात उंच दालनाच्या गवाक्षात राजकन्या सुंदरी बसली होती.

झार राजवाडयाच्या प्रांगणात येऊन म्हणाला:

"तरुण पुरुषांनो, तुमच्यातला जो कुणी घोडयावरून त्या गवाक्षापर्यंत उंच झेप घेईल आणि माझ्या मुलीच्या ओठांचं चुंबन घेईल, त्याच्याशी मी माझ्या मुलीचं लग्न करीन, शिवाय त्याला अर्धं राज्य बक्षीस देईन."

राजकन्या सुंदरीची अभिलाषा धरणारे तरुण पुरुष एका पाठोपाठ दौडत येत होते, पण दुर्दैवाने त्यांची झेप गवाक्षापर्यंत पोहोचत नव्हती. इतरांप्रमाणे इवानच्या दोन भावांनीही प्रयत्न केले, पण त्यांनाही यश लाभले नव्हते.

जेव्हा इवानची पाळी आली तेव्हा त्याने पिंगट-करडया घोडयाला जोरात पिटाळले व एक मोठी आरोळी ठोकून वर झेप घेतली. पण अगदी वरच्या थरापेक्षा दोन ओंडके खालपर्यंत तो पोहोचला. परत त्याने प्रयत्न केला तेव्हा एका थराने तो तोकडा पडला. आता आणखी एकच संधी उरली होती. त्याने पिंगट-करडया घोडयाला एवढया जोरात दौडायला लावले की, त्याच्या अंगामधून वाफा निघू लागल्या. मग आगीच्या लोळाप्रमाणे तो गवाक्षावर झेपावला. त्या झेपेसरशी तो गवाक्षापर्यंत पोहोचला व राजकन्या सुंदरीच्या मधुर-गोड ओठांवर त्याने आपले ओठ टेकविले. आणि राजकन्येने तात्काळ आपल्या राजचिन्हाच्या अंगठीने त्याच्या भुवईवर प्रहार करून तेथे आपली निशाणी उमटविली.

लोक गरजले: "धरा त्याला! थांबवा त्याला!" पण इवान आणि त्याचा घोडा धुळीच्या लोटात अदृश्य झाले.

उघडया मैदानात ते दौडत आले. इवान पिंगट-करडया घोडयाच्या डाव्या कानामधून आत गेला व उजव्या कानामधून बाहेर पडला. आणि काय! परत त्याला त्याचे नेहमीचे रूप प्राप्त झाले. मग त्याने पिंगट-करडया घोडयाला मोकळे सोडले आणि स्वतः वाटेत काही अळंब्या गोळा करून तो घरी परतला. घरात आल्यावर त्याने आपल्या कपाळावर एक चिंधी बांधली व चुलाण्याच्या कट्टयावर चढून नेहमीप्रमाणे तेथे तो पडून राहिला. काही काळानंतर त्याचे भाऊ घरी आले व त्याला सर्व हकीकत सांगू लागले.

"राजकन्येचे खूप चाहते होते आणि ते देखणेही होते," ते म्हणाले, "पण त्यांपैकी एकानं सर्वांना फिकं पाडलं. आपल्या पाणीदार घोड्यावरून त्यानं राजकुमारीच्या गवाक्षाकडं झेप घेतली आणि तिच्या ओठांचं चुंबन घेतलं. आम्ही त्याला येताना पाहिलं, पण जाताना कधीच पाहिलं नाही."

धुराड्यापाठीमागील आपल्या बैठकीवरून इवान म्हणाला: "कदाचित तुम्ही मला पाहिलं असेल." त्याचे भाऊ एकदम चिडले आणि म्हणाले:

"मूर्खा, तुझी बावळट बडबड बंद कर! बैस तुझ्या चुलाण्यावर मुकाट आणि खा तुझ्या अळंब्या!"

मग इवानने कपाळावरची चिंधी सोडली व राजकुमारीने शिक्क्याच्या अंगठीने उमटवलेली निशाणी उघडी केली. तात्काळ झोपडीत तेजस्वी प्रकाश उजळला. भाऊ घाबरून ओरडले:

"मूर्खा, तू काय करतो आहेस? घर जाळून टाकशील!"

दुसऱ्या दिवशी झारने प्रचंड मेजवानी आयोजित केली होती व आपल्या सर्व प्रजाजनांना, सरदार-उमरावांना, सामान्य माणसांना, गरीब व श्रीमंतांना, तरुणांना व म्हाताऱ्यांना, मेजवानीला बोलाविले होते.

इवानच्या भावांनीही मेजवानीला जाण्याची तयारी केली.

"बंधूंनो, मला बरोबर घेऊन जा ना!" इवानने विनवणी केली.

"काय?" ते हसले. "तुला पाहणारे तुझी फक्त टिंगल करतील. इथं तुझ्या चुलाण्यावर मुकाट बैस आणि अळंब्या खा!"

भाऊ आपल्या उमद्या घोड्यांवर स्वार झाले व दौडत निघून गेले. इवान त्यांच्या पाठोपाठ पायी चालत निघाला. झारच्या राजवाड्यात पोहोचल्यानंतर तो एका दूर कोपऱ्यात बसला. राजकुमारी सुंदरी आता सर्व पाहुण्यांमधून फिरू लागली. ती प्रत्येकाला मधाच्या पेयाचा प्याला देत होती व आपल्या अंगठीचा शिक्का कुणाच्या भुवईवर उमटलाय त्याचा शोध घेत होती. इवान सोडून बाकी सर्व पाहुण्यांना तिने एव्हाना पेय दिले होते. जेव्हा

ती त्याच्यापाशी आली तेव्हा तिचे काळीज एकदम लकाकले. इवानचे सर्वांग काजळीने माखले होते आणि त्याचे केस ताठ उभे झाले होते.

राजकन्या सुंदरी म्हणाली:

"आपण कोण आहात? कुठून आलात? आणि तुमच्या भुवईवर ती चिंधी का बांधलेली आहे?"

"मी पडलो तेव्हा मला दुखापत झाली," इवान उत्तरला.

राजकन्येने चिंधी सोडली व तात्काळ राजवाडा तेजस्वी प्रकाशाने उजळून निघाला.

"हा तर माझा शिक्का!" राजकन्या ओरडली. "हा पहा माझा भावी पती!"

झार इवानपाशी आला. इवानला आपादमस्तक न्याहाळून तो म्हणाला

"छेः, छेः, राजकन्या सुंदरी! हा तुझा पती असणं शक्यच नाही! हा सबंध काजळीनं माखलाय आणि अगदीच सामान्य रूपाचा आहे."

तेव्हा इवान झारला म्हणाला:

"माझं तोंड धुण्याची मला परवानगी द्या झार."

झारने त्याला तसे करायला परवानगी दिली. इवान राजवाड्याच्य आवारात बाहेर आला व त्याच्या वडिलांनी शिकविले होते त्याप्रमाणे मोठ्यांद ओरडला:

"पिंगट-करड्या घोड्या, ऐक माझी आज्ञा! जवळ माझ्या ये लौकर इच्छा माझी पुरी कर!"

आणि काय! पिंगट-करडा घोडा दौडत त्याच्यापाशी आला. त्याच्य टापांखाली जमीन हादरत होती, त्याच्या नाकपुड्यांमधून ज्वाला उमटत होती, त्याच्या कानांमधून धुराचे लोट निघत होते: इवान त्याच्या उजव्य कानामधून आत गेला व डाव्या कानामधून बाहेर पडला. पुन्हा त्याचे पहाटे च्या आकाशाप्रमाणे सुंदर अशा तरुणात रूपांतर झाले. राजवाड्यामधील सर्व लोकांनी जेव्हा त्याला पाहिले तेव्हा त्यांच्या तोंडून एकदम आश्चर्याच चीत्कार उमटला.

त्यानंतर शब्द वाया घालविण्यात आले नाहीत.

इवानचे राजकन्या सुंदरीबरोबर लग्न लागले व त्यांच्या लग्नानिमित्त राजवाड्यात थाटात मेजवानी झडली.

हिम-आजोबा

कोणे एके काळी रहात होता एक म्हातारा. त्याची पहिली बायको मेली म्हणून त्याने दुसरी बायको केली होती. त्याला पहिल्या बायकोपासून एक मुलगी होती व दुसऱ्या बायकोलाही एक मुलगी होती.

सावत्र माता कशा असतात ते प्रत्येकाला माहीत आहेच. तुम्ही चूक केलीत तर मार बसतो आणि बरोबर वागलात तरीही मार बसतो. पण सावत्र आईच्या मुलीची गोष्ट वेगळी असते. तिचे फाजील लाड होतात आणि ती कशीही वागली तरी तिचे कौतुक होत राहते.

म्हाताऱ्याची मुलगी पहाटेच उठायची, गुरांना चारा-पाणी द्यायची, घरात सर्पण आणायची व पाणी भरायची, चुलाणा पेटवायची व फरशी झाडायची. पण तिची सावत्र आई प्रत्येक बाबतीत दोष काढीत बसायची, तक्रार करायची आणि सबंध दिवसभर तिला रागे भरायची.

वारा जोराने घूं घूं आवाज करतो आणि नंतर पडतो. पण म्हातारी बाई एकदा उसळली म्हणजे काही केल्या शांत होत नाही. सावत्र आईने मनाशी घेतले की, सावत्र मुलीचा काटा काढायचा.

"ए म्हाताऱ्या, घेऊन जा इथून दूर तिला," ती आपल्या नवऱ्याला म्हणाली. "मला तिचं दर्शनसुद्धा सहन होत नाही. चावऱ्या थंडीत तिला जंगलात घेऊन जा आणि तिथंच सोडून ये."

म्हातारा रडला, खूप दुःखी बनला. पण तो काहीही करू शकत नव्हता ह्याची त्याला जाणीव होती. म्हणून त्याने घसरगाडीला घोडा जुंपला व आपल्या मुलीला बोलाविले: "चल माझ्या पोरी, बैस घसरगाडीत."

त्या घर नसलेल्या मुलीला तो रानात घेऊन गेला. एका भल्या मोठ्या देवदाराच्या झाडाखाली हिमखंडावर त्याने तिला टाकले व तो घरी परतला.

कडाक्याची थंडी होती आणि देवदाराखाली बसलेली ती मुलगी कुडकुडत होती. अचानक तिने फांद्यांचा कडकड आवाज ऐकला.. हिम-आजोबा झाडां-वरून उड्या मारीत होता, कडकड आणि तडतड आवाज करीत होता. ती ज्या झाडाखाली बसली होती त्या झाडावर तो क्षणात उडी मारून आला.

"पोरी, तुला ऊब लागतेय ना?" त्याने विचारले.

"होय, हिम-आजोबा, मला खूप उबदार वाटतंय."

मग हिम-आजोबा आणखी खाली आला. त्याची कडकड आणि तडतड आता जास्तच मोठ्यांदा ऐकू येत होती.

"पोरी, तुला ऊब लागतेय ना?" त्याने पुन्हा विचारले. "सुंदर मुली, तुला उबदार वाटतंय ना?"

त्या मुलीला श्वास घेणे अवघड झाले होते, पण तरीही ती म्हणाली:

"होय, हिम-आजोबा, मला खूप उबदार वाटतंय!"

आणि हिम-आजोबा आणखी खाली आला. आता त्याची प्रचंड कडकड आणि तडतड ऐकू येत होती.

"पोरी, ऊब लागतेय ना?" त्याने विचारले. "सुंदर मुली, उबदार वाटतंय ना? लाडके, छान ऊब आहे ना?"

मुलगी थंडीमुळे बधीर होत चालली होती आणि जीभ हलविणे तिला जेमतेम जमत होते. पण तरीही ती म्हणाली:

"भले हिम-आजोबा, मला खूप छान ऊब मिळतेय!"

हिम-आजोबाला त्या मुलीची दया आली. त्याने आपल्या केसाळ कातडचांमध्ये आणि पिसांच्या दुलयांमध्ये तिला गुंडाळले.

दरम्यान इकडे म्हातारी श्राद्धाचे जेवण बनवीत होती. आपल्या सावत्र मुलीच्या आठवणीदाखल ब्लिनी बनवीत होती. आपल्या नवऱ्याला ती म्हणाली:

"ए थेरडचा, जंगलात जा आणि तुझ्या पोरीला परत आण दफन करायला!"

म्हातारा रानात गेला आणि ज्या ठिकाणी त्याने मुलीला सोडले होते त्याच ठिकाणी ती अत्यंत आनंदात बसलेली त्याला आढळली. तिचा चेहरा सुंदर गुलाबी बनला होता. तिच्या अंगात भारी केसाळ कातडीचा कोट होता, सोन्याचांदीच्या अलंकारांनी ती नटली होती. शिवाय उत्तमोत्तम भेटवस्तूंनी भरलेली एक मोठी पेटी तिच्याशेजारी उभी होती.

म्हाताऱ्याला अतिशय आनंद झाला. त्याने मुलीला घसरगाडीत बसविले, तिची पेटी तिच्या शेजारी ठेवली व तिला घरी आणले.

म्हातारी ब्लिनी बनवीत होती. अचानक तिने आपल्या छोटचा कुत्र्याचा आवाज ऐकला: "भौ-वौ! धनवान सुंदर नवरी बनली मुलगी म्हाताऱ्याची, कुवारी राहणार सदा मुलगी म्हातारीची!"

म्हातारीने ब्लिनी कुत्र्यापुढे टाकीत म्हटले:

"कुत्र्या, तू चुकीचं बोलतो आहेस! तू म्हटलं पाहिजे:

"म्हातारीच्या पोरीला झक्कास नवरा मिळणार, म्हाताऱ्याच्या पोरीचा मुडदा मातीत आम्ही पुरणार!"

कुत्र्याने ब्लिनी खाल्ली, पण तरीही तो म्हणाला: "भौ-वौ! धनवान सुंदर नवरी बनली मुलगी म्हाताऱ्याची, कुवारी राहणार सदा मुलगी म्हातारीची!"

म्हातारीने कुत्र्यापुढे आणखी ब्लिनी फेकल्या, तिने त्याला खूप मार दिला, पण तरीही कुत्रा पूर्वीप्रमाणेच म्हणत राहिला.

अचानक फाटक करकरले, दार उघडले आणि चमचमत्या सोनेरी-रुपेरी पोषाखामधील म्हाताऱ्याच्या मुलीने घरात प्रवेश केला. तिच्या पाठोपाठ तिचा बाप मौल्यवान भेटवस्तूंनी भरलेली भली मोठी पेटी घेऊन आला. म्हातारी हे दृश्य पाहून कमालीची निराश झाली.

"ए थेरड्या, घोड्याला जुंप!." ती नवऱ्याला म्हणाली. "माझ्या मुलीला रानात घेऊन जा आणि तुझ्या पोरटीला ठेवलं होतंस तिथंच सोडून ये!"

म्हाताऱ्याने म्हातारीच्या पोरीला घसरगाडीत बसविले, रानात त्याच ठिकाणी तिला नेऊन सोडले व तो घरी परतला.

म्हातारीची मुलगी देवदाराच्या झाडाखाली थंडीत कुडकुडत बसली होती. तिचे दात कडकडा वाजत होते.

दरम्यान झाडांवरून उड्या मारीत हिम-आजोबा तेथे येऊन ठेपला. म्हातारीची मुलगी त्याच्या दृष्टीला पडली. "पोरी, तुला ऊब लागतेय?"

"मुळीच नाही, मला खूप थंडी वाजतेय! एवढी कडकड आणि तडतड करू नकोस!"

हिम-आजोबा आणखी खाली आला व त्याने जोरजोराने तडतड-कडकड केली.

"पोरी, तुला ऊब मिळतेय?" त्याने विचारले.

"मुळीच नाही," ती म्हणाली. "माझं सगळं शरीर बधीर झालंय. चालता हो इथून!"

पण हिम-आजोबा आणखीच खाली आला. त्याच्या तोंडातून थंडीचे भपकारे बाहेर पडू लागले.

"पोरी, उबदार वाटतंय?" त्याने परत विचारले. "सुंदर मुली,

तुला छान उबदार वाटतंय ? "

"नाही, नाही!" ती ओरडली, "मी पुरती गोठलेय! म्हाताऱ्या, तुला प्लेग होवो!"

पण हिम-आजोबाला ह्या शब्दांचा एवढा राग आला की, त्याने सर्व शक्तीनिशी तिला गच्च धरले व म्हातारीच्या मुलीला गोठवून ठार केले.

दिवस नुकता उगवला होता, तोच म्हातारी नवऱ्याला म्हणाली:

"ए थेरड्या, लौकर लौकर घोडा जुंप गाडीला! जा आणि सोन्या-रुप्यानं मढलेल्या माझ्या पोरीला घेऊन ये!"

म्हातारा गाडी घेऊन गेला आणि टेबलाखाली बसलेला छोटा कुत्रा म्हणाला: "भौ-वौ! म्हाताऱ्याच्या पोरीचं लगीन होणार दणकून, पण म्हातारीची मुलगी मेली गारठून!"

म्हातारीने कुत्र्यापुढे ब्लिनी फेकत म्हटले: "अरे कुत्र्या, तू चुकीचं बोलतोस! तू म्हटलं पाहिजेस: "धनवान सुंदर नवरी बनली मुलगी म्हातारीची, पण कुवारी राहणार सदा मुलगी म्हाताऱ्याची!" पण कुत्रा पूर्वीप्रमाणेच म्हणाला: "भौ-वौ! म्हातारीची मुलगी मेली गारठून!"

तेवढ्यात फाटक करकरले आणि मुलीला भेटायला म्हातारी बाहेर धावली. तिने झाडाच्या सालीचे आच्छादन बाजूला केले. घसरगाडीवर तिच्या मुलीचे प्रेत पडलेले तिला दिसले.

म्हातारी मोठमोठ्याने रडू लागली, पण आता खूप उशीर झाला होता!

जा, कुठे मला माहीत नाही! आण, काय मला ठाऊक नाही!

एक होते राज्य आणि त्या राज्यात रहात होता एक झार. तो एकटा होता, त्याचे लग्न झालेले नव्हते. त्याच्या पदरी आंद्रेई नांवाचा एक धनुर्धारी होता.

एक दिवस हा धनुर्धारी शिकारीवर गेला. सबंध दिवसभर तो जंगलात भटकला, पण त्याला शिकार अजिबात मिळाली नाही. खूप उशीर झाला होता व अगदी निराश मनाने तो घरी परतत होता. अचानक त्याला एका झाडावर एक कबूतर बसलेले दिसले.

"ह्या कबूतराचा वेध घ्यायला हरकत नाही," धनुर्धारीने मनाशी विचार केला.

म्हणून त्याने बाण मारला व ओल्या मातीवर जखमी कबूतर कोसळले. आंद्रेईने ते कबूतर उचलले व त्याची मान मुरगाळून त्याला तो आपल्या पिशवीत टाकणार, तोच ते कबूतर त्याच्याशी मानवी आवाजात बोलले:

"धनुर्धारी आंद्रेई, मला ठार मारू नको. माझी बिचारी मान मुरगळू नको. मला जिवंत घरी घेऊन जा आणि खिडकीत ठेव. मात्र लक्षात ठेव, मला पेंग येऊ लागताच तुझ्या उजव्या हाताचा मला फटका मार, म्हणजे तुला अगणित लाभ होईल."

धनुर्धारी आंद्रेईचा स्वतःच्या कानांवर विश्वासच बसेना. "हे काय बरे?" मनात विचार आला. "हा दिसतो तर पक्षी, पण बोलतो मात्र माणसासारखा!" त्याने कबूतराला घरी नेले, खिडकीत ठेवले व तो वाट पहात उभा राहिला.

कबूतराने हळूच आपली मान आपल्या पंखात खुपसली व ते पेंगू लागले. त्या कबूतराने काय सांगितले होते ते आंद्रेईने लक्षात ठेवले होते व त्यानुसार त्याने त्या कबूतराला उजव्या हाताची थप्पड मारली. कबूतर फरशीवर खाली

पडले आणि क्षणात त्याचे राजकन्या मारीयामध्ये रूपांतर झाले. पहाटेच्या आकाशाप्रमाणे ही राजकन्या सुंदर होती.

राजकन्या मारीया धनुर्धारीला म्हणाली:

"मला पकडणं तुला जमलं, आता मला जवळ बाळगणं जमव. प्रणय लांबला नाही तर त्याची परिणती सुखात होते. तेव्हा पटकन माझ्याशी लग्न कर, मी तुझ्याशी प्रामाणिक राहीन आणि तुझा संसार सुखाचा करीन."

अशा रीतीने निर्णय लागला. धनुर्धारी आंद्रेईने राजकन्या मारीयाशी लग्न केले. तो व त्याची तरुण बायको अत्यंत सुखाने एकत्र राहू लागले. पण त्याने आपल्या कर्तव्यांकडे मुळीच दुर्लक्ष केले नव्हते. दररोज सकाळी, दिवस उजाडण्यापूर्वीच, तो जंगलात जायचा, जंगली पाखरे मारायचा व राजाच्या मुदपाकखान्यात त्यांना नेऊन द्यायचा. अशा रीतीने माफक आयुष्य जगल्यानंतर एक दिवस राजकन्या मारीया त्याला म्हणाली:

"आंद्रेई, आपण फार गरीबीत जीवन कंठतो आहोत."

"होय, तुझं म्हणणं खरं आहे."

"जर तू शंभर रूबल उसने घेतलेस आणि त्यांचं मला रेशीम आणून दिलंस, तर आपल्या परिस्थितीत मी तुला सुधारणा घडवून दाखवीन."

आंद्रेईने तिच्या म्हणण्याप्रमाणे केले. तो आपल्या मित्रांकडे गेला व कुणाकडून एक, तर कुणाकडून दोन असे रूबल उसने घेऊन त्याने त्या पैशाचे रेशीम विकत घेतले. रेशीम आपल्या बायकोपाशी त्याने आणून दिले. ती म्हणाली: "आता स्वस्थ झोप. रात्रीपेक्षा सकाळी शहाणपण जास्त चांगलं सुचतं."

आंद्रेई झोपला व राजकन्या मारीया विणायला बसली. सबंध रात्रभर बसून तिने एक सुंदर गालीचा विणला. असा गालीचा आजवर जगात कधी कुणी पाहिला नव्हता. त्या गालीच्यावर संपूर्ण राज्याचे चित्र होते–राज्यातील सर्व शहरे आणि खेडी होती, जंगले आणि मैदाने होती, आकाशातील पक्षी होते, जंगलातील पशू होते, सागरातील मासे होते व त्या सर्वांवर चंद्र आणि सूर्य प्रकाशत होते.

सकाळी राजकन्या मारीयाने आपल्या नवऱ्याला गालीचा देऊन म्हटले:

"व्यापाऱ्यांच्या आळीत ने आणि विक. मात्र लक्षात ठेव, तू स्वत: किंमत ठरवू नकोस. तुला जे काही देतील ते घे."

आंद्रेईने गालीचा खांद्यावर टाकला व तो व्यापाऱ्यांच्या आळीत गेला.

एक व्यापारी त्याच्यापाशी धावत आला व त्याने विचारले:

"भल्या माणसा, ह्याचे तुला किती पैसे हवेत?"

"तुम्ही व्यापारी आहात. तुम्हीच किंमत ठरवा."

व्यापाऱ्याने खूप खूप विचार केला, पण गालीचाची नक्की किंमत करणे त्याला जमेना. अनेक व्यापारी जमले. गालीचा बघून ते नवल करीत होते, पण किंमत ठरविणे त्यांना जमेना.

तेवढ्यात तेथून झारचा सल्लागार घोडागाडीमधून चालला होता. लोकांची एवढी गर्दी पाहून त्याला आश्चर्य वाटले व म्हणून तो गाडीतून खाली उतरला. "रामराम व्यापारी बंधूनो, काय चाललंय इथं?"

"ह्या गालीचाची किंमत आम्ही ठरवू शकत नाही," व्यापारी म्हणाले. झारच्या सल्लागाराने गालीचा पाहिला आणि तो आश्चर्याने थक्क झाला.

"धनुर्धारी मला खरं सांग, हा अद्भुत गालीचा तुला कुठं मिळाला?"

"माझ्या बायकोनं बनवला," धनुर्धारी उत्तरला.

"आणि ह्याचे तुला किती पैसे हवेत?"

"मला माहीत नाही. माझी बायको म्हणाली, देतील तेवढे पैसे घे."

"तर मग धनुर्धारी, हे घे दहा हजार रूबल!"

आंद्रेईने पैसे घेतले, गालीचा दिला व तो घरी गेला. झारचा सल्लागार राजवाड्यावर गेला आणि त्याने झारला तो गालीचा दाखविला.

आपले संपूर्ण राज्य आपल्या डोळ्यांसमोर पसरलेले पाहून झार स्तंभित झाला. त्याचे आश्चर्य बराच वेळपर्यंत मावळेना.

"तुला काय म्हणायचं ते म्हण, पण हा गालीचा मी तुला परत देणार नाही," झार म्हणाला.

झारने वीस हजार रूबल काढले आणि सल्लागाराला दिले. सल्लागाराने ते पैसे घेतले व मनाशी विचार केला:

"हरकत नाही. मी याहून चांगला गालीचा बनवून घेईन."

सल्लागार परत आपल्या घोडागाडीत बसला आणि गावाबाहेर गेला. धनुर्धारी आंद्रेईची झोपडी त्याने शोधून काढली व दारावर टकटक केले. राजकन्या मारीयाने दार उघडले. झारच्या सल्लागाराने एक पाय दाराच्या उंबरठ्यावर ठेवला, पण त्याचा दुसरा पाय जमिनीला खिळूनच राहिला. त्याला बोलायचे भान उरले नाही व कशासाठी तेथे आला होता हेच तो विसरून गेला. त्याच्यासमोर एवढी अतुलनीय लावण्यवती उभी होती की, केवळ तिला सतत न्याहाळण्यात त्याने धन्यता मानली असती!

तो काही बोलेल म्हणून राजकन्या मारीयाने वाट पाहिली, पण जेव्हा तो एकही शब्द बोलेना, तेव्हा तिने त्याच्याकडे पाठ फिरविली व त्याच्या तोंडावर दार बंद केले. थोड्या वेळानंतर तो थाऱ्यावर आला व स्वतःच्या घरी गेला. पण त्या दिवसापासून धनुर्धारीच्या बायकोविषयीच्या विचारांनी तो एवढा व्यग्र बनला, की त्याला धड खाणे-पिणे सुचेनासे झाले.

आपल्या सल्लागाराचे काहीतरी प्रचंड बिनसल्याचे झारच्या ध्यानात आले व त्याने त्याच्यापाशी खुलासा विचारला.

"महाराज, काय सांगू! धनुर्धारीची बायको मी पाहिली मात्र, माझ्या मनातून तिला काढून टाकणं अशक्य झालंय. तिनं मला मंत्रमुग्ध केलंय आणि ते मायाजाल तोडणं मला जमत नाही."

आपणही धनुर्धारीची बायको पहावी असे झारने ठरविले. त्याने सामान्य माणसाचा वेष घातला, तो शहराच्या वेशींबाहेर गेला, धनुर्धारी आंद्रेईची झोपडी त्याने शोधून काढली व दारावर टकटक वाजविले. राजकन्या मारीयाने दार उघडले. झारने एक पाय दाराच्या उंबरठ्यावर ठेवला, पण त्याचा दुसरा पाय जमिनीवरच खिळून राहिला व समोरच्या स्वर्गीय लावण्यमयी चेहऱ्याकडे तो आ वासून पहात राहिला.

झारच्या बोलण्याची राजकन्या मारीयाने वाट पाहिली, पण जेव्हा त्याने एकही शब्द उच्चारला नाही, तेव्हा तिने त्याच्याकडे पाठ फिरविली आणि त्याच्या तोंडावर दार बंद केले.

झार कमालीचा विव्हल बनला. "का बरं मी एकट्यानं जगावं?" त्याच्या मनात आले. "ही मला अगदी लायक अशी सुंदर नवरी आहे. हिनं धनुर्धाऱ्याशी नव्हे, तर झारशी लग्न करायला हवं होतं."

तो राजवाड्यात परतला तेव्हा त्याच्या डोक्यात एक दुष्ट कल्पना आली. जिवंत नवऱ्यापासून बायको चोरण्याचा विचार त्याने केला. आपल्या सल्लागाराला बोलावून तो म्हणाला: "धनुर्धारी आंद्रेईचा काटा काढण्याची युक्ती शोध. मला त्याच्या बायकोशी लग्न करायचं आहे. जर तू मला मदत केलीस, तर मी तुला गावं, खेडी आणि सोनं इनाम देईन. पण जर मदत केली नाहीस, तर तुझा शिरच्छेद करीन."

झारचा सल्लागार मोठ्या चिंतेत पडला. धनुर्धारीचा काटा कसा काढावा ह्याबाबत त्याला कोणताही उपाय सुचेना. म्हणून आपले दुःख दारूत बुडविण्यासाठी तो गुत्त्यात गेला.

नेहमी गुत्त्यात येणारा फाटक्या कपड्यातील एक दारूडा त्याच्यापाशी येऊन म्हणाला:

"सल्लागार, तुम्हाला एवढी कसली चिंता पडलीय?"

"चालता हो फाटक्या माणसा!"

"मला हाकलून लावण्यापेक्षा घोटभर दारू पाजा आणि मी तुम्हाला चांगला सल्ला देईन."

झारच्या सल्लागाराने त्या दारुड्याला एक ग्लासभर मद्य दिले व आपली चिंता सांगितली.

"धनुर्धारी आंद्रेई अगदी साधा माणूस आहे," तो दारुडा म्हणाला.

"त्याची बायको जर एवढी हुशार नसती, तर त्याचा सहज काटा काढता आला असता! ती गोंधळून जाईल अशी काही तरी युक्ती आपण शोधली पाहिजे. झारकडं जा आणि त्याला म्हणावं की आंद्रेईला हुकूम दे: दुसऱ्या जगात जा आणि झारच्या मेलेल्या वडलांचं, जुन्या झारचं, तिथं कसं काय चाललंय ते पाहून ये! आंद्रेई जाईल आणि कधीही परतणार नाही!"

झारच्या सल्लागाराने त्या फाटक्या दारुड्याचे आभार मानले व तो पळत पळतच झारकडे गेला.

"धनुर्धाऱ्याचा काटा काढण्याची युक्ती मला सुचलीय," सल्लागार म्हणाला व काय करायचे हे त्याने झारला सांगितले. झार अत्यंत खूष झाला व त्याने धनुर्धारी आंद्रेईला बोलावणे धाडले.

"हे बघ आंद्रेई," झार म्हणाला, "तू माझी प्रामाणिकपणानं सेवा बजावलीस, पण मी तुझ्याकडून आणखी एका सेवेची अपेक्षा करतोय. दुसऱ्या जगात जा आणि माझ्या वडलांचं कसं चाललंय ते पाहून ये. हे काम केलं नाहीस, तर मात्र मला तुझा तलवारीनं शिरच्छेद करावा लागेल!"

आंद्रेई घरी गेला व खिन्नपणे बाकावर बसून राहिला.

"आंद्रेई, तू एवढा कष्टी का?" राजकन्या मारीयाने विचारले.

झारने कोणती कामगिरी सोपविली होती हे आंद्रेईने तिला सांगितले.

"एवढी कसली चिंता करायची ह्या गोष्टीची!" राजकन्या मारीया म्हणाली. "अगदीच क्षुल्लक काम! खरी अवघड कामगिरी तर अजून यायचीच आहे. स्वस्थ झोप. रात्रीपेक्षा सकाळी जास्त चांगलं शहाणपण सुचतं!"

दुसऱ्या दिवशी सकाळी आंद्रेई जागा होताच राजकन्या मारीयाने त्याला बिस्कीटांची थैली दिली व सोन्याची एक अंगठी दिली.

"झारपाशी जा आणि तुझ्याबरोबर त्या सल्लागाराला घेऊन जाण्याची परवानगी माग. म्हणजे तू खरोखरीच दुसऱ्या जगात गेलास अशी त्याची खात्री पटेल. तुझ्या प्रवासातल्या सोबत्याबरोबर चालायला सुरुवात करशील, तेव्हा तुझ्यापुढं ही अंगठी फेक. ती तुला वाट दाखवील."

आंद्रेईने बिस्कीटांची थैली व अंगठी घेतली, आपल्या बायकोचा निरोप घेतला आणि झारकडे जाऊन त्याच्या सल्लागाराला सोबत पाठविण्याची विनंती केली. झारला आंद्रेईची मागणी नाकारता येईना. अशा रीतीने आंद्रेई

णि सल्लागार प्रवासाला निघाले. आंद्रेईने अंगठी समोर फेकली व ती
गळत निघाली. तो अंगठीमागून निघाला. खुली मैदाने आणि शेवाळभरले
दलीचे प्रदेश त्याने पार केले; तळी आणि नद्या तो ओलांडून गेला
णि झारचा सल्लागार त्याच्या पाठोपाठ येत होता.

जेव्हा जेव्हा चालण्याचा त्यांना कंटाळा येई, तेव्हा तेव्हा ते थोडी
स्कीटे खात व परत चालू लागत.

योग्य वेळी एका प्रचंड निर्जन अरण्यात ते पोहोचले. एका खोल घळीतून ते खाली उतरले व तेथे अंगठी थांबली.

आंद्रेई व झारचा सल्लागार काही बिस्कीटे खाण्यासाठी खाली बसले. एवढ्यात म्हातारा झार त्यांच्या दृष्टीला पडला. सर्पणाने भरलेली गाडी तो लटपटत्या पायांनी ओढीत होता, तर त्याच्या डाव्या आणि उजव्या बाजूला असलेले दोन सैतान त्याला सोटचांनी ढोशीत होते.

"पहा," आंद्रेई म्हणाला, "झारचे मेलेले वडील हेच ना?"

"होय, हेच ते!" सल्लागार म्हणाला.

"अरे सभ्य गृहस्थांनो," सैतानांना उद्देशून आंद्रेई मोठचांदा ओरडला, "त्या मेलेल्या माणसाला एक मिनिटभर मोकळं सोडा. मला त्याच्याशी दोन शब्द बोलायचे आहेत."

"थांबून रहायला आमच्यापाशी अवसर आहे असं वाटतं तुला?" सैतानांनी उलट विचारले. "अथवा सर्पणाची गाडी आम्ही खेचत न्यावी अशी तुझी अपेक्षा आहे?"

"त्याची जागा घ्यायला माझ्यापाशी दुसरा माणूस आहे," आंद्रेई म्हणाला.

तेव्हा सैतानांनी म्हाताऱ्या झारला गाडीपासून मुक्त केले व त्याच्याऐवजी सल्लागाराला गाडीला जुंपले. मग दोघे सैतान त्याला दोन्ही बाजूंनी सोटचांचे तडाखे मारू लागले. सल्लागार दुप्पट खाली वाकला, पण शर्थीने सर्पणाची गाडी खेचू लागला.

आयुष्य कसे चाललेय असे आंद्रेईने म्हाताऱ्या झारला विचारले.

"अरे धनुर्धारी आंद्रेई, काय सांगू तुला," झार म्हणाला. "ह्या जगात माझा फार खडतर काळ चाललाय. माझ्या मुलापाशी माझी आठवण काढ आणि त्याला सांग: लोकांना वाईट वागवू नकोस, नाहीतर तो इथं येईल तेव्हा त्याचेसुद्धा असेच हाल होतील!"

त्यांचे बोलणे जेमतेम संपले असेल-नसेल, एवढ्यात रिकामी गाडी घेऊन सैतान परतले. आंद्रेईने म्हाताऱ्या झारचा निरोप घेतला, सल्लागार परत आंद्रेईला येऊन मिळाला व ते घरी जायला निघाले.

सरतेशेवटी ते मायदेशी पोहोचले आणि राजवाड्यात गेले. धनुर्धारी पाहताच झारचा संतापाने तिळपापड झाला.

"परत यायची तू हिंमत केलीच कशी?" त्याने विचारले.

"दुसऱ्या जगात मी तुमच्या मेलेल्या वडलांना भेटलो. त्यांचं तिथं फार वाईट चाललंय. त्यांनी तुम्हाला आशीर्वाद पाठवलेत आणि सांगितलंय की, आत्ता त्यांचे जसे हाल चाललेत तसे पुढं तुमचे तिथं हाल व्हायला नको असतील, तर लोकांना वाईट वागवू नका!"

"तू दुसऱ्या जगात गेला होतास आणि माझ्या वडलांना भेटलास हे कसं सिद्ध करशील?"

"तुमच्या सल्लागाराच्या पाठीवर सैतानांच्या सोटचांच्या खुणा राहिल्या आहेत, त्या खुणांवरून मी सिद्ध करू शकतो!"

झारला तेवढा पुरावा पुरेसा होता, त्यामुळे आंद्रेईला सोडून देणे त्याला भाग पडले. दुसरे तो काय करू शकणार? मग तो आपल्या सल्लागाराला म्हणाला:

"त्या धनुर्धारीची ब्याद घालविण्याचा उपाय जर तू शोधला नाहीस, तर मी तुझं मुंडकं उडवीन!"

सल्लागार अधिकच चिंतेत पडला. गुत्त्यात जाऊन तो एका मेजापाशी बसला व त्याने दारू मागविली. तेवढ्यात पूर्वीचाच फाटक्या कपड्यातील दारुड्या त्याच्यापाशी आला आणि म्हणाला:

"आता कशाची चिंता तुम्हाला छळतेय? मला दारू द्या आणि मी तुम्हाला चांगली युक्ती सांगतो!"

सल्लागाराने त्याला मद्याचा एक प्याला दिला व आपली समस्या सांगितली.

"काळजी करू नका," तो हलकट माणूस म्हणाला, "झारकडं जा आणि धनुर्धारीवर एक नवी कामगिरी सोपवायला त्याला सांगा, त्या कामगिरीचा नुसता विचार करणंसुद्धा अवघड होतं, मग तिला पार पाडणं तर दूरच! त्यानं तिप्पट-नऊ भूमीत तिप्पट-दहा राज्यात जायचं आणि गाणारं मांजर आणायचं!"

सल्लागार धावत झारकडे गेला व धनुर्धारीची ब्याद घालविण्याचा नवा उपाय त्याने सांगितला. झारने तात्काळ आंद्रेईला बोलावणे धाडले.

"आंद्रेई, तू माझी एक कामगिरी पार पाडलीस. आता दुसरी कामगिरी कर. तिप्पट-नऊ भूमीपलिकडल्या तिप्पट-दहा राज्यात जा आणि माझ्यासाठी गाणारं मांजर घेऊन ये. हे काम केलं नाहीस तर तलवारीनं तुझा शिरच्छेद करीन!"

खाली मान घालून आंद्रेई घरी गेला व झारने त्याच्यांवर सोपविलेली नवी कामगिरी त्याने आपल्या बायकोला सांगितली.

"एवढी कसली काळजी करतो!" राजकन्या मारीया म्हणाली. "अगदीच क्षुल्लक काम. खरी कामगिरी अजून पुढंच आहे. स्वस्थ झोपी जा! रात्रीपेक्षा सकाळी अधिक चांगलं शहाणपण सुचतं!"

आंद्रेई झोपला व राजकन्या मारीया लोहारशाळेत गेली. तीन लोखंडी टोप्या, लोखंडी चिमट्यांची एक जोडी व तीन दांडे – एक लोखंडी, दुसरा तांब्याचा आणि तिसरा कथलाचा – एवढ्या वस्तू तिने लोहारांना बनवायला सांगितल्या.

दुसऱ्या दिवशी भल्या सकाळीच राजकन्या मारीयाने आंद्रेईला जागे केले. "ह्या तीन टोप्या, चिमट्यांची जोडी आणि हे तीन दांडे घे – तिप्पट-नऊ भूमीपलिकडच्या तिप्पट-दहा राज्यात जा. तिथं पोहोचायच्या आधी

तीन वेर्स्ता अंतरावर तुला खूप झोप यायला लागेल. त्याचा अर्थ गाणारं मांजर तुझ्यावर मोहिनी टाकण्याचा प्रयत्न करील. पण ध्यानात ठेव, झोपू नकोस! तुझ्या हातांची घडी कर, पावलं फरफटत ने, वेळ पडली तर जमिनीवर गडाबडा लोळत जा. जर तू झोपलास तर गाणारं मांजर तुला ठार मारील!"

काय करायचे आणि कसे करायचे हे राजकन्या मारीयाने त्याला सांगितले व मग त्याला निरोप दिला.

गोष्ट सांगताना छोटी वाटते, पण एखादी कामगिरी पार पाडायला खूप वेळ लागतो. धनुर्धारी आंद्रेई अखेरीस तिप्पट-दहा राज्यापर्यंत आला व पोहोचायला तीन वेर्स्ता अंतर राहिले तेव्हा त्याला झोप येऊ लागली. त्याने आपल्या डोक्यावर तीन लोखंडी टोप्या घातल्या, हातांची घडी केली, पाय फरफटत न्यायला आरंभ केला व वेळ पडली तेव्हा जमिनीवरून गडगडत तो गेला. कसेबसे त्याने स्वत:ला जागे ठेवले होते. अखेरीस एका उंच खांबापाशी तो पोहोचला.

गाणाऱ्या मांजराने जेव्हा आंद्रेईला पाहिले तेव्हा ते गुरगुरले, फिस्कारले व खांबावरून त्याने थेट आंद्रेईच्या डोक्यावर उडी मारली. मांजराने पहिली टोपी फोडली, दुसरी टोपी फोडली व तिसरी टोपी ते फोडणार, एवढ्यात आंद्रेईने त्याला चिमट्यांमध्ये पकडले, जमिनीवरून फरफटत नेले आणि लोखंडी दांड्याने बडवायला सुरुवात केली. लोखंडी दांडा मोडला, तेव्हा त्याने तांब्याच्या दांड्याने मांजराला बडवायला सुरुवात केली; पण तोही दांडा मोडला, तेव्हा कथलाच्या दांड्याने तो मारू लागला. कथलाचा दांडा वाकला, पण मोडला नाही. त्याचा मांजराच्या शरीराभोवती वेढा पडला. आंद्रेई जेव्हा मांजराला मारीत होता, तेव्हा ते मांजर त्याला धर्मगुरुंविषयी, पाद्र्यांविषयी, पुजाऱ्यांच्या मुलींविषयी अद्भुत गोष्टी सांगत होते. पण आंद्रेईने त्या गोष्टींकडे काणाडोळा केला आणि सर्व शक्तीनिशी मांजराला चोपून काढले. अखेरीस गाणाऱ्या मांजराची सहनशक्ती संपली. आपल्या दुष्ट मोहजालाचा परिणाम घडत नाही असे त्याच्या ध्यानात आले, तेव्हा त्याने आंद्रेईची विनवणी सुरू केली.

"भल्या माणसा, सोड मला!" मांजर म्हणाले. "तुला हवं ते मी करीन."

"माझ्याबरोबर येशील?"

"तू म्हणशील तिथं येईन!"

आंद्रेई घराकडे निघाला. त्याने आपल्यासोबत मांजराला घेतले. मायदेशी पोहोचल्यावर मांजरासह तो राजवाड्यावर गेला व झारला म्हणाला :

"मी कामगिरी पार पाडलीय आणि गाणाऱ्या मांजराला तुमच्यापाशी आणलंय!"

झारचा स्वतःच्या डोळ्यांवर विश्वास बसेना.

"चल, गाणाऱ्या मांजरा, दाखव तुझा हिसका!" तो म्हणाला.

त्यासरशी मांजराने नख्या पाजळायला आरंभ केला व झारकडे डोळे वटारून ते पाहू लागले. झारची छाती टराटरा फाडण्याचा आणि त्याचे जिवंत काळीज बाहेर उपसून काढण्याचा मांजराने पवित्रा घेतला.

झारची पाचावर धारण बसली.

"अरे आंद्रेई, त्या मांजराला शांत कर," झार म्हणाला.

आंद्रेईने मांजराला शांत केले, पिंजऱ्यात त्याला बंद केले व मग तो घरी राजकन्या मारीयाकडे गेला. ती दोघे परत सुखाने एकत्र राहू लागली. पण झारला प्रेमाची अधिकच बाधा झाली. एके दिवशी त्याने परत सल्लागाराला बोलाविले.

"धनुर्धारी आंद्रेईला नाहीसं करण्याचा दुसरा एखादा मार्ग शोध. जर हे काम केलं नाहीस, तर माझ्या तलवारीची तुझ्या डोक्याशी गाठ पडेल!"

झारचा सल्लागार थेट गुत्त्यात गेला, त्याने त्या हलकट दारुड्याला शोधून काढले व संकटमुक्त होण्यासाठी त्याची मदत मागितली. दारुड्याने मद्याचा चषक एका दमात पिऊन टाकला, मिशा पुसल्या व तो म्हणाला:

"झारकडं जा आणि त्याला आंद्रेईला सांगायला लाव. जा, कुठे मला माहीत नाही आणि आण, काय मला ठाऊक नाही! ही कामगिरी आंद्रेई कधीही पार पाडू शकणार नाही आणि त्यामुळं तो कधीही परत येणार नाही."

सल्लागार धावत झारकडे गेला व त्याने त्याला शब्द न शब्द सांगितला. झारने आंद्रेईला बोलावणे धाडले.

"आंद्रेई, तू माझ्या दोन कामगिऱ्या पार पाडल्यास, आता तिसरी पार पाड," झार म्हणाला :

"जा, कुठे मला माहीत नाही आणि आण, काय मला ठाऊक नाही! ही कामगिरी पार पाडलीस, तर मी तुला मोठ्ठं इनाम देईन, पण हे काम केलं नाहीस, तर मात्र माझ्या तलवारीनं तुझा शिरच्छेद करीन!"

आंद्रेई घरी गेला आणि बाकावर बसून मुळूमुळू रडू लागला.

"लाडक्या, एवढा कष्टी का?" राजकन्या मारीयाने विचारले. "यावेळी काय आहे?"

"तुझा सुंदर चेहरा माझ्या नाशाला कारण ठरणार," आंद्रेई म्हणाला. "झारनं मला आज्ञा केलीय: जा, कुठे मला माहीत नाही आणि आण, काय मला ठाऊक नाही!"

"हे मात्र खरंच अवघड काम आहे. पण काही हरकत नाही. स्वस्थ झोप. रात्रीपेक्षा सकाळी जास्त चांगलं शहाणपण सुचतं."

मध्यरात्र झाली तेव्हा राजकन्या मारीयाने आपले मंत्रांचे पुस्तक उघडले. तिने ते पुस्तक पुरते वाचून काढले, मग बाजूला फेकून दिले व स्वतःचे डोके हातांनी गच्च आवळून ती बसून राहिली. झारने सोपविलेली कामगिरी कशी पार पाडायची हे त्या पुस्तकात सांगितलेले नव्हते. ती दाराच्या उंबरठ्यावर गेली व तिने आपला हातरुमाल हलविला. सर्व प्रकारचे पक्षी आणि पशू कळपांनी तिच्यापाशी धावत आले.

"जंगलच्या पशूंचा आणि नभीच्या पक्ष्यांचा विजय असो!"

ता त्यांना म्हणाली. "पशूंनो, तुम्ही सर्वत्र संचार करता, पक्ष्यांनो, तुम्ही सर्वत्र उड्डाण करता – कदाचित तुम्ही मला सांगू शकाल : कुठे, मला माहीत नाही कसं जायचं आणि काय, मला ठाऊक नाही कसं आणायचं ?"

पक्षी व पशू उत्तरले : "नाही, आम्हाला माहीत नाही."

राजकन्या मारीयाने परत हातरुमाल झटकला व पक्षी आणि पशू क्षणात नाहीसे झाले. राजकन्येने तिसऱ्यांदा हातरुमाल हलविला व दोन प्रचंड राक्षस तिच्यासमोर हजर झाले.

"तुमची काय इच्छा आहे ? तुम्हाला काय हवंय ?"

"विश्वासू सेवकांनो, महासागराच्या मध्यभागी मला घेऊन चला !"

राक्षसांनी राजकन्येला उचलले व महासागराच्या मध्यभागी खोल पाण्यात ते उभे राहिले. दोन भव्य खांबांप्रमाणे ते उभे होते व राजकन्येला त्यांनी आपल्या हातांवर धरले होते. राजकन्या मारीयाने हातरुमाल हलविला व महासागरामधील सर्व मासे आणि जलचर प्राणी तिच्यापाशी आले.

"सागरनिवासी माशांनो आणि जलचर प्राण्यांनो, तुम्ही मला सांगू शकाल : कुठे, मला माहीत नाही कसं जायचं आणि काय, मला माहीत नाही कसं आणायचं ?"

"नाही, राजकन्या मारीया, असं ठिकाण आम्ही कधीच ऐकलं नाही !"

राजकन्या मारीया खिन्न बनली व आपल्याला घरी घेऊन चला असे तिने राक्षसांना सांगितले. राक्षसांनी तिला उचलले, आंद्रेईच्या घरापर्यंत आणले आणि दाराच्या उंबरठ्यापाशी तिला अलगद खाली ठेवले. दुसऱ्या दिवशी सकाळी आंद्रेईने प्रवासाला प्रयाण करण्यापूर्वी त्याला निरोप द्यायला राजकन्या मारीया नेहमीपेक्षा लौकर उठली. तिने त्याला सुताचा गुंडा दिला व कशीदा काढलेला एक टुवाल दिला.

"सुताचा गुंडा तुझ्या समोर फेक आणि जिकडं तो घरंगळत जाईल तिकडं तू जा," ती म्हणाली. "आणि जिथं कुठं आंघोळ करशील, तिथं फक्त ह्या मी दिलेल्या टुवालानंच अंग पुसायचं, एवढं पक्कं ध्यानात ठेव!"

आंद्रेईने राजकन्या मारीयाचा निरोप घेतला. त्याने सुताचा गुंडा स्वत:समोर फेकला. गुंडा उलगडत उलगडत निघाला आणि आंद्रेई त्याच्या पाठोपाठ चालू लागला.

गोष्ट पटकन सांगता येते, पण एखादे कृत्य प्रत्यक्षात पार पडायला बराच अवधी लागतो. अनेक राज्ये आणि परके देश त्याने ओलांडले. गुंडा गडगडत चालला होता, सूत उलगडत जात होते व शेवटी त्या गुंडयाचा आकार कोंबडीच्या अंडयाएवढा लहान बनला. अखेरीस तर तो एवढा छोटा बनला, की रस्त्यावर तो दिसणे अशक्य ठरले. आंद्रेई एका रानात पोहोचला. तेथे कोंबडीच्या पायावर एक छोटी झोपडी उभी होती.

"छोटया झोपडी, छोटया झोपडी, झाडांकडं पाठ कर आणि माझ्या-कडं तोंड कर," आंद्रेई म्हणाला.

झोपडी गोल फिरली. आंद्रेई झोपडीत गेला. तेथे एक म्हातारी चेटकीण बाकावर बसून सूत कातत होती.

"हूं, हूं, रशियन रक्ताची भेट कधी झाली नव्हती माझ्याशी, आता त्याचा वास येतोय माझ्या दाराशी! कोण आहे तिथं? कुठून आलंय? कुठं चाललंय? मी जिवंत भाजणार, कचाकचा चावून खाणार आणि तुझ्या हाडांना चाटूनपुसून स्वच्छ करणार!"

"अगं ए म्हातारे बाबा-यागा, वाटसरूला खातेस म्हणजे कमालच!" आंद्रेई म्हणाला. "हा वाटसरू सडपातळ आणि काटक आहे. प्रथम हंडा तापव, मला छान न्हाऊमाखू घाल आणि मग खा!"

तेव्हा बाबा-यागाने पाण्याचा हंडा तापत ठेवला. आंद्रेईने खसखसून आंघोळ केली व अंग कोरडे करण्यासाठी बायकोचा टुवाल बाहेर काढला.

"हा टुवाल तुझ्यापाशी कसा आला?" बाबा-यागाने विचारले. "माझ्या मुलीनं हा कशीदा काढला होता."

"तुझी मुलगी ती माझी बायको. तिनंच मला हा टुवाल दिला."

"अगबाई, म्हणजे तू माझा जावई!"

बाबा-यागाने लगबगीने सर्व प्रकारचे खाद्यपदार्थ, वेगवेगळी मद्ये आणि



इतर गोष्टी मेजावर मांडल्या. आंद्रेई मुळीच आढेवेढे न घेता मेजापाशी बसला व खाद्य पेयांचा समाचार घ्यायला त्याने आरंभ केला. बाबा-यागा त्याच्या शेजारी बसली व त्याचे राजकन्या मारीयाशी कसे लग्न झाले, त्यांचे वैवाहिक जीवन सुखाचे होते का, अशा तिने चौकशा केल्या. आंद्रेईने तिला सर्व हकीकत सांगितली. कुठून आणायचे हे माहीत नसताना आणि काय आणायचे हे माहीत नसताना, ते घेऊन यायची झारची आज्ञाही त्याने तिला सांगितली.

"आई, तू मला ह्या कामात मदत केलीस, तर किती छान होईल!"

"अरे माझ्या लाडक्या जावईबापू, अशा विचित्र जागेचं मीसुद्धा कधी नांव ऐकलेलं नाही. ही गोष्ट फक्त एका म्हाताऱ्या बेडकीला ठाऊक आहे आणि ती बेडकी गेली तीनशे वर्षं दलदलीत राहतेय. पण हरकत नाही. स्वस्थ झोप. रात्रीपेक्षा सकाळी जास्त चांगलं शहाणपण सुचतं."

आंद्रेई झोपला आणि बाबा-यागाने दोन भोजाचे झाडू घेऊन दलदलीकडे उड्डाण केले व हाक मारली:

"ए टणटण उडणाऱ्या म्हाताऱ्या बेडकी, अजून तू जिवंत आहेस का?"

"होय."

"तर मग दलदलीतून टुणकन बाहेर ये!"

म्हातारी बेडकी टुणदिशी उडी मारून दलदलीमधून बाहेर आली. बाबा-यागाने तिला विचारले:

"काय मला ठाऊक नाही, कुठं आहे तुला माहीत आहे?"

"हो."

"तर मग कृपा करून मला सांग, ते कुठं आहे. माझ्या जावयाला धाडलंय: कुठे, मला माहीत नाही इथून काय, मला ठाऊक नाही आणायला."

"मी स्वतःच त्याला वाट दाखवीन, पण मी खूप म्हातारी झाल्येय आणि प्रवास बराच लांबचा आहे," बेडकी म्हणाली. "तुझ्या जावयाला सांग: ताज्या दुधाच्या खुजात मला ठेव आणि पेटत्या नदीपाशी घेऊन जा. तिथं मी त्याला सांगीन."

बाबा-यागाने म्हाताऱ्या बेडकीला बरोबर घेऊन घराकडे उड्डाण केले, खुजात ताजे दूध ओतले व त्यात बेडकीला ठेवले. दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे तिने आंद्रेईला जागे केले:

"हा बेडकीसकटचा खुजा घे," ती म्हणाली. "पोषाख चढव, माझ्या घोड्यावर स्वार हो आणि पेटत्या नदीपाशी जा. तिथं घोड्याला सोड आणि खुजामधून बेडकीला बाहेर काढ. ती सांगील तुला कुठं जायचं!"

आंद्रेईने पोषाख चढविला, खुजा बरोबर घेतला व बाबा-यागाच्या घोड्यावर तो स्वार झाला. शेवटी ते पेटत्या नदीपाशी पोहोचले. त्या नदीवरून एकही पशू उडी मारू शकत नव्हता, एकही पक्षी उडू शकत नव्हता.

आंद्रेई घोड्यावरून खाली उतरला. बेडकी त्याला म्हणाली: "पोरा, आता मला खुजामधून बाहेर काढ. आपण नदी ओलांडली पाहिजे."

आंद्रेईने खुजामधून बेडकीला बाहेर काढले व जमिनीवर ठेवले.

"आता माझ्या पाठीवर चढ."

"पण बेडुकबाई, तू तर अगदीच लहान आहेस. माझ्या वजनानं तू चिरडून जाशील."

"ती भीती बाळगू नकोस. बैस आणि घट्ट पकड!"

आंद्रेई बेडकीच्या पाठीवर बसला आणि ती स्वतः फुगू लागली. फुगत फुगत ती वाळलेल्या गवताच्या उडवीएवढी बनली.

"घट्ट धरलं आहेस ना?" तिने विचारले.

"होय."

म्हातारी बेडकी आणखी आणखी फुगत गेली व गवताच्या गंजीएवढी मोठी बनली.

"घट्ट धरलं आहेस ना?"

"होय."

पुन्हा फुगत फुगत ती काळ्या अरण्यापेक्षा जास्त उंच बनली आणि एकाच ढांगेत तिने पेटती नदी ओलांडली. आंद्रेईला तिने पलिकडच्या तीरावर उतरविले आणि परत नेहमीसारखी ती लहान आकाराची बनली.

"त्या वाटेनं जा मुला आणि तुला एक मनोरा दिसेल जो मनोरा नाही, अथवा झोपडी नाही, अथवा कोठारही नाही, पण ह्या प्रत्येकाचा त्यात अंश असेल. आत जा आणि चुलाण्यामागं उभा रहा. तिथं तुला सापडेल: काय मला ठाऊक नाही."

आंद्रेई त्या वाटेवरून चालत गेला आणि त्याने एक जुनी झोपडी पाहिली, जी झोपडी नव्हती. तिला खिडक्या नव्हत्या अथवा उंबरठाही नव्हता, पण

तिच्याभोवती खुंटांचे कुंपण होते. तो आत गेला आणि चुलाण्यामागे लपून बसला. तेवढ्यात जंगलात गोंगाट आणि खडखडाट झाला व दाढीदीक्षित ठेंगूराव आरडाओरडा करीत आत आले. "अरे बंधू नाऊम, मला भूक लागलीय!"

त्याच्या तोंडून शब्द बाहेर पडले न पडले, तोच कुठूनतरी एक मेज अवतीर्ण झाले. त्या मेजावर बीयरचे एक पिंप उभे होते व सुरा खुपसून ठेवलेला भाजलेला बैल होता. ठेंगूराव त्या भाजलेल्या बैलासमोर बसला, त्याने तो धारदार सुरा उपसून काढला, मांसाचे तुकडे कापले, त्यांच्यावर लसणाची चटणी माखली व मोठ्या चवीने तो समाचार घेऊ लागला.

ठेंगूरावाने बैलाचा संपूर्ण फडशा पाडला आणि बीयरचे आख्खे पिंप ढोसले.

"अरे बंधू नाऊम, मेज साफ कर!"

तात्काळ मेज नाहीसे झाले. जणू हाडे, पिंप व इतर गोष्टी तेथे कधी नव्हत्याच. ठेंगूराव बाहेर जाईपर्यंत आंद्रेई मुकाट लपून राहिला. मग चुलाण्या-

मागून तो बाहेर आला, त्याने धीर एकवटला व तो मोठ्यांदा म्हणाला :

"बंधू नाऊम, मला काहीतरी खायला दे!"

त्याच्या तोंडून हे शब्द बाहेर पडतात न पडतात तोच अज्ञातातून मेज अवतीर्ण झाले. त्या मेजावर सर्व प्रकारचे खाद्यपदार्थ, वेगवेगळी मद्ये आणि मजेदार वस्तू होत्या.

आंद्रेई मेजापाशी बसत म्हणाला : "बैस बंधू नाऊम, आपण एकत्र खाऊ-पिऊ या!"

एक अदृश्य आवाज उत्तरला : "भल्या माणसा, धन्यवाद. इथं मी खूप वर्षं सेवा करतोय, पण कधी मला पावाचा जळका तुकडासुद्धा कुणी दिला नाही आणि तू मला शेजारी बसून जेवायचं आमंत्रण दिलंस!"

आंद्रेई चकित झाला. तेथे कुणीही दिसत नव्हते, पण झाडू फिरवावी त्याप्रमाणे खाद्यपदार्थ नाहीसे झाले. चषकांमध्ये मद्ये आणि मधुर पेये आपोआप ओतली जात होती व चषक भराभर रिते बनत होते.

"बंधू नाऊम, तुला पाहण्याची माझी इच्छा आहे!" आंद्रेई म्हणाला.

"नाही, मी दिसू शकणार नाही. मी आहे, काय मला ठाऊक नाही."

"बंधू नाऊम, माझी सेवा करायला तुला आवडेल?"

"खरंच आवडेल. ह्या जगात जर कुणी दयाळू माणूस अस्तित्वात असेल, तर तो तूच!"

त्यांचे खाणे संपल्यानंतर आंद्रेई म्हणाला :

"मेज स्वच्छ कर आणि माझ्याबरोबर चल."

आंद्रेई झोपडीबाहेर गेला व आजूबाजूला पहात त्याने विचारले :

"बंधू नाऊम, तू इथं आहेस?"

"होय, घाबरू नकोस. मी तुला कधीही सोडणार नाही."

अशा रीतीने चालत चालत आंद्रेई पेटत्या नदीपर्यंत आला. तेथे बेडकी त्याची वाट पहात होती.

"काय रे मुला, काय मला ठाऊक नाही तुला सापडला का?" बेडकीने विचारले.

"होय."

"बैस माझ्या पाठीवर."

आंद्रेई बेडकीच्या पाठीवर बसला व ती फुगू लागली. नंतर तिने

एकाच उडीत पेटती नदी ओलांडली व आंद्रेईला पैलतीराला नेले.

आंद्रेईने बेडकीचे आभार मानले व तो आपल्या वाटेने गेला. थोडे अंतर गेल्यानंतर तो मागे वळून पहायचा आणि विचारायचा:

"बंधू नाऊम, तू इथं आहेस ना?"

"होय, घाबरू नकोस. मी तुला कधीही सोडणार नाही."

आंद्रेई खूप खूप चालला. शेवटी तो अत्यंत दमला आणि त्याचे पाय सुजले.

"छे: बुवा, फारच थकलो मी!" तो म्हणाला.

"मला आधीच का सांगितलं नाहीस?" बंधू नाऊम म्हणाला. "मी तुला झटक्यात घरी नेलं असतं!"

वाऱ्याच्या जोरदार झोतामध्ये आंद्रेई गुरफटला व पर्वत, जंगले, शहरे आणि खेडी यांच्यावरून तो वेगाने उडून गेला. खोल समुद्रावरूनही त्यांनी उड्डाण केले. आंद्रेई तेव्हा खूप घाबरला.

"बंधू नाऊम, मला विश्रांती घ्यावीशी वाटते," तो म्हणाला.

वारा एकदम पडला आणि आंद्रेई समुद्रात खाली कोसळू लागला. पण जेथे निळ्या लाटा उसळत होत्या, तेथे आता त्याला एक बेट दिसले. त्या बेटावर सोनेरी छपराचा राजवाडा उभा होता व त्याच्या सभोवती सुंदर बगीचा फुलला होता. बंधू नाऊम आंद्रेईला म्हणाला.

"विश्रांती घे, खा, पी आणि समुद्रावर लक्ष ठेव. तीन व्यापारी जहाजं ह्या दिशेला येतील. त्यांना बोलावून घे, व्यापाऱ्यांना जेवणाचं निमंत्रण दे आणि त्यांचा शाही पाहुणचार कर. त्यांच्याजवळ तीन अद्भुत गोष्टी आहेत. त्या तीन अद्भुतांच्या मोबदल्यात तू मला त्यांना देऊन टाक. घाबरू नकोस, मी परत येईन."

किती काळ लोटला हे सांगणे अवघड आहे, पण शेवटी पश्चिमेकडून तीन जहाजे आली. दर्यावर्दींनी बेट पाहिले; बेटावरील सोनेरी छपराचा राजवाडा त्यांना दिसला; राजवाड्याभोवतालची सुंदर बाग त्यांच्या नजरेस पडली.

"काय आश्चर्य!" ते उद्गारले. "इथून अनेकदा आपण जहाजामधून गेलोय, पण निळ्या लाटांशिवाय दुसरं काहीही कधी इथं दृष्टीस पडलं नव्हतं. चला, किनाऱ्यावर जाऊ!"

तीनही जहाजांनी नांगर टाकले. तीन व्यापारी छोट्या होडीत बसले

व बेटाकडे निघाले. धनुर्धारी आंद्रेई आधीपासूनच त्यांच्या स्वागताला सज्ज होता.

"यावं, यावं, पाहुणेमंडळी!"

व्यापारी जेवढे अधिक पाहू लागले, तेवढे त्यांचे आश्चर्य दुणावत गेले. राजवाड्याचे छप्पर आगीप्रमाणे चमकत होते, झाडांवर पक्षी गात होते आणि अद्भुत प्राणी इकडेतिकडे बागडत होते.

"भल्या माणसा, हे अद्भुताहून अद्भुत इथं कुणी बांधलं?" व्यापाऱ्यांनी विचारले.

"माझा सेवक, बंधू नाऊम ह्यानं एका रात्रीत हे उभारलं!"

आंद्रेई पाहुण्यांना मेजवानीच्या दालनात घेऊन गेला.

"अरे बंधू नाऊम, आम्हाला काही खायला-प्यायला दे!"

अचानक अज्ञातातून एक मेज अवतरले. त्यावर उत्तमोत्तम खाद्यपदार्थांची आणि मद्यांची रेलचेल होती. व्यापाऱ्यांच्या आश्चर्याला पारावार राहिला नाही.

"भल्या माणसा, आपण देवघेव करू," व्यापारी म्हणाले. "तुझा सेवक, बंधू नाऊम आम्हाला दे आणि त्याच्या बदल्यात तुला आवडेल ती

एक अद्भुत गोष्ट आमच्याकडून घे."

"ठीक आहे. कोणत्या अद्भुत गोष्टी तुमच्यापाशी आहेत?"

एका व्यापाऱ्याने आपल्या कोटाखालून एक सोटा काढला. एखाद्याने नुसते एवढेच म्हणायचे: "तर सोटचा, त्या माणसाची हाडं नरम कर!" आणि सोटा लगेच कामाला लागायचा आणि बलाढ्यातील बलाढ्य माणसाची हाडे मोडून टाकायचा.

दुसऱ्या व्यापाऱ्याने आपल्या कफ्तानमधून एक कुऱ्हाड बाहेर काढली व तिच्या दांड्यावर उभी केली. कुऱ्हाड खाड खाड लाकडे फोडू लागली–खट् खट्, खट्–एक जहाज बाहेर आले; खट्, खट्, खट्–दुसरे जहाज बाहेर पडले. सगळी जहाजे शिडांसकट सज्ज होती, त्यांच्यावर तोफा चढविलेल्या होत्या आणि शूर खलाशी होते. जहाजे सागरसंचाराला निघाली, तोफा उडल्या व शूर खलाशी हुकूम मागू लागले. त्याने कुऱ्हाड उलटी केली आणि काय! जहाजे नाहीशी झाली! जणू ती कधी नव्हतीच!

तिसऱ्या व्यापाऱ्याने आपल्या खिशामधून एक अलगुज काढले व फुंकले. आणि काय! आख्खी सेना उभी झाली – घोडदळ आणि पायदळ; तोफा व बंदुकांनी सज्ज. सेनादल संचलन करू लागले, बँड वाजत होता, पताका फडकत होत्या आणि घोडेस्वार दौडत हुकूम मागायला आले.



मग व्यापाऱ्याने दुसऱ्या टोकाने अलगुज फुंकले आणि काय! – सर्व काही अदृश्य झाले.

"मला तुमच्या अद्भुत गोष्टी आवडल्या," धनुर्धारी आंद्रेई म्हणाला, "पण माझ्याजवळच्या गोष्टीचं मोल त्यांच्यापेक्षा जास्त आहे. जर तुम्ही कबूल होत असाल, तर बंधू नाऊमच्या बदल्यात मी तुमच्या तीनही अद्भुत गोष्टी घेईन."

"तुम्ही फार मागता आहात असं नाही वाटत?"

"मुळीच नाही. एक तर माझी मागणी मान्य करा अथवा हा सौदा विसरून जा."

व्यापाऱ्यांनी खूप विचार केला. "सोटा, कुऱ्हाड आणि अलगुज घेऊन आपण काय करणार? बंधू नाऊमला त्या गोष्टींच्या बदल्यात घेणं जास्त फायद्याचं ठरेल. मग इकडची काडी तिकडे न करता, रात्रंदिवस आपल्याला मनःपूत खायला-प्यायला मिळेल!"

तेव्हा सोटा, कुऱ्हाड आणि अलगुज ह्या वस्तू व्यापाऱ्यांनी आंद्रेईला

देऊन टाकल्या व ते ओरडले : "अरे बंधू नाऊम, आमच्याबरोबर चलतोस ना? आमची तू खरंच सेवा करशील ना?"

"का नाही?" आवाज आला. "मी कुणाचीही सेवा केली तरी मला सगळं सारखंच!"

व्यापारी जहाजांवर परत गेले आणि त्यांनी खूप जल्लोष केला : खूप खायले, खूप प्यायले आणि सतत ओरडत राहिले :

"बंधू नाऊम, लौकर पावलं टाक. आम्हाला हे आणून दे – आम्हाला ते आणून दे!"

खूप झिंगेपर्यंत ते प्यायले आणि बसल्या जागीच घोरू लागले.

दरम्यान धनुर्धारी राजवाड्यात एकटाच बसला होता व चिंता करीत होता. "देवा रे देवा, माझा विश्वासू सेवक, बंधू नाऊम कुठं आहे?"

"मी इथं आहे. काय इच्छा आहे तुझी?"

आंद्रेईला अत्यानंद झाला. "घरी जायची वेळ झाली नाही का? माझ्या तरुण बायकोकडं? बंधू नाऊम, मला घरी ने."

पुन्हा आंद्रेईला वाऱ्याच्या झोताने पकडले व त्याच्या देशाला नेले.

इकडे व्यापारी जागे झाले. त्यांना मळमळत होते व तहान लागली होती. "अरे बंधू नाऊम!" ते ओरडले. "आम्हाला काहीतरी खायला-प्यायला दे! लौकर!"

पण त्यांचे ओरडणे व्यर्थ ठरले. आणि पाहतात तो काय! बेट नाहीसे झालेले! त्या बेटाच्या जागी केवळ निळ्या लाटा उसळत होत्या.

व्यापारी संतापले. "आमची फसवणूक करणारा किती वाईट माणूस!" ते म्हणाले. पण त्यावर त्यांच्यापाशी काहीही उपाय नव्हता, म्हणून त्यांनी जहाजांची शिडे उभारली व आपल्या वाटेने ते निघून गेले.

दरम्यान धनुर्धारी आंद्रेई उड्डाण करीत घरी गेला व स्वतःच्या झोपडी-शेजारी उतरला. पण जेथे त्याची झोपडी होती तेथे आता फक्त जळके धुरांडे उभे होते.

खालच्या मानेने तो निळ्या सागरावरील एका निर्जन स्थळी गेला. तेथे बसून तो शोक करीत होता, तेवढ्यात अचानकपणे कुठूनतरी एक कबूतर उडत आले. त्या कबूतराने जमिनीवर पाय आपटताच त्याचे आंद्रेईच्या तरुण पत्नीमध्ये, राजकन्या मारीयामध्ये, रूपांतर घडले.

त्यांनी एकमेकांना आलिंगने दिली, प्रश्न विचारले व कोसळलेल्या आपत्तीची माहिती दिली.

"तू घर सोडून गेल्यापासून मी जंगलांमधून आणि रायांमधून कबूतर बनून उडते आहे," राजकन्या मारीया म्हणाली. "झारनं तीनदा मला बोलावणं धाडलं, पण मी त्यांना सापडले नाही, म्हणून त्यांनी आपलं छोटं घरकुल जाळून टाकलं."

"बंधू नाऊम, निळ्या सागरापाशी एक राजवाडा तू उभा करू शक-शील?"

"का नाही? डोळ्याची पापणी लवायच्या आत हे काम होईल!"

आणि खरोखरीच, त्यांनी भोवती नजर टाकीपर्यंत राजवाडा तयार झाला होता. राजवाडा भव्य होता आणि झारच्या राजवाड्यापेक्षा जास्त चांगला होता. त्याच्याभोवती प्रचंड हिरवा बगीचा होता, झाडांवर पक्षी गात होते आणि सर्व प्रकारचे अद्भुत प्राणी बागडत होते.

धनुर्धारी आंद्रेई आणि राजकन्या मारीया यांनी राजवाड्यात प्रवेश केला. एका खिडकीशी बसून एकमेकांकडे प्रेमळ नजरांनी पहात त्यांनी मनसोक्त गप्पा मारल्या. अशा रीतीने जगातील कोणतीही चिंता न करता त्यांचे जीवन सुखाने जात राहिले.

एक दिवस झार शिकारीवर आला असताना निळ्या सागरापाशी हा भव्य राजवाडा उभा असलेला त्याच्या दृष्टीस पडला. पूर्वी येथे कोणतीही वास्तू नसल्याचे झारच्या आठवणीत होते.

"कोणा ठकानं माझ्या जमिनीवर माझ्या परवानगीविना हे बांधकाम उभारलं?" झार म्हणाला.

तात्काळ त्याने चौकशीसाठी दूत धाडले. दूतांनी येऊन माहिती दिली की, धनुर्धारी आंद्रेईने हा राजवाडा बांधला होता व आपल्या तरुण पत्नीसह, राजकन्या मारीयासह, तो त्यात रहात होता.

झारचा संताप अनावर झाला. कुठे मला माहीत नाही कडे आंद्रेई गेला होता अथवा नाही आणि काय, मला ठाऊक नाही त्याने आणला अथवा नाही, ह्याची चौकशी करायला त्याने दूतांना पाठवले.

दूत धावत गेले, पळत आले आणि म्हणाले:

"होय, धनुर्धारी आंद्रेई कुठे, मला माहीत नाही कडे गेला होता

आणि काय, मला ठाऊक नाही याला त्याने आणले होते."

आता मात्र झारच्या रागाने कळस गाठला. त्याने आपल्या शिपायांना गोळा केले आणि सागरावर पाठविले. राजवाडा भुईसपाट करा आणि धनुर्धारी आंद्रेई व राजकन्या मारीया यांचे क्रूरपणे वध करा, अशा झारने आपल्या शिपायांना आज्ञा दिल्या होत्या.

अत्यंत प्रबल सेना आपल्याविरुद्ध चालून येत असल्याचे जेव्हा आंद्रेईने पाहिले तेव्हा त्याने कुऱ्हाड बाहेर उपसली व तिला तिच्या दांड्यावर उभे केले. खट्-खट् – कुऱ्हाड चालू लागली व सागरावर एक जहाज उभे राहिले; पुन्हा खट्-खट् – दुसरे जहाज उभे राहिले; अशी शंभर जहाजे कुऱ्हाडीने निर्माण केली.

नंतर आंद्रेईने अलगुज फुंकले – घोडदळ व पायदळ सेना निर्माण झाली. ह्या सेनेपाशी तोफा आणि बंदुका होत्या, तिच्या पताका फडकत होत्या.

कप्तान दौडत आले व हुकूमांची वाट पाहू लागले. आंद्रेईने त्यांना

लढण्याची आज्ञा केली. बँड वाजू लागले, पडघम घुमू लागले आणि सेनादले निघाली. पायदळ सैनिकांनी झारच्या सैन्यात खिंडार पाडले आणि घोडदळाने अनेकांना कैद केले. शंभर जहाजांच्या काफल्याने आपल्या तोफांची तोंडे झारच्या राजधानीवर रोखली.

आपले सैनिक पाठीला पाय लावून पळत असलेले जेव्हा झारने पाहिले तेव्हा त्यांना थोपवायला तो पुढे सरसावला. या क्षणाला आंद्रेईने सोटा बाहेर काढला.

"सोटचा, सोटचा, झारची हाडं नरम कर!"

सोटा ताड ताड मैदानातून गेला व त्याने झारच्या कपाळावर जोरात प्रहार करून झारला ठार केले.

तेथेच लढाई संपली. राजधानीमधून लोकांचे घोळके आले व धनुर्धारी आंद्रेईने झार व्हावे अशी त्यांनी विनवणी केली.

आंद्रेईची काही हरकत नव्हती. त्याने शानदार मेजवानी दिली व आयुष्याच्या अखेरीपर्यंत राजकन्या मारीयासह सुखाने राज्य केले.



छोटी मुलगी आणि हंस पक्षी

एक होता शेतकरी आणि त्याला होती एक बायको. त्या जोडप्याला होती एक छोटी मुलगी व एक छोटा मुलगा.

एकदा छोटया मुलीला तिची आई म्हणाली: "मुली, आम्ही कामासाठी बाहेर जातोय, तेव्हा तुझ्या छोटया भावाला सांभाळ. जर तू शहाण्या मुलीसारखी वागलीस आणि घराबाहेर गेली नाहीस, तर आम्ही तुझ्यासाठी नवा रुमाल विकत आणू."

आई व वडील बाहेर निघून गेले, पण छोटी मुलगी त्यांनी सांगितलेली गोष्ट विसरली. तिने छोटया भावाला खिडकीखाली गवतावर बसविले आणि मैत्रिणींबरोबर खेळायला ती पळून गेली.

अचानक हंस पक्ष्यांचा एक थवा खाली झेपावला, छोटया भावाला त्यांनी वर उचलले व आपल्या पंखांवर बसवून परत उडू लागले.

छोटी मुलगी घरी आली तो काय! छोटा भाऊ नाहीसा झालेला! तिने धापा टाकीत सगळीकडे शोधाशोध केली, पण भावाचा कुठेही मागमूस लागेना.

तिने छोटया भावाला खूप हाका मारल्या. आता आई-वडिलांकडून चांगलाच मार बसणार म्हणून ती हुंदकून हुंदकून रडू लागली. पण छोटया भावाकडून उत्तर काही मिळेना!

अखेर ती खुल्या माळावर धावत गेली. पण गर्द रानाच्या पलिकडे दूरवर उडणाऱ्या हंस पक्ष्यांच्या एका थव्याशिवाय दुसरे काहीही तिच्या नजरेस पडले नाही. अचानक तिच्या ध्यानात आले की, त्या हंसांनीच तिच्या

भावाला पळविले होते. लोक सांगायचे की, हंस पक्षी फार दुष्ट होते व लहान मुलांना ते चोरून नेत.

म्हणून छोटी मुलगी पक्ष्यांमागे धावली. खूप खूप धावल्यानंतर ती एका भट्टीपाशी आली.

"भट्टी, भट्टी, सांग मला, कुठं उडाला हंस पक्ष्यांचा थवा?"

"माझा एक रायचा पाव खा, मग मी सांगीन," भट्टी म्हणाली.

"काय, मी रायचा पाव खाऊ? बाबांच्या घरी आम्ही गव्हाच्या पावालासुद्धा हात लावत नाही!"

तेव्हा भट्टीने तिला काहीच सांगितले नाही. छोटी मुलगी आणखी पुढे थोडी धावत गेली. तिला सफरचंदाचे एक झाड दिसले.

"सफरचंदाच्या झाडा, सफरचंदाच्या झाडा, सांग मला, कुठं उडाला हंस पक्ष्यांचा थवा?"

"माझं एक रानटी सफरचंद खा, मग मी तुला सांगीन," झाड म्हणाले.

"बाबांच्या घरी आम्ही बागेतल्या सफरचंदांनासुद्धा हात लावत नाही!"

तेव्हा सफरचंदाच्या झाडाने तिला काहीही सांगितले नाही. छोटी मुलगी पुढे धावत निघाली. अखेर ती दुधाच्या नदीपाशी आली. त्या नदीचे किनारे फळांच्या मुरंब्यांचे होते.

"फळांच्या मुरंब्यांचे किनारे असलेल्या दुधाच्या नदी, सांग मला, कुठं उडाला हंस पक्ष्यांचा थवा?"

दुधाबरोबर थोडा मुरंबा खा आणि मग मी सांगीन तुला."

"बाबांच्या घरी आम्ही सायीबरोबर-सुद्धा मुरंबा खात नाही."

तेव्हा दुधाच्या नदीने काहीही सांगितले नाही.

सबंध दिवसभर छोटी मुलगी शेतां-मधून आणि रायांमधून धावत होती. जेव्हा संध्याकाळ झाली तेव्हा घरी परत जाण्याशिवाय तिच्यापुढे दुसरा पर्याय राहिला नाही. अचा-

नक तिच्या नजरेला एक झोपडी दिसली. एक छोटी खिडकी असलेली ती झोपडी कोंबडीच्या पायांवर उभी होती व सारखी गोल गोल फिरत होती.

झोपडीत बसली होती बाबा-यागा चेटकीण सूत कातत. आणि बाकड्यावर बसला होता मुलीचा छोटा भाऊ चांदीच्या सफरचंदांशी खेळत.

छोटी मुलगी झोपडीत गेली.

"नमस्ते, आजी!"

"काय ग मुली, इथं कशाला आलीस?"

"माझा झगा दंवानं भिजून ओला झालाय, म्हणून त्याला कोरडा करायला मी आलेय."

"तर बैस इथं आणि थोडं सूत काढ."

बाबा-यागाने छोट्या मुलीला सूत कातण्याची चाती दिली व ती बाहेर गेली. छोटी मुलगी सूत काढत तेथे बसली, तेवढ्यात चुलाण्याखालून एक उंदीर धावत आला व तिला म्हणाला:

"मुली, मुली, थोडी खीर दे मला आणि एक गंमत सांगतो तुला!"

छोट्या मुलीने उंदराला थोडी खीर दिली. उंदीर म्हणाला:

"बाबा-यागा बान्यात* जाळ पेटवायला गेलीय. तुला ती वाफेचा शेक देईल, स्वच्छ आंघोळ घालील, भट्टीत भाजून काढील, तुला खाऊन टाकील आणि मग तुझ्या हाडांवरून रपेटीला जाईल!"

---

* रशियन हमामखाना – अनु.



छोटी मुलगी रडू लागली व भीतीने थरथर कापू लागली. पण उंदीर पुढे म्हणाला:

"घाई कर, छोटचा भावाला घे आणि पळून जा. मी तुझ्यासाठी सूत काढत बसतो."

म्हणून छोटचा मुलीने छोटचा भावाला कडेवर उचलून घेतले व तिने धूम ठोकली. बाबा-यागा अधूनमधून खिडकीपाशी यायची व विचारायची:

"तू सूत काढते आहेस ना मुली?" आणि उंदीर उत्तर द्यायचा: "होय, आजी!"

बाबा-यागाने बान्यात प्रचंड जाळ पेटविला व छोटचा मुलीला घेऊन जाण्यासाठी ती झोपडीत आली. पण झोपडीत कुणीच नव्हते. बाबा-यागा ओरडली: "हंस पक्ष्यांनो, उडा लौकर, जाऊन त्यांना धरा लौकर! छोटचा मुलीनं पळवलाय छोटा भाऊ!"

छोटी मुलगी धावत धावत दुधाच्या नदीपर्यंत आली. तेवढ्यात तिला व तिच्या भावाला पकडण्यासाठी हंस पक्षी पाठीमागून येत असलेले तिने पाहिले.

"दुधाच्या नदी, दुधाच्या नदी, पडते तुझ्या पाया, पण लपव आम्हाला!" छोटी मुलगी ओरडली.

"माझ्या फळांचा थोडा मुरंबा खा!"

छोटया मुलीने थोडा मुरंबा खाल्ला व आभार मानले. तेव्ह दुधाच्या नदीने आपल्या फळांच्या मुरंब्यांच्या किनाऱ्यांच्या सावलीत छोटया मुलीला व तिच्या भावाला लपविले.

आणि त्यांना न पाहताच हंस पक्षी पुढे उडत गेले.

छोटी मुलगी परत धावली. पण हंस पक्षी मागे फिरले व सरळ तिच्य रोखाने येऊ लागले. कोणत्याही क्षणी ती त्यांना दिसली असती. आता तं काय करणार? म्हणून ती सफरचंदाच्या झाडाकडे धावली.

"सफरचंदाच्या झाडा, सफरचंदाच्या झाडा, पडते तुझ्या पाया पण लपव आम्हाला!"

"माझी रानटी सफरचंदं खा!"

छोटचा मुलीने एक सफरचंद पटकन खाल्ले व आभार मानले. सफरचंदाच्या झाडाने आपल्या पानांमध्ये व फांद्यांमध्ये त्यांना लपविले.

त्यांना न पाहताच हंस पक्षी पुढे उडत गेले.

छोटचा मुलीने भावाला उचलले व परत ती धावू लागली. जवळ जवळ घरापर्यंत ती पोहोचली होती, तेवढचात हंस पक्ष्यांनी तिला पाहिले. त्यांनी मोठ्ठा कलकलाट केला, पंखांची जोरात फडफड केली व आणखी एका मिनिटाच्या अवधीत छोटचा भावाला त्यांनी तिच्या हातांमधून हिसकावून नेले असते!

छोटी मुलगी भट्टीपाशी धावली.

"भट्टी, भट्टी, पडते तुझ्या पाया, पण लपव आम्हाला!"

"माझा एक रायचा पाव खा!"

छोटचा मुलीने रायच्या पावाचा एक तुकडा तोंडात कोंबला आणि भावासकट ती भट्टीत रांगत शिरली.

हंस पक्ष्यांनी भट्टीभोवती रिंगण घालून खूप गोंगाट केला, पण थोडचा वेळानंतर नाद सोडून ते बाबा-यागाकडे परतले.

छोटचा मुलीने भट्टीचे आभार मानले व भावाला घेऊन ती घराकडे पळाली.

आणि तेवढचात आई-वडील घरी आले.

रुपेरी थाळी आणि पिकलेले सफरचंद

एक होता म्हातारा आणि एक होती म्हातारी. त्यांना तीन मुली होत्या. दोघी छान छान कपडे करायच्या, खूप खूप मजा करायच्या, पण तिसरी मुलगी शांत स्वभावाची आणि लाजरी होती. थोरल्या मुली रंगीबेरंगी साराफान* अंगात घालत, उंच टाचांचे बूट घालत, मुलामेदार मणी माळत. पण माशा [मार्या ह्या नावाचे लाडके रूप – अनु.] काळ्या रंगाचे पोषाख वापरायची, तिचे डोळे मात्र तेजस्वी होते. माशाचे सारे सौंदर्य तिच्या लांबसडक सोनेरी वेणीत साठवलेले होते. जमिनीपर्यंत रुळणारी तिची वेणी फुलांना बाजूला सारत जायची. थोरल्या बहिणी काहीही काम न करता नुसत्या टिवल्याबावल्या करण्यात वेळ दवडायच्या, पण माशा सकाळपासून संध्याकाळपर्यंत कामांमध्ये गुंतलेली असायची: ती घरात काम करायची, शेतात काम करायची, परसातल्या भाजीच्या वाफ्यात काम करायची. वाफ्यात पाणी घालायची, सर्पणाची लाकडे फोडायची, गायीचे दूध काढायची, बदकांना खाऊ घालायची. कुणी काहीही मागो, माशा ताबडतोब आणून द्यायची. कधी कुणाला एका शब्दाने उलट बोलायची नाही, उलट तत्परतेने सर्व कामे पार पाडायची. थोरल्या बहिणी तिला हुकूम ठोकायच्या, त्यांच्यासाठी राबवून घ्यायच्या. माशा मुकाटपणे सर्व करायची.

त्यांचे आयुष्य असे चालले होते.

एक दिवस म्हातारा कडबा घेऊन जत्रेला निघाला. त्याने मुलींना भेटवस्तू

---

* रशियन पद्धतीचा लांब झगा – अनु.

आणायचे वचन दिले. एका मुलीने सांगितले :

"बाबा, मला साराफानसाठी रेशमी कापड विकत घ्या."

दुसरी मुलगी म्हणाली :

"मला लाल मखमल विकत आणा."

माशा मात्र गप्प होती. म्हाताऱ्याला तिची दया आली.

"तुला काय आणायचं, माशेन्का?"

"बाबा, माझ्यासाठी पिकलेलं सफरचंद आणि रुपेरी थाळी आणा."

तिच्या बहिणी पोट दुखेपर्यंत खदखदून हसल्या.

"माशा ग माशा, अशी कशी वेडी तू! आपल्या बागेत रग्गड सफरचंदं आहेत, पाहिजे ते निवड! आणि तुला थाळी काय करायची? बदकांना खाऊ घालायला?"

"नाही, बहिणींनो. मी सफरचंदाला थाळीत गोल गोल फिरवत राहीन आणि जादूचे मंत्र म्हणीन. एका म्हातारीला मी कलाच दिला, तेव्हा तिनं मला ते मंत्र शिकवलेत."

"ठीक आहे, म्हातारा म्हणाला. "आपल्या धाकट्या बहिणीला हसायचं काही कारण नाही! प्रत्येकीच्या इच्छेप्रमाणं वस्तू घेऊन येईन."

तो जवळच्या अथवा दूरच्या अंतरावर गेला, थोडा काळ अगर खूप काळ जत्रेत राहिला, कुणालाही माहीत नाही. पण त्याने कडबा विकला, मुलींसाठी वस्तू विकत घेतल्या. एका मुलीसाठी निळे रेशमी कापड विकत घेतले, दुसरीला लाल मखमली कापड विकत घेतले आणि माशासाठी रुपेरी थाळी व पिकलेले सफरचंद विकत घेतले.

थोरल्या बहिणी आनंदाने फुलल्या. त्या स्वतःसाठी साराफान शिवू लागल्या आणि माशाला चिडवू लागल्या.

"मूर्खे, बैस तुझी थाळी घेऊन..."

माशा झोपडीतील एका कोपऱ्यात बसली, पिकलेले सफरचंद रुपेरी थाळीत गोल फिरवू लागली आणि मंत्र म्हणू लागली :

"पिकलेल्या सफरचंदा, रुपेरी थाळीत फिर गोल गोल, दाखव मला गावं आणि शेतं, दाखव मला जंगलं आणि समुद्र, दाखव मला उंच डोंगर आणि सुंदर आकाश, दाखव मला लाडकी मायभू – रूस!"

अचानक रुप्याचा खणखणाट झाला, सबंध झोपडी प्रकाशाने लखलखली.

पिकलेले सफरचंद रुपेरी थाळीत गोल गोल फिरत होते, थाळीत सगळी शह दिसत होती, सगळी कुरणे दिसत होती, मैदानात पलटणी दिसत होत्या, समुद्रावर ची गलबते दिसत होती, उंच डोंगर आणि निळे सुंदर आकाश दिसत होते आकाशात तेजस्वी सूर्य चंद्रकोरीमागे तरंगत जात होता, तारे रिंगण धरू नाचत होते, हंस सरोवरांमध्ये गाणी गात होते.

बहिणींनी ते पाहिले आणि मत्सराने त्या लाल-जांभळ्या बनल्या. माशा पासून ती थाळी आणि ते सफरचंद कसे हस्तगत करावे ह्याचा विचार कर लागल्या. पण माशाला दुसऱ्या कशाचीही इच्छा नव्हती, मोबदल्यादाखल

दुसरे काहीही ती घेत नव्हती. रोज संध्याकाळी त्या थाळीशी खेळण्यात ती रमून जात होती.

एक दिवस थोरल्या बहिणी माशाला रानात चलण्याचा आग्रह करू लागल्या.

"लाडक्या भगिनी, रानात रानफळं गोळा करायला जाऊ या. आई-बाबांसाठी स्ट्रॉबेरी आणू या."

तिघी बहिणी रानात गेल्या. रानफळे कुठेच दिसेनात. स्ट्रॉबेरींचा मागमूस नव्हता.

माशाने थाळी बाहेर काढली, तिच्यावर सफरचंद फिरवले आणि ती मंत्र म्हणू लागली: "रुपेरी थाळीत पिकलेल्या सफरचंदा फिर गोल गोल, दाखव स्ट्रॉबेरी कुठं उगवतात, दाखव आकाशी रंगाची फुलं कुठं फुलतात."

एकदम रूप्याचा खणखणाट झाला, रुपेरी थाळीत पिकलेले सफरचंद गोल गोल फिरले व थाळीत रानातली सगळी स्थळे दिसू लागली: स्ट्रॉबेरी कुठे उगवत होत्या, आकाशी रंगाची फुले कुठे फुलत होती, अळंब्या कुठे लपल्या होत्या, निर्झर कुठे खळखळत होते, सरोवरांमध्ये हंस कुठे गात होते.

थोरल्या बहिणींनी हे सर्व पाहिले तेव्हा त्यांचे डोळे मत्सराने पेटले. त्यांनी एक गाठाळ काठी घेतली आणि माशाला ठार मारले. माशाचे प्रेत त्यांनी भोजाच्या झाडाखाली पुरले व रुपेरी थाळी आणि सफरचंद स्वतःच्या ताब्यात घेतले. संध्याकाळी त्या घरी परतल्या. करंडचा गच्च भरून अळंब्या आणि रानफळे त्यांनी घरी आणली. आई-बापाला त्या म्हणाल्या:

'माशा आमच्यापासून पळून गेली. आम्ही सारं रान धुंडाळलं, पण ती सापडली नाही. बहुधा लांडग्यांनी तिला खाल्लं!"

आई रडू लागली. बाप म्हणाला:

"सफरचंदाला रुपेरी थाळीत फिरवा, आपली माशा कुठे आहे ते कदाचित सफरचंद दाखवील."

थोरल्या बहिणींची पाचावर धारण बसली. पण बापाची आज्ञा पाळणे भाग होते. सफरचंदाला त्यांनी थाळीवर फिरविले, पण थाळीत सफरचंद फिरेना, थाळीत दिसेनात जंगले, मैदाने, उंच डोंगर, सुंदर आकाश!

ह्या दरम्यान एक तरुण मेंढपाळ त्याची हरवलेली मेंढी रानात हुडकत होता. त्याच्या नजरेला ते शुभ्र भोजाचे झाड दिसले. झाडाच्या बुंध्याखाली ताज्या गवताचा उंचवटा होता आणि त्या उंचवटयाभोवती आकाशी रंगाची फुले फुलत होती. फुलांमध्ये लांब, सडपातळ वेळू उगवत होते. तरुण मेंढपाळाने एक वेळू तासला व त्याचे अलगुज बनविले. त्याने ते अलगुज नुसते ओठांवर टेकवताच अलगुज आपोआप वाजू लागले, बोलू लागले:

"वाजव, वाजव, वेळूच्या अलगुजा, तरुण मेंढपाळाला शांत कर. मला बिचारीला, तरुण मुलीला त्यांनी मारलं ठार, रुपेरी थाळीसाठी, पिकलेल्या सफरचंदासाठी!"

मेंढपाळ खूप घाबरला. तो धावत धावत खेडयात गेला व त्याने लोकांना ही हकीकत सांगितली. लोक जमले आणि नवल करू लागले.

तेवढयात माशाचा बाप तेथे धावत आला. त्याने अलगुज नुसते हातात घेताच अलगुज आपोआप गाऊ लागले, बोलू लागले:

"वाजव, वाजव, वेळूच्या अलगुजा वाजव, माझ्या लाडक्या बापाला शांत कर. मला बिचारीला, तरुण मुलीला, त्यांनी मारलं ठार,

रुपेरी थाळीसाठी, पिकलेल्या सफरचंदासाठी."

बाप रडू लागला:

"हे तरुण मेंढपाळा, जिथं तू हे अलगुज बनवलंस, तिथं आम्हाला घेऊन चल."

मेंढपाळ त्यांना रानात भोजाच्या झाडाजवळच्या उंचवटयापाशी घेऊन गेला. भोजाखाली आकाशी रंगाची फुले फुलत होती, भोजावर निळे पक्षी गाणी गात होते.

मातीचा उंचवटा त्यांनी उकरला तेव्हा खड्डयात माशा निजलेली त्यांना दिसली. ती मेलेली होती, पण जिवंतपणीपेक्षा जास्त सुंदर दिसत होती. तिचे गाल गुलाबी दिसत होते. जणू ती तरुणी झोपलीय असे भासत होते.

अलगुज वाजू लागले, बोलू लागले:

"वाजव, वाजव, वेळूच्या अलगुजा वाजव. मला बहिणी रानात घेऊन आल्या, मला बिचारीला त्यांनी मारलं ठार, रुपेरी थाळीसाठी, पिकलेल्या सफरचंदासाठी. वाजव, वाजव, वेळूच्या अलगुजा वाजव. बाबा, झारच्या विहीरीतून स्फटिकासारखं पाणी आणा!"

दोघी मत्सरी बहिणींची भीतीने गाळण उडाली, त्यांचे चेहरे पांढरेफटक पडले. त्यांनी गुडघे जमिनीवर टेकवून स्वत:चा अपराध कबूल केला. झारचा हुकूम होईपर्यंत, त्याची सर्वोच्च आज्ञा येईपर्यंत, दोघी बहिणींना लोखंडी कुलुपांआड बंदिवान करून ठेवण्यात आले.

जिवंत पाणी आणण्यासाठी म्हातारा झारच्या शहरी जायला निघाला.

तो लौकर अथवा उशीरा तेथे पोहोचला ते माहीत नाही – पण अखेरीस तो शहरात पोहोचला, राजवाडयापाशी गेला. तेवढयात सोनेरी देवडीमधून झार तेथे आला.

म्हाताऱ्याने त्याला जमिनीपर्यंत लवून मुजरा केला व सर्व हकीकत सांगितली.

झार म्हाताऱ्याला म्हणाला:

"म्हाताऱ्या, माझ्या झारच्या विहीरीतून जिवंत पाणी घेऊन जा. जेव्हा तुझी मुलगी जिवंत होईल तेव्हा तिला आमच्यापाशी आण, रुपेरी थाळी आणि सफरचंदासकट, तिच्या दुष्ट मत्सरी बहिणींसकट!"

म्हातारा खूप आनंदला, त्याने लवून मुजरा केला व जिवंत पाण्याची कुपी घेऊन घरी परतला.

माशाच्या देहावर त्याने त्या कुपीतील जिवंत पाणी किंचित शिंपडताच माशा तात्काळ जिवंत झाली व बापाच्या मानेभोवती ती कबूतराप्रमाणे बिलगली.

माणसे हा चमत्कार पहायला धावत आली, त्यांना खूप आनंद झाला.

मुलींना घेऊन म्हातारा शहरात गेला. त्याला राजवाड्यातील दरबारात नेण्यात आले.

झार आला. त्याने मार्याला पाहिले. जणू वसंतामधील फुलासारखी ती तरुणी उभी होती – डोळे सूर्यासारखे तेजस्वी, चेहऱ्यावर पहाटेची आभा फुललेली, गालांवरून ओघळणारे अश्रू जणू मोत्यांप्रमाणे भासत होते.

झारने मार्याला विचारले :

"तुझी थाळी आणि पिकलेलं सफरचंद कुठं आहे ?"

मार्याने रुपेरी थाळीत पिकलेले सफरचंद ठेवले आणि त्याला गोल गोल फिरविले.

एकदम रुप्याचा खणखणाट झाला. थाळीत एकामागून एक रशियन शहरे दिसू लागली, त्या शहरांमध्ये निशाणे घेऊन सैनिकांच्या पलटणी गोळा होत होत्या, लढाईला सज्ज होत होत्या, सैनिकांच्या पुढचात त्यांचे नेते उभे होते, नेत्यांपुढे त्यांचे प्रमुख उभे होते, दहा तुकडचांसमोर दहा तुकडचांचे पुढारी उभे होते. गोळीबाराची धुमश्चक्री माजली होती, धुराचे लोट आकाशात उठत होते, नजरेला काही दिसत नव्हते.

रुपेरी थाळीत पिकलेले सफरचंद गोल गोल फिरत होते. थाळीत उसळणारा समुद्र दिसू लागला, हंसांप्रमाणे भासणारी गलबते सागरसंचार करीत होती, त्यांची निशाणे फडकत होती, त्यांच्या तोफा धडाडत होत्या. लढाईची जोरदार धुमश्चक्री उडाली होती, धुराचे लोट आकाशात उठत होते, नजरेला काही दिसत नव्हते.

रुपेरी थाळीत पिकलेले सफरचंद गोल गोल फिरत होते. थाळीत आकाश पूर्ण सौंदर्यानिशी उमटले : तेजस्वी सूर्य फिकट चंद्रकोरीमागे तरंगत जात होता, तारे रिंगण धरत होते, ढगांमध्ये हंस गाणी गात होते.

झार ह्या चमत्कारांचे नवल करीत होता, पण सुंदर मार्या मात्र सतत रडत होती. ती झारला म्हणाली :

"माझी रुपेरी थाळी आणि पिकलेलं सफरचंद तुम्ही घ्या, पण माझ्या बहिणींवर दया करा, माझ्याखातर त्यांना ठार मारू नका !"

झारने माशाला वर उठवीत म्हटले :

"तुझी थाळी रुप्याची आहे, पण तुझं काळीज सोन्याचं आहे. माझी लाडकी पत्नी व्हायची, ह्या राज्याची प्रेमळ झारीत्सा व्हायची, तुझी इच्छा आहे ? आणि तुझ्या विनंतीखातर तुझ्या बहिणींना मी दया दाखवीन."

झारकड बीयर उकळण्याची ...
नव्हती. त्याच्या कोठारांमध्ये बीयर आणि दारूची भरपूर पिंपे उभी होती. तेव्हा ताबडतोब धुमधडाक्याने लग्न झाले. सगळ्या जगभर त्या लग्नाचा गाजावाजा झाला. लग्नात अशी धडाकून वाद्ये वाजली, की आकाशातून तारे खाली कोसळले. माणसे अशी दणकून नाचली, की फरशा फुटल्या. संपली गोष्ट ...

जादूचा मासा

कोणे एके काळी रहात होता एक म्हातारा. त्याला होते तीन मुलगे. त्यांपैकी दोघे हुशार तरुण होते आणि तिसरा येमेल्या मूर्ख होता. दोघे मोठे भाऊ सतत कामावर असत, पण येमेल्या मात्र कसलीही चिंता न करता सबंध दिवसभर चुलाण्याच्या कट्ट्यावर निजून रहायचा.

एके दिवशी दोघे भाऊ बाजाराला गेले आणि त्यांच्या बायका म्हणाल्या :

"येमेल्या, थोडं पाणी घेऊन ये."

चुलाण्याच्या कट्ट्यावर निजलेला येमेल्या म्हणाला :

"मी नाही आणणार. माझी इच्छा नाही."

"जा येमेल्या, नाही तर तुझे भाऊ तुला बाजारातून भेटवस्तू आणणार नाहीत."

"तसं असेल तर जातो."

येमेल्या चुलाण्यावरून खाली उतरला, त्याने पायात बूट चढविले, अंगात कफ्तान घातला व दोन बादल्या आणि एक कुऱ्हाड घेऊन तो नदीवर गेला.

त्याने बर्फात कुऱ्हाडीने भोक पाडले, दोन बादल्या भरून पाणी उपसले. नंतर बादल्या बाजूला ठेवून त्याने बर्फाच्या भोकात डोकावून पाहिले. त्याने खूप बारकाईने निरखून पाहिले तेव्हा एक मासा पाण्यात पोहत असलेला त्याच्या दृष्टीस पडला. येमेल्याने भसकन बर्फाच्या भोकात हात खुपसला आणि मासा त्याच्या हातात सापडला.

"अरे वा, आज जेवणाला मस्तपैकी माशाचं सार मिळेल!" आनंदून तो उद्गारला.

पण आश्चर्य म्हणजे तो मासा अचानक मानवी आवाजात बोलला :

"येमेल्या, मला मोकळं सोड. त्या बदल्यात एखादे दिवशी मी तुझं

काहीतरी भलं करीन."

पण येमेल्या नुसता हसला. "तू माझं काय भलं करणार? छे:, मला वाटतं मी तुला घरी घेऊन जावं आणि माझ्या भावाच्या बायकोला तुझं सार बनवायला सांगावं, मला माशाचं सार फार आवडतं!"

पण मासा त्याची परत विनवणी करू लागला:

"येमेल्या, मला सोडून दे. तुझी कोणतीही इच्छा मी पुरी करीन."

"ठीक आहे," येमेल्या उत्तरला, "मात्र तू मला फसवण्याचा प्रयत्न करत नाहीस हे प्रथम सिद्ध कर."

मासा म्हणाला: "येमेल्या, सांग तुझी इच्छा."

"पाण्याचा एक थेंबही न सांडता माझ्या बादल्या आपोआप घरी जाव्यात अशी माझी इच्छा आहे."

"ठीक आहे येमेल्या," मासा म्हणाला. "जेव्हा जेव्हा तुला एखादी इच्छा होईल, तेव्हा तेव्हा तू फक्त एवढंच म्हणायचं:

"'आज्ञा पाळा माशाची, इच्छा पुरी करा माझी!' आणि सगळं तात्काळ पूर्ण होईल."

येमेल्या सहजपणे म्हणाला: "आज्ञा पाळा माशाची, इच्छा पुरी करा माझी! बादल्यांनो, तुमच्या तुम्ही घरी जा!"

आणि काय चमत्कार! बादल्या वळल्या आणि टेकडी चढून गेल्या. येमेल्याने मासा परत बर्फाच्या भोकात सोडला व तो स्वत: बादल्यांमागून चालू लागला.

खेड्यातील रस्त्यावरून बादल्या गेल्या. खेडुत त्यांच्याकडे वळून वळून पहात होते व नवल करती होते. येमेल्या बादल्यांमागून चालताना गालातल्या गालात हसत होता. बादल्या थेट येमेल्याच्या झोपडीत शिरल्या आणि बाकावर उडी मारून उभ्या राहिल्या. येमेल्या परत चुलाण्याच्या कट्ट्यावर चढून बसला.

असा बराच काळ लोटला आणि येमेल्याची वहिनी त्याला म्हणाली:

"येमेल्या, तिथं निजून काय राहिलास? जा आणि थोडी लाकडं फोड."

"मी नाही जाणार. माझी इच्छा नाही," येमेल्या म्हणाला.

"आम्ही सांगतो तसं तू वागला नाहीस, तर तुझे भाऊ बाजारातून तुझ्यासाठी काहीही वस्तू आणणार नाहीत."

चुलाण्यावरून खाली उतरणे येमेल्याच्या जीवावर आले होते. त्याला माशाची आठवण झाली व तो श्वास रोखून पुटपुटला :

"आज्ञा पाळा माशाची, इच्छा पुरी करा माझी! कुऱ्हाडी, जाऊन थोडी लाकडं फोड आणि लाकडांनो, तुम्ही घरात येऊन चुलाण्यात पडा."

आणि काय चमत्कार! बाकाखालून कुऱ्हाड ताडदिशी उडी मारून बाहेर अंगणात गेली, लाकडे फोडायला तिने आरंभ केला, झोपडीत ओंडके व्यवस्थित रचले गेले आणि ते सगळे आपोआप चुलाण्यात उड्या मारू लागले.



असा बराच काळ लोटला आणि येमेल्याला त्याची वहिनी म्हणाली :

"येमेल्या, आपल्यापाशी मुळीच सर्पण नाही. रानात जा आणि झाडं तोडून आण."

येमेल्या चुलाण्यावर पाय लांब करीत म्हणाला : "मग तुमचं इथं काम काय?"

"येमेल्या, तुला काय म्हणायचंय?" बायका म्हणाल्या. "रानात जाऊन झाडं तोडून आणणं हे अर्थातच आमचं काम नाही!"

"पण मला हे काम करायची इच्छा नाही," येमेल्या म्हणाला.

"मग तुला काहीच भेटवस्तू मिळणार नाहीत," त्या म्हणाल्या.

यावर काही उपाय नव्हता, म्हणून येमेल्या चुलाण्यावरून खाली उतरला, त्याने पायात बूट चढविले, अंगात कफ्तान घातला. एक लांब दोर व कुऱ्हाड घेऊन तो अंगणात गेला आणि घसरगाडीत चढून बसत ओरडला :

"फाटक उघडा बायांनो!"

त्याची वहिनी त्याला म्हणाली : "मूर्खा, घसरगाडीत बसून काय करतोस? अजून तिला घोडा जुंपला नाहीस तू!"

"माझं घोड्यावाचून चालेल!" येमेल्या उत्तरला.

त्याच्या वहिनीने फाटक उघडले व येमेल्या श्वास रोखून पुटपुटला :

"आज्ञा पाळा माशाची, इच्छा पुरी करा माझी! घसरगाडी, तडक रानात जा!"

आणि काय चमत्कार! फाटकामधून एवढ्या वेगाने घसरगाडी बाहेर गेली, की एखाद्याला घोड्यावर बसूनसुद्धा तिला गाठता आले नसते.

रानात जायची वाट शहरामधून जात होती आणि घसरगाडीने अनेक लोकांना धक्के मारून पाडले व अनेकजण तिच्याखाली चिरडले. शहरवासी ओरडले : "धरा त्याला! पकडा त्याला!" पण येमेल्याने तिकडे लक्ष दिले नाही. तो घसरगाडीला सतत अधिक वेगाने जायला सांगत होता. शेवटी तो रानात पोहोचला, घसरगाडी थांबली आणि तो म्हणाला :

"आज्ञा पाळा माशाची, इच्छा पुरी करा माझी! कुऱ्हाडी, सुकी लाकडं तोड! लाकडांचे ओंडके एकापाठोपाठ एक घसरगाडीत येऊन पडले आणि त्यांच्या मोळ्या आपोआप बांधून तयार झाल्या. मग येमेल्याने कुऱ्हाडीला आज्ञा करून एक दणदणीत सोटा बनवून घेतला. तो सोटा एवढा जड होता की, एखाद्याला तो उचलणे अवघड होते. मग लाकडांच्या भाऱ्यांवर बसून येमेल्या म्हणाला :

"आज्ञा पाळा माशाची, इच्छा पुरी करा माझी! घसरगाडी, थेट घरी चल!"

आणि घसरगाडी खरेच प्रचंड वेगाने निघाली. येमेल्या परत शहरामधून

गेला. तेथे त्याने अनेकांना पाडले होते आणि चिरडले होते व म्हणून सगळे लोक त्याची वाटच पहात होते. त्यांनी येमेल्याला घसर-गाडीवरून खेचून खाली ओढले व शिव्या-शाप देत त्याला ते मारहाण करू लागले.

आपण वाईट परिस्थितीत सापडलो आहोत ह्याची जाणीव होताच येमेल्या श्वास रोखून पुटपुटला :

"आज्ञा पाळा माशाची, इच्छा पुरी करा माझी! चल सोटचा, हाण त्यांना तडाखे!"

सोटा ताडकन उठला व लोकांवर सपासप प्रहार करू लागला. शहरवासी ढुंगणाला पाय लावून पळू लागले. येमेल्या घरी गेला व शांतपणे परत चुलाण्यावर चढून बसला.

असा बराच काळ लोटला. झारच्या कानांवर येमेल्याच्या करामतींच्या बातम्या गेल्या. त्याने येमेल्याला पकडून राजवाडचा-वर आणण्यासाठी एका अंमलदाराला पाठविले.

अंमलदार येमेल्याच्या खेडचात आ-ला. येमेल्याच्या झोपडीत प्रवेश करून तो म्हणाला: "मूर्ख येमेल्या तो तूच का?"

चुलाण्याच्या कट्टचावरून येमेल्या उत्तरला :

"समज, तोच मी असलो तर काय?"

"कपडे घाल लौकर. तुला झारच्या राजवाड्यावर न्यायचं आहे."

"नाही, मला तिथं जायची इच्छा नाही," येमेल्या म्हणाला.

अंमलदार चिडला आणि त्याने येमेल्याच्या एक थोबाडीत मारली. येमेल्या श्वास रोखून पुटपुटला: "आज्ञा पाळा माशाची, इच्छा पुरी करा माझी! चल सोट्या, त्याला चांगला तिंबून काढ!"

सोटा उठला आणि त्याने त्या अंमलदाराला बेदम चोपून काढले. अंमलदाराने आपला जीव अगदी कसाबसा वाचविला.

आपला अंमलदार येमेल्याला पकडून आणू शकला नाही हे ऐकून झार खूप चकित झाला–त्याने आपल्या एका सर्वात मोठ्या सरदाराला बोलावून घेतले.

"येमेल्याला शोधून माझ्या राजवाड्यावर आण, नाही तर तुझा शिरच्छेद करीन!" झार म्हणाला.

त्या थोर सरदाराने मनुका, बेदाणा, सुंठीची बिस्कीटे वगैरे गोष्टींचा मोठा साठा बरोबर घेतला. मग त्याच खेड्यातील त्याच झोपडीत प्रवेश करून येमेल्याला सर्वात जास्त काय आवडते ह्याची येमेल्याच्या भावांच्या बायकांपाशी चौकशी केली.

"प्रेमळ बोलणं येमेल्याला आवडतं," त्या म्हणाल्या. "तुम्हाला हवी ती गोष्ट तो करील, पण तुम्ही त्याच्याशी प्रेमानं वागलं पाहिजे आणि लाल कफ्तान भेट म्हणून देण्याचं आश्वासन दिलं पाहिजे."

मग थोर सरदाराने येमेल्याला मनुका, बेदाणे आणि सुंठीची बिस्कीटे दिली व तो म्हणाला: "येमेल्या, तू चुलाण्याच्या कट्ट्यावर का पडून राहतोस? माझ्याबरोबर झारच्या राजवाड्यावर चल ना!"

"जिथं मी आहे तिथं मी सुखात आहे," येमेल्या उत्तरला.

"अरे येमेल्या, झार तुझा मिष्टान्नांनी आणि मद्य पाजून पाहुणचार करील. कृपया चल माझ्याबरोबर."

"नाही. मला इच्छा नाही," येमेल्या उत्तरला.

"पण येमेल्या, झार तुला लाल कफ्तान भेट म्हणून देईल. शिवाय एक टोपी आणि बुटांची जोडी देईल."

येमेल्याने थोडा वेळ विचार केला व नंतर तो म्हणाला:

"ठीक, ठीक. तुम्ही म्हणता तसं मी करतो. मात्र तुम्ही एकटयानं गेलं पाहिजे आणि मी मागून येतोच."

सरदार घोडयावरून निघून गेला. येमेल्या आणखी थोडा वेळ चुलाण्यावर पडून राहिला व मग म्हणाला: "आज्ञा पाळा माशाची, इच्छा पुरी करा माझी! चुलाण्या, तडक झारच्या राजवाडयावर चल!"

आणि काय चमत्कार! झोपडीच्या कोपऱ्यांना तडे गेले, छप्पर डळमळू लागले, एक भिंत कोसळली आणि चुलाणा आपोआप वेगाने रस्त्यावर गेला व थेट राजवाडयाच्या वाटेला लागला.

झारने खिडकीतून बाहेर पाहिले आणि तो चकित झाला.

"ते काय आहे?" त्याने विचारले.

थोर सरदार उत्तरला:

"येमेल्या आपल्या चुलाण्यावर बसून तुमच्या राजवाडयाकडं येतोय!"

झार बाहेरच्या व्हरांडयात येऊन म्हणाला: "येमेल्या, तुझ्याबद्दल माझ्याकडं खूप तक्रारी आल्या आहेत. अनेक लोकांना तू पाडलंस म्हणे!"

"माझ्या घसरगाडीच्या वाटेत ते आडवे का आले?" येमेल्या म्हणाला.

त्याच वेळी राजवाडयाच्या गवाक्षामधून झारची मुलगी राजकन्या मारीया बाहेर पहात होती. जेव्हा येमेल्याने तिला पाहिले, तेव्हा श्वास रोखून तो पुटपुटला.

"आज्ञा पाळा माशाची, इच्छा पुरी करा माझी! झारची मुलगी माझ्या प्रेमात पडूं दे!" आणि पुढे तो म्हणाला: "चुलाण्या, घरी चल!"

चुलाणा वळला आणि सरळ येमेल्याच्या खेडयात गेला. झोपडीत शिरून तो परत पूर्वीच्या जागी बसला व येमेल्या पूर्वीप्रमाणेच चुलाण्याच्या कट्टयावर स्वस्थ पडून राहिला.

दरम्यान राजवाडयात रडारड आणि विव्हळण्याचा आकांत माजला

होता . राजकन्या मारीयाने येमेल्यासाठी रडून रडून मुठींएवढे डोळे सुजवून घेतले होते . येमेल्याविना जगणे शक्य नाही आणि येमेल्याशी लग्न करून द्या, असे तिने वडिलांना सांगितले . झार खूप संकटात पडला आणि कष्टी बनला . थोर सरदाराला तो म्हणाला : "येमेल्याला जिवंत अथवा मृत अवस्थेत इथं आणा . जर कामात कसूर झाली तर शिरच्छेद करीन ."

थोर सरदाराने अनेक प्रकारची मिठाई व मधुर मद्ये विकत घेतली आणि येमेल्याच्या खेडयाकडे परत प्रस्थान ठेवले. तो त्याच झोपडीत परत प्रवेशला आणि त्याने येमेल्याची शाही सरबराई सुरू केली .

येमेल्याने खाण्या-पिण्यावर भरपूर ताव मारला. त्याचे डोके गरगरू लागले, म्हणून तो खाली लवंडला आणि झोपी गेला . मग सरदाराने झोपलल्या येमेल्याला गाडीत घातले व त्याच्यासह तो राजवाडयाकडे निघाला .

झारने तात्काळ लोखंडी कडयांचे एक प्रचंड पिंप मागविले, येमेल्याला व राजकन्या मारीयाला त्या पिंपात ठेवले, पिंपावर डांबर फासले व समुद्रात फेकून दिले .

अशा रीतीने बराच काळ उलटला . येमेल्या जागा झाला . अंधारात , बंदिस्त अवस्थेत स्वतःला पाहून तो म्हणाला : "मी कुठं आहे ? "

राजकन्या मारीया उत्तरली : "माझ्या लाडक्या येमेल्या , आपलं नशीब वाईट आणि खडतर आहे ! त्यांनी आपल्याला डांबर माखलेल्या पिंपात ठेवलंय आणि निळ्या सागरात पिंप फेकून दिलंय ! "

"आणि तू कोण ? " येमेल्याने विचारले .

"मी राजकन्या मारीया," उत्तर आले .

येमेल्या म्हणाला :

"आज्ञा पाळा माशाची , इच्छा पुरी करा माझी ! हे वादळी वाऱ्यांनो , या , पिंपाला कोरडया किनाऱ्यावर फेकून द्या , त्याला पिवळया वाळूत पडूं दे ! "

आणि काय चमत्कार ! वादळी वारे वाहू लागले, सागर खवळला , पिंप कोरडया किनाऱ्यावर फेकले गेले आणि पिवळया वाळूत पडले . येमेल्या आणि राजकन्या मारीया पिंपातून बाहेर आले . राजकन्या मारीया म्हणाली : "येमेल्या , आपण रहायचं कुठं ? एखादी झोपडी बांध ना आपल्यासाठी ! "

"नाही , तशी मला इच्छा नाही ," येमेल्या उत्तरला .

पण राजकन्येने त्याची पुनःपुन्हा विनवणी केली . शेवटी तो म्हणाला :

"आज्ञा पाळा माशाची, इच्छा पुरी करा माझी! सोनेरी छपराचा दगडी राजवाडा बांधण्यात येवो!"

त्याच्या तोंडून हे शब्द बाहेर पडले न पडले तोच सोनेरी छपराचा दगडी राजवाडा त्यांच्यासमोर उभा झाला. त्याच्या भोवती हिरवीगार बाग पसरली होती. त्या बागेत फुले उमलली होती व पक्षी गात होते. राजकन्या मारीया आणि येमेल्या यांनी राजवाड्यात प्रवेश केला व एका खिडकीपाशी ते बसले.

राजकन्या म्हणाली: "येमेल्या, तू देखणा होऊ शकणार नाहीस का?"

येमेल्या तात्काळ उद्‌गारला: "आज्ञा पाळा माशाची, इच्छा पुरी करा माझी! माझं एका उंच आणि देखण्या पुरुषात रूपांतर करा!"

आणि काय चमत्कार! पहाटेच्या आकाशाप्रमाणे सुंदर अशा अत्यंत देखण्या तरुणात येमेल्याचे रूपांतर घडले.

ह्यावेळी झार शिकारीवर बाहेर पडला होता. त्याच्या नजरेला हा राजवाडा दिसला. पूर्वी ह्या स्थळी त्याने कधीही राजवाडा पाहिला नव्हता.

"कुणा हलकटानं माझ्या जमिनीवर राजवाडा बांधायचं धाडस केलं?" त्याने विचारले आणि चौकशीसाठी दूतांना धाडले.

झारचे दूत राजवाड्यापाशी धावत गेले आणि त्यांनी येमेल्याजवळ चौकशी केली.

"मला येऊन भेट असं झारला सांगा आणि मी कोण ते माझ्या ओठांवरूनच तो ऐकील," येमेल्या उत्तरला.

येमेल्याच्या आमंत्रणानुसार झार आला. राजवाड्याच्या फाटकाशी येमेल्या झारच्या भेटीला गेला, त्याने त्याला राजवाड्यात आणले, त्याचा शाही पाहुणचार केला. झार सतत आश्चर्य करीत राहिला. "भल्या माणसा, तू कोण आहेस?" शेवटी त्याने विचारले.

"चुलाण्याच्या कट्ट्यावर बसून तुझ्या भेटीला आलेला मूर्ख येमेल्या आठवतो?" येमेल्या म्हणाला. "तुझी मुलगी राजकन्या मारीया हिच्यासह तू मला डांबरमाखल्या पिंपात बंद करून समुद्रात फेकून दिलं होतंस ते आठवतं? तर तोच मी येमेल्या. जर मी मनात आणलं तर तुझं सगळं राज्य जाळूनपोळून नामशेष करीन."

झार खूप घाबरला आणि त्याने येमेल्यापाशी क्षमायाचना केली.

"येमेल्या, दया कर माझ्यावर," झार म्हणाला. "माझ्या मुलीशी लग्न कर आणि माझं राज्यही तू घे."

मग एवढी मोठी मेजवानी झडली, की तिच्या भव्यतेने सबंध जग चकित झाले. येमेल्याने राजकन्या मारीयाशी विवाह केला व तो राज्य चालवू लागला. ती दोघेही सुखाने कालक्रमणा करू लागली.

बेडूक राजकन्या

फार पूर्वीची गोष्ट. एक होता झार. त्याला तीन मुलगे होते. ते मुलगे जेव्हा वयात आले तेव्हा झारने त्यांना आपल्यापाशी बोलाविले व तो म्हणाला:

"माझ्या लाडक्या बाळांनो, तुमची लग्नं झालेली बघायची माझी इच्छा आहे. म्हणजे मी मरण्यापूर्वी मला तुमची मुलं, माझी नातवंडं पहायला मिळतील."

आणि त्याचे मुलगे उत्तरले: "ठीक आहे बाबा, तुमचे आशीर्वाद आम्हाला द्या. आम्ही कुणाशी लग्न करावं अशी तुमची इच्छा आहे?"

"तुमच्यापैकी प्रत्येकानं एक बाण घ्यायचा, हिरव्या कुरणात जायचं आणि बाण मारायचा. जिथं बाण पडतील तिथं तुमचं नशीव ठरेल."

मुलांनी वडिलांना वाकून नमस्कार केले, प्रत्येकाने एकेक बाण घेतला व ते हिरव्या कुरणात गेले. तेथे त्यांनी आपल्या धनुष्यांच्या प्रत्यंचा खेचल्या आणि बाण उडविले.

सर्वात मोठ्या मुलाचा बाण एका सरदाराच्या अंगणात पडला आणि सरदाराच्या मुलीने तो उचलला. मधल्या मुलाचा बाण एका व्यापाऱ्याच्या अंगणात पडला आणि व्यापाऱ्याच्या मुलीने तो उचलला.

पण सर्वात धाकट्या मुलाचा, राजपुत्र इवान याचा, बाण उडाला आणि तो कुठे पडला हेच त्याला समजले नाही. बाणाचा शोध घेत तो खूप खूप चालला. सरतेशेवटी तो दलदलीच्या प्रदेशात पोहोचला. आणि पाहतो तो काय! एक बेडकी पानावर बसली होती व तिच्या तोंडात बाण होता. राजपुत्र इवान म्हणाला:

"बेडकी, बेडकी, माझा बाण मला परत दे."

आणि बेडकी उत्तरली :

"माझ्याशी लग्न कर!"

"बेडकीशी मी कसं लग्न करू?"

"माझ्याशी लग्न कर, कारण तेच तुझ्या नशीबात आहे."

राजपुत्र इवान खूप कष्टी झाला, पण तो काय करणार? त्याने बेडकीला उचलले व घरी आणले. झारने तीन लग्ने धुमधडाक्याने साजरी केली. त्याच्या सर्वात मोठ्या मुलाचे सरदाराच्या मुलीशी लग्न झाले, त्याच्या मधल्या मुलाचे व्यापाऱ्याच्या मुलीशी लग्न झाले आणि बिचाऱ्या राजपुत्र इवानचे बेडकीशी लग्न झाले.

एक दिवस झारने आपल्या मुलांना बोलाविले व तो म्हणाला :

"तुमच्यापैकी कुणाची बायको शिवणकामात सर्वात जास्त तरबेज आहे हे पहायची माझी इच्छा आहे. उद्या सकाळपर्यंत प्रत्येकीनं माझ्यासाठी एक सदरा शिवून द्यावा."

मुलांनी वडिलांना वाकून प्रणाम केला व ते निघून गेले.

राजपुत्र इवान घरी गेला व खिन्न मनाने एका कोपऱ्यात बसून राहिला. बेडकी फरशीवरून उड्या मारीत त्याच्यापाशी गेली आणि तिने विचारले :

"राजपुत्र इवान, तू एवढा कष्टी का? कुठल्यातरी संकटात आहेस का?"

"उद्या सकाळपर्यंत तू माझ्या वडिलांना एक सदरा शिवून द्यावास अशी त्यांची इच्छा आहे."

बेडकी म्हणाली :

"राजपुत्र इवान, असा निराश होऊ नकोस. खुशाल झोप. रात्रीपेक्षा सकाळी शहाणपण जास्त चांगलं सुचतं!"

तर राजपुत्र इवान झोपी गेला. बेडकीने दाराच्या उंबरठ्यापलिकडे उडी मारली, आपली बेडकीची कातडी काढून टाकली व शहाणी वासीलिसामध्ये तिचे रूपांतर झाले. ती एक अतुलनीय लावण्यावती बनली. तिने हातांची टाळी वाजविली व ती ओरडली :

"सख्यांनो आणि दायांनो, सज्ज व्हा आणि कामाला लागा! माझे स्वतःचे वडील जसा सदरा घालत तसा सदरा उद्या सकाळपर्यंत मला शिवून द्या!"

दुसऱ्या दिवशी सकाळी राजपुत्र इवान जागा झाला तेव्हा बेडकी परत फर शीवर उड्या मारीत होती व मेजावर सुती रुमालात गुंडाळलेला एक सदर पडला होता. राजपुत्र इवान आनंदित झाला. त्याने सदरा उचलला आणि वडि लांकडे घेऊन गेला. झार आपल्या दुसऱ्या मुलांकडून भेटी स्वीकारीत असल्या त्याला आढळले. जेव्हा सर्वात मोठ्या मुलाने आपला सदरा दाखविला तेव्ह झार म्हणाला:

"हा सदरा माझ्या एका सेवकाला चालेल!"

जेव्हा मधल्या मुलाने आपला सदरा पुढे केला तेव्हा झार म्हणाला

"हा फक्त बाऱ्यासाठी ठीक आहे."

राजपुत्र इवानने आपला सदरा पुढे ठेवला. त्यावर सुंदर सोनेरी आणि चंदेरी विणकाम केलेले होते. झारने त्या सदऱ्यावर एक नजर टाकली व तो म्हणाला: "हा खरा सदरा! उत्तम प्रसंगी हा सदरा मी वापरीन!"

दोघे वडील-भाऊ घरी गेले व एकमेकांना म्हणाले:

"आपण राजपुत्र इवानच्या बायकोची निष्कारण थट्टा केली असं दिसतंय. ती बेडकी नसावी, तर चेटकीण असावी."

झारने परत आपल्या मुलांना बोलाविले.

"उद्या सकाळपर्यंत माझ्यासाठी पाव भाजून द्यायला तुमच्या बायकांना सांगा," झार म्हणाला. "सर्वात उत्तम पाव कोण भाजते हे मला जाणून घ्यायचंय."

राजपुत्र इवान परत एकदा खिन्न मुद्रेने घरी परतला. बेडकीने त्याला विचारले: "राजपुत्रा, असा कष्टी का दिसतोस?"

"उद्या सकाळपर्यंत तू झारला पाव भाजून द्यावास अशी त्याची इच्छा आहे," तिचा नवरा उत्तरला.

"राजपुत्र इवान, असा निराश होऊ नकोस. खुशाल झोप. रात्रीपेक्षा सकाळी शहाणपण जास्त चांगलं सुचतं."

दुसऱ्या सुनांनी प्रथम प्रथम बेडकीची टर उडविली होती. पण ह्यावेळी मात्र बेडकी पाव कसा भाजते ते पाहण्यासाठी त्यांनी एका म्हाताऱ्या बाईला पाठविले.

बेडकी धूर्त होती. तिला दुसऱ्या सुनांच्या गुप्त कारवाईचा सुगावा लागला. तिने पीठ मळले, चुलाण्याचे वरचे तोंड फोडले आणि कणकेची परात सरळ त्या भोकात रिकामी केली. म्हातारी बाई धावत झारच्या दुसऱ्या सुनांकडे गेली व तिने पाहिलेली हकीकत त्यांना सांगितली. त्या दोघींनी बेडकीप्रमाणेच केले.

मग बेडकी उडया मारीत दाराच्या उंबरठ्यापलिकडे गेली, शहाण्या वासीलिसामध्ये तिचे रूपांतर झाले, तिने हातांची टाळी वाजविली व ती ओरडली:

"सख्यांनो आणि दायांनो, सज्ज व्हा आणि कामाला लागा! एकेकाळी मी घरी रहात होते तेव्हा खायची तसला मऊ पांढरा पाव उद्या सकाळपर्यंत



मला भाजून द्या ."

राजपुत्र इवान सकाळी जागा झाला तेव्हा सुंदर सुंदर नक्षी काढलेला पाव मेजावर असलेला त्याला दिसला. पावाच्या बाजूच्या कडांवर चित्रविचित्र आकृती होत्या व माथ्यावर वेशी-तटांसकट राजधान्यांची चित्रे होती.

राजपुत्र इवान अतिशय खूष झाला. त्याने पांढऱ्या रुमालात पाव गुंडाळला व तो वडिलांकडे घेऊन गेला. त्याच क्षणाला झार आपल्या ज्येष्ठ मुलांकडून पाव स्वीकारीत होता. म्हातारीच्या सांगण्यानुसार त्यांच्या बायकांनी कणीक आगीत टाकली होती व तिच्यापासून आता फक्त जळका गोळा बनला होता. झारने सर्वात मोठ्या मुलाकडून पाव घेतला, त्याच्याकडे एक नजर टाकली व सेवकांच्या दालनाकडे त्याला पाठवून दिले. मधल्या मुलापासून त्याने पाव घेतला व तसेच केले. पण जेव्हा राजपुत्र इवानने आपला पाव झारच्या हाती

दिला तेव्हा झार म्हणाला :

"ह्याला म्हणतात पाव ! खास सणाच्या दिवशी असा पाव खायला हवा ! "

झारने आपल्या तीनही मुलांना दुसऱ्या दिवशी स्वतःकडे मेजवानीला बोलाविले आणि त्यांना त्यांच्या बायकांसह यायला सांगितले.

राजपुत्र इवान परत खिन्न मुद्रेने घरी परतला. बेडकी उड्या मारीत त्याच्यापाशी गेली व तिने विचारले :

"डरांव, डरांव, राजपुत्र इवान, तू असा कष्टी का ? तुझे वडील तुला काही कठोर बोलले का ? "

"बेडुकली, माझ्या बेडकी, मी कष्टी होऊ नको तर काय करू ? तुला माझ्याबरोबर मेजवानीला आणायची वडलांनी आज्ञा केलीय, पण माझी पत्नी म्हणून तू लोकांसमोर कशी येणार ? "

"राजपुत्र इवान, निराश होऊ नको," बेडकी म्हणाली. "मेजवानीला एकटा जा आणि मी नंतर येईन. जेव्हा तुला ठोकण्याचा आणि धाड धाड आपटण्याचा आवाज ऐकायला येईल, तेव्हा घाबरू नको. तुला जर कुणी त्याबद्दल विचारलं तर सांग की, तुझी बेडकी तिच्या बग्गीमधून येतेय."

तर राजपुत्र इवान एकटाच गेला. त्याचे मोठे भाऊ आपापल्या बायकां-बरोबर घोडागाड्यांमधून आले. त्यांच्या बायकांनी चेहऱ्यांना खूप रंगरंगोटी केली होती व भारी कपडे घालून त्या नटल्या होत्या. त्यांनी राजपुत्र इवानची थट्टा केली :

"तुझ्या बायकोला घेऊन का आला नाहीस ? तुझ्या हातरुमालात तिला गुंडाळून तू सहज येऊ शकला असतास. खरंच, अशी सुंदरी तू कुठून शोधून काढ-लीस ? दलदलीच्या सगळ्या प्रदेशांमध्ये तू तिला शोधलं असणार ! "

सुंदर वस्त्रांचे आवरण घातलेल्या ओकच्या लाकडाच्या मेजापाशी झार, त्याचे मुलगे, त्याच्या सुना आणि सर्व पाहुणे मेजवानीला बसले. अचानक ठोकण्याच्या आणि आपटण्याच्या आवाजांनी सगळा राजवाडा हादरून गेला. पाहुण्यांनी घाबरून उड्या मारल्या, पण राजपुत्र इवान म्हणाला :

"भल्या माणसांनो, घाबरू नका. काही विशेष घडलेलं नाही ; माझी बेडकी बग्गीमधून येतेय."

सहा पांढऱ्याशुभ्र घोड्यांना जुंपलेला एक मुलामेदार रथ राजवाड्याच्या

दाराशी वेगाने येऊन थांबला व त्यातून शहाणी वासीलिसा खाली उतरली. तारका जडवलेला आकाशी रंगाचा रेशमी पोषाख तिने परिधान केला होता व तिच्या मस्तकावर चंद्रकोर चमकत होती. पहाटेच्या वेळी दिसणाऱ्या सुंदर नभाप्रमाणे ती दिसत होती. तिच्या सौंदर्याशी स्पर्धा करणे कुणालाही शक्य नव्हते. तिने राजपुत्र इवानचा हात धरला आणि सुंदर वस्त्रांचे आवरण घातलेल्या ओकच्या लाकडाच्या टेबलाशी त्याला ती घेऊन आली.

पाहुणे खाऊ-पिऊ लागले व मेजवानीचा आनंद लुटू लागले. शहाणी वासीलिसा स्वतःच्या चषकामधून पीत होती आणि उरलेले पेय स्वतःच्या डाव्या बाहीत रिते करीत होती. तिने हंसाचे थोडे मांस खाल्ले व स्वतःच्या उजव्या बाहीत हाडे ठेवली. ज्येष्ठ राजपुत्रांच्या बायकांनी तिला असे करताना पाहिले व तिचे अनुकरण केले.

खाणे-पिणे संपल्यानंतर नृत्याची वेळ झाली. शहाण्या वासीलिसाने राजपुत्र इवानबरोबर नृत्य सुरू केले. तिच्या गिरक्या व नृत्यकौशल्य पाहून सगळे चकित झाले आणि तिची प्रशंसा करू लागले. तिने आपली डावी बाही हलविली आणि काय आश्चर्य! – एक सरोवर निर्माण झाले. तिने उजवी बाही हलविली आणि शुभ्र हंस त्या सरोवरात विहार करू लागले. झार व पाहुणे आश्चर्याने थक्क झाले.

नंतर दुसऱ्या सुना नृत्य करू लागल्या. त्यांनी एक बाही हलविली, पण त्यामुळे पाहुण्यांवर फक्त मद्याचे शिडकावे उडाले. त्यांनी दुसरी बाही हलविली, पण नुसती हाडे विखुरली व एक हाड तर थेट झारच्या डोळ्यावर ताडदिशी लागले. झार विलक्षण संतापला व त्याने दोन्ही सुनांना हाकलून लावले.

दरम्यान राजपुत्र इवान सर्वांचा डोळा चुकवून हळूच निसटला आणि घरी धावला. तेथे त्याला बेडकीची कातडी आढळली आणि त्याने ती आगीत फेकून दिली.

जेव्हा शहाणी वासीलिसा घरी आली तेव्हा ती बेडकीची कातडी धुंडाळू लागली, पण तिला ती काही केल्या सापडेना. अत्यंत दुःखी होऊन ती बाकावर बसली व राजपुत्र इवानला म्हणाली:

"अरेरे, राजपुत्रा, काय केलंस तू! जर आणखी तीन दिवस थांबला असतास, तर मी तुझी कायमची झाले असते! पण आता निरोप दे. तीन-नऊ प्रदेशांच्या पल्याड, तीन-दहा राज्यात, जिथं अमर कोश्चेई राहतो तिथं

माझी प्राप्ती कर ... "

असे म्हणून शहाणी वासीलिसा एक कोकीळा बनली व खिडकीमधून बाहेर उडून गेली. राजपुत्र इवानने खूप शोक केला. मग चारी दिशांना प्रणाम करून आपली पत्नी शहाणी वासीलिसा हिच्या शोधात तो भरकटत निघाला. तो किती दूरपर्यंत चालत गेला हे सांगणे कठीण आहे, पण त्याच्या बुटांचे तळवे पार झिजून गेले, त्याच्या अंगरख्याचे कोपरे विरले आणि पावसामुळे त्याची टोपी फाटून तिच्या चिंध्या चिंध्या झाल्या. सरतेशेवटी त्याला एक जख्ख छोटा म्हातारा माणूस भेटला.

"रामराम पोरा," छोटा म्हातारा माणूस म्हणाला. "तू कुठं आणि कोणत्या कामगिरीवर निघाला आहेस?"

राजपुत्र इवानने त्याला स्वत:चे दु:ख सांगितले.



"अरेरे, राजपुत्र इवाना, तू बेडकीची कातडी जाळून का टाकलीस?" छोटा म्हातारा म्हणाला. "ती राखून ठेवण्याचा अथवा नष्ट करण्याचा तुला अधिकार नव्हता. शहाणी वासीलिसा आपल्या बापापेक्षाही हुशार जन्मली, म्हणून तिचा बाप संतापला आणि त्यानं तिला तीन वर्षांपर्यंत बेडकीचं रूप दिलं. पण आता दुःख करून काय उपयोग? ही सुताची गुंडी घे आणि ती जिकडं घरंगळत जाईल तिकडं निर्भयपणानं जा."

राजपुत्र इवानने छोट्या म्हाताऱ्याचे आभार मानले व सुताच्या गुंडी-पाठोपाठ तो निघाला. गुंडी घरंगळत जात होती व तो तिच्या मागोमाग चाल-ला होता. एका मोकळ्या मैदानात त्याची एका अस्वलाशी गाठ पडली. राजपुत्र इवानने नेम धरला व तो त्या अस्वलाला ठार मारणार, एवढ्यात अस्वल उठले आणि माणसाच्या आवाजात म्हणाले: "राजपुत्र इवान, मला ठार मारू नको. एखाद्या दिवशी तुला माझी गरज भासेल."



राजपुत्र इवानने अस्वलाला जीवदान दिले आणि तो पुढे गेला. अचानक त्याला एक बदक डोक्यावरून उडत जात असलेला दिसला. त्याने त्या बदकावर नेम धरला, पण तो बदक मानवी आवाजात म्हणाला: "राजपुत्र इवान, मला ठार मारू नको. एखाद्या दिवशी तुला माझी गरज भासेल."

त्याने बदकाला जीवदान दिले आणि तो आणखी पुढे गेला. वाटेत त्याला एक धावणारा ससा आडवा आला. पुन्हा एकदा राजपुत्र इवानने त्या सशाला मारण्यासाठी धनुष्याला हात घातला, पण ससा मानवी आवाजात म्हणाला: "राजपुत्र इवान, मला ठार मारू नको. एखाद्या दिवशी तुला माझी गरज भासेल."

म्हणून राजपुत्राने सशाला जीवदान दिले आणि तो पुढे गेला. एका निळ्या सागरापाशी राजपुत्र इवान पोहोचला. तेथे वाळूच्या किनारी एक पाईक मासा तडफडत असलेला त्याने पाहिला.

"अरे राजपुत्र इवान," पाईक म्हणाला, "माझ्यावर दया कर आणि परत एकदा मला निळ्या सागरात टाक!"

म्हणून राजपुत्राने पाईक माशाला सागरात फेकले व तो किनाऱ्यालगत पुढे चालू लागला. सुताची गुंडी गडगडत एका जंगलात गेली. त्या जंगलात कोंबडीच्या पायावर गरगर फिरणारी एक छोटी झोपडी होती. राजपुत्र म्हणाला: "छोट्या झोपडी, छोट्या झोपडी, कृपा करून झाडांकडं पाठ कर आणि माझ्याकडं तोंड कर."

झोपडीने राजपुत्राकडे आपले तोंड केले आणि झाडांकडे पाठ केली. राजपुत्र इवान थेट झोपडीत चालत गेला. तेथे हडकुळी, लांबनाकी चेटकीण बाबा यागा हातात लांब दांड्याचा झाडू घेऊन धुराड्याच्या कोपऱ्यात बसली होती. जेव्हा तिने राजपुत्राला पाहिले तेव्हा ती म्हणाली: "अहाहा, अहाहा, अस्सल रशियन रक्ताची कधी गाठ पडली नव्हती माझ्या-, शी, आता वास येतोय त्याचा चक्क माझ्या दाराशी! कोण आहे तिथं?"

"अगं ए म्हातारडे," राजपुत्र इवानाने प्रत्युत्तर केले: "मला प्रश्न विचारण्याआधी मला मटण खाऊ घाल, दारू पाज आणि झकास गरम पाण्या-ची आंघोळ घाल!"

तर बाबा-यागाने त्याला कढत पाण्याने आंघोळ घातली, मटण खाऊ घातले, दारू पाजली व बिछान्यावर निजविले. मग राजपुत्र इवानने तिला

सांगितले की, त्याच्या पत्नीचा, शहाण्या वासीलिसाचा, तो शोध घेत होता.

"ठाऊक आहे मला, ठाऊक आहे मला," बाबा-यागा म्हणाली, "तुझी बायको सध्या अमर कोश्चेईच्या ताब्यात आहे. तिला परत मिळवणं खूप कठीण जाईल. कोश्चेई तुझ्याहून खूपच भारी आहे. त्याचा मृत्यू एका सुईच्या टोकामध्ये आहे, ती सुई एका अंडयात आहे, अंडं एका बदकात आहे, बदक एका सशात आहे, ससा एका दगडी छोटया डबीत आहे, ती डबी एका ओकच्या उंच झाडाच्या शेंडयावर आहे आणि अमर कोश्चेई त्या डबीची डोळयात तेल घालून तिथं राखण करतो."

राजपुत्र इवानने रात्रीचा मुक्काम बाबा-यागाच्या झोपडीत केला. सकाळी तिने त्याला उंच ओकच्या झाडाकडे जाणारी वाट दाखविली. जाता जाता त्याला शेंडयावर दगडी डबी असलेले ओकचे उंच झाड भेटले. झाडाच्या शेंडयापर्यंत पोहोचणे अवघड होते.

अचानक अस्वल आले, त्याने ते झाड मुळापासून गदागदा हलवून उपटले. दगडी डबी जमिनीवर पडली, खाडकन तिचे झाकण उघडले. डबीमधून एक ससा उडी मारून बाहेर पडला, वेगाने उडया मारीत निघाला.

तेवढ्यात दुसरा ससा त्याचा पाठलाग करू लागला आणि त्याने त्या सशाला गाठून त्याचा खिमा केला. मेलेल्या सशामधून एक बदक उंच आकाशात निघाले. क्षणात बदकाने त्या बदकाचा पाठलाग धरला आणि त्याला जोरात दणका मारला. बदकाने एक अंडे खाली टाकले आणि ते अंडे निळ्या सागरात पडले.

तेव्हा राजपुत्र इवान अत्यंत दुःखी झाला आणि अश्रू ढाळू लागला. समुद्रात अंड्याचा शोध तो कसा घेणार? पण तेवढ्यात तोंडात अंडे धरून पाईक मासा राजपुत्रापाशी पोहत आला. राजपुत्र इवानने अंडे फोडले, त्यातून सुई बाहेर काढली व तिचे टोक मोडण्याचा तो प्रयत्न करू लागला. सुईचे टोक तो जेवढे अधिक वाकवू लागला, तेवढा अमर कोश्चेई किंचाळ्या फोडत जास्त तळमळू लागला. अखेरीस राजपुत्र इवानने सुईचे टोक मोडले आणि कोश्चेई धाडदिशी खाली कोसळून मरण पावला.

राजपुत्र इवान कोश्चेईच्या शुभ्र दगडी राजवाड्याकडे गेला. शहाणी वासीलिसा धावतच त्याला भेटायला आली. राजपुत्राच्या मधुर मुखावर तिने चुंबनांचा वर्षाव केला. राजपुत्र इवान आणि शहाणी वासीलिसा आपल्या घरी परत रहायला गेली. तेथे खूप खूप म्हातारे होईपर्यंत ती दोघे अत्यंत सुखासमाधानाने जगली.

छोटुकली हावरोशेच्का

जगात काही लोक चांगले आहेत आणि तितकेसे चांगले नसलेलेही काही लोक आहेत. असेही काही लोक आहेत ज्यांना दुष्टपणाने वागायला मुळीच शरम वाटत नाही.

अशा लोकांबरोबर राहण्याचे दुर्दैव छोटुकल्या हावरोशेच्काच्या नशिबी आले होते. ती अनाथ होती आणि ह्या लोकांनी तिच्याकडून मरे-मरेपर्यंत काम करवून घेण्यासाठीच केवळ तिला सांभाळायला घेतले होते. ती विणायची, सूत काढायची, घरकाम करायची व प्रत्येक गोष्टीला तिला जबाबदार रहावे लागायचे.

घराच्या मालकिणीला तीन मुली होत्या. सर्वात मोठीला एकडोळी म्हणायचे, दुसरीला दोनडोळी म्हणायचे व सर्वात लहानीला तीनडोळी म्हणायचे.

तीन बहिणी सबंध दिवसभर काहीही न करता नुसत्या फाटकापाशी बसून रहायच्या आणि रस्त्यावर काय चाललेले असे ते पहात रहायच्या. तर छोटुकली हावरोशेच्का त्यांच्यासाठी शिवणकाम करायची, विणकाम करायची, पण त्या बदल्यात प्रेमाचा एक शब्दही कधी तिला त्यांच्याकडून ऐकायला मिळायचा नाही.

काही वेळा छोटुकली हावरोशेच्का बाहेर शेतामध्ये जायची, तिच्या बांड्या गायीच्या गळ्याभोवती हातांची मिठी घालायची व मनातील सर्व दुःखे तिच्यापाशी मोकळी करायची.

"लाडके, बांडे," ती म्हणायची, "ते मला मारतात, रागं भरतात आणि पुरेसं पोटभर खायला देत नाहीत; पण तरीही रडायला मला बंदी

आहे. उद्यापर्यंत पाच पूड ताग कातून, विणून, साफ करून आणि गुंडाळ्या बनवून द्यायचा आहे."

आणि उत्तरादाखल गाय म्हणायची:

"माझ्या गोड मुली, तू फक्त माझ्या एका कानामधून आत जा आणि दुसऱ्या कानामधून बाहेर ये, तोवर तुझं सगळं पार पडलेलं असेल."

आणि बांडी जसे म्हणायची तसेच घडायचे. छोटुकली हावरोशेच्का गायीच्या एका कानात चढायची व दुसऱ्या कानातून बाहेर पडायची. आणि पाहते तो काय! विणून, साफ करून कापडाच्या गुंडाळ्या तयार असायच्या!

मग छोटुकली हावरोशेच्का कापडाच्या गुंडाळ्या मालकिणीपाशी घेऊन जायची. मालकीण घसा खाकरीत त्या कापडाला कपाटात ठेवून द्यायची आणि छोटुकल्या हावरोशेच्काला आणखी जास्त काम द्यायची.

आणि छोटुकली हावरोशेच्का बांडीकडे जायची, तिच्या गळ्याभोवती हातांची मिठी घालून तिला थोपटायची, तिच्या एका कानामध्ये चढून दुसऱ्या कानातून बाहेर पडायची व तयार कापडाच्या गुंडाळ्या परत मालकिणीकडे नेऊन द्यायची.

एके दिवशी म्हाताऱ्या मालकिणीने आपल्या एकडोळ्या मुलीला बोलावले व ती म्हणाली:

"माझ्या शहाण्या पोरी, माझ्या छान छान मुली, त्या अनाथ कारटीला कामात कोण मदत करतं तेवढं पाहून ये. सूत कोण काढतं, कापड कोण विणतं आणि गुंडाळ्या कोण करतं ते शोधून काढ."

एकडोळी छोटुकल्या हावरोशेच्काबरोबर रानात गेली, तिच्याबरोबर शेतांमध्ये गेली, पण आपल्या आईच्या आज्ञा ती विसरली व ऊन खात गवतावर आडवी पसरली. आणि हावरोशेच्का हळूच पुटपुटली:

"झोप, छोटचा डोळ्या, झोप!"

एकडोळीने आपला डोळा मिटला व ती झोपी गेली. ती झोपली होती तेवढ्यात बांडीने कापड विणून, स्वच्छ करून, गुंडाळून दिले.

मालकिणीला काहीच समजले नाही, म्हणून तिने दोनडोळीला पाठविले.

"माझ्या शहाण्या पोरी, माझ्या छान छान मुली, त्या अनाथ कारटीला कामात कोण मदत करतं तेवढं पाहून ये."

दोनडोळी छोटुकल्या हावरोशेच्काबरोबर गेली, पण आईच्या आज्ञा ती विसरली व ऊन खात गवतावर पहुडली. आणि छोटुकली हावरोशेच्का हळूच पुटपुटली: "झोप, छोटचा डोळ्या! झोप, दुसऱ्या डोळ्या!"

दोनडोळीने आपले डोळे बंद केले व तिला गाढ झोप लागली. ती झोपली होती तेवढ्यात बांडीने कापड विणून, स्वच्छ करून, गुंडाळून दिले.

म्हातारी खूप संतापली. तिसऱ्या दिवशी तिने हावरोशेच्काला चिक्कार काम दिले व तीनडोळीला तिच्या पाळतीवर पाठविले. तीनडोळी उन्हात खूप खूप खेळली आणि बागडली. शेवटी दमून ती गवतावर पहुडली. आणि छोटुकली हावरोशेच्का गाऊ लागली: "झोप, छोटचा डोळ्या! झोप, दुसऱ्या छोटचा डोळ्या!" पण तिसऱ्या छोटचा डोळ्याबद्दल मात्र ती संपूर्ण विसरून गेली. तीनडोळीचे दोन डोळे झोपले, पण तिसरा डोळा उघडा होता व त्याने सर्व पाहिले. छोटुकली हावरोशेच्का गायीच्या एका कानातून आत शिरली, दुसऱ्या कानातून बाहेर पडली व आयते तयार कापड तिने उचलले, हे तिसऱ्या डोळ्याने पाहिले. तीनडोळी घरी आली आणि तिने पाहिलेले सर्व काही आईला सांगितले. म्हातारी अत्यानंदित झाली व दुसऱ्याच दिवशी नवऱ्यापाशी जाऊन म्हणाली: "जा आणि बांड्या गायीला ठार मारा!"

म्हातारा चकित झाला. त्याने बायकोची समजूत घालायचा प्रयत्न केला. "म्हातारे, तुझं डोकं फिरलंय का? गाय चांगली आहे आणि अजून तरणी आहे."

"ठार मारा तिला आणि आता जास्त बडबड करू नका!"

आता दुसरा उपाय उरला नव्हता आणि म्हाताऱ्याने सुऱ्याला धार लावायला आरंभ केला. छोटुकल्या हावरोशेच्काला ही सर्व हकीकत समजली. ती धावतच शेतात गेली व बांडीला तिने मिठी मारली.

"बांडे, लाडके," ती म्हणाली, "ते तुला ठार मारणार आहेत!"

आणि गाय उत्तरली : "माझ्या गोड मुली, दुःख करू नकोस. मी जसं सांगत्ये तसं कर. माझी हाडं गोळा कर, त्यांना एका रुमालात बांध, बागेत त्यांना पुरून टाक आणि दररोज त्यांना पाणी घाल. माझं मांस खाऊ नको आणि मला कधीही विसरू नको."

म्हाताऱ्याने गायीला ठार मारले. बांडीने जसे सांगितले होते, तसे छोटुकली हावरोशेच्का वागली. ती उपाशी राहिली, तिने मांसाला स्पर्श केला नाही. तिने गायीची हाडे बागेत पुरली व दररोज त्यांना पाणी घातले.

काही दिवसांनंतर त्या हाडांमधून एक अतिशय सुंदर सफरचंदाचे झाड उगवले. त्याची सफरचंदे गोल आणि रसदार होती. त्याच्या झुलणाऱ्या फांद्या रुपेरी होत्या आणि सळसळती पाने सोनेरी होती. गाडीतून जाणारा

कुणीही ते झाड पहायला थांबायचा आणि जो कुणी त्या झाडापाशी जाई, तो नवल करायचा.

बराच काळ उलटला व नंतर आणखी थोडा काळ गेला. एके दिवशी एकडोळी, दोनडोळी आणि तीनडोळी बागेत फिरत होत्या. त्या वेळी योगायोगाने एक देखणा, बळकट, श्रीमंत आणि कुरळ्या केसांचा तरुण माणूस घोड्यावरून तेथे आला. रसाळ सफरचंदे पाहून तो थांबला व मुलींना चिडवीत म्हणाला:

" सुंदर मुलींनो ! तुमच्या तिघींपैकी जी कुणी मला पलिकडल्या झाडावरचं सफरचंद आणून देईल तिच्याशी मी लग्न करीन."

त्या तिघी बहिणी एकमेकीला मागे सारीत वेगाने झाडापाशी धावल्या.

पण खूप खाली आणि हातात सहज सापडतील अशी भासणारी ती सफरचंदाची फळे आता एकदम उंचावर त्या मुलींच्या डोक्यांवर गेली.

बहिणींनी त्या फळांना पाडायचा प्रयत्न केला, पण पानांचा सडा पडला व त्या मुलींना काही दिसेनासे झाले. त्यांनी सफरचंदांना तोडायचा प्रयत्न केला, पण फांद्या त्यांच्या वेण्यांमध्ये अडकल्या व त्यांच्या वेण्या सुटल्या. त्यांनी खूप धडपड केली, खूप हात ताणले, खूप उड्या मारल्या, पण सफरचंदे त्यांच्या हाती लागली नाही. त्यांचे हात मात्र ओरबाडून निघाले.

मग छोटुकली हावरोशेच्का झाडापाशी चालत गेली. तात्काळ फांद्या खाली झुकल्या व फळे तिच्या हातात आली. तिने एक सफरचंद त्या देखण्या, तरुण अनोळखी माणसाला दिले व त्याने तिच्याशी लग्न केले. तेव्हापासून तिला दुःख ठाऊक नाही. ती आणि तिचा नवरा सुखाने नांदू लागली.

मार्या मोरेवना

को णे एके काळी, कोणा एका राज्यात, झारपुत्र इवान रहात होता. त्याला तीन बहिणी होत्या: एक होती मार्या, दुसरी ओल्गा आणि तिसरी आन्ना.

त्यांचे आई-वडील वारले. मरतेवेळी त्यांनी मुलाला सांगितले:

"तुझ्या बहिणींशी सर्वात प्रथम सोयरीक बांधायला जे कुणी येतील, त्यांच्याशी त्यांची ताबडतोब लग्नं लावून दे. स्वतःपाशी बहिणींना फार काळ ठेवू नको."

झारपुत्राने आई-बापाचे दफन केले आणि दुःखी मनाने तो बहिणींसह हिरव्या बागेत फिरायला गेला.

अचानक नभात काळे मेघ दाटून आले, भयानक वादळ सुरू झाले.

"बहिणींनो, घरी चला," झारपुत्र इवान म्हणाला.

राजवाड्यावर ती सगळी जेमतेम पोहोचली, तोच विजेचा प्रचंड कड-कडाट झाला, छत दुभंगले आणि दालनात एक बहिरीससाणा उडत आला. तो बहिरीससाणा फरशीवर आपटताच त्याचे एकदम एका देखण्या तरुणात रूपांतर झाले आणि तो म्हणाला:

"नमस्ते, झारपुत्र इवान. पूर्वी मी तुमच्याकडं पाहुणा म्हणून यायचा, पण आता सोयरीक बांधायला आलोय. तुझी बहीण राजकन्या मार्या हिच्याशी लग्न करायची माझी इच्छा आहे."

"जर माझ्या बहिणीला तू आवडत असशील, तर माझी आडकाठी नाही – खुशाल करा लग्न!"

राजकन्या मार्या लग्नाला कबूल झाली. बहिरीससाण्याने तिच्याशी

लग्न केले व तो तिला स्वतःच्या राज्यात घेऊन गेला.

दिवसांमागून दिवस उलटत होते, तासांमागून तास पळत होते, वर्ष कसे उलटले ते समजलेसुद्धा नाही. झारपुत्र इवान दोन बहिणींसह हिरव्या बागेत फिरायला गेला. परत आकाश काळ्या मेघांनी दाटून आले, विजा चमकू लागल्या.

"बहिणींनो, घरी चला," झारपुत्र म्हणाला.

ती राजवाड्यावर जेमतेम पोहोचली, तोच विजेचा प्रचंड कडकडाट झाला, छत दुभंगले आणि एक गरुड उडत दालनात आला. तो गरुड फरशीवर आपटताच त्याचे एका देखण्या तरुणात रूपांतर झाले.

"नमस्ते, झारपुत्र इवान. पूर्वी तुमच्याकडं मी पाहुणा म्हणून यायचा, पण आता सोयरीक बांधायला आलोय."

आणि त्याने राजकन्या ओल्गाला मागणी घातली.

झारपुत्र इवान उत्तरला:

"जर राजकन्या ओल्गाला तू आवडत असशील, तर खुशाल लग्न करा. मी तिच्या इच्छेआड येणार नाही.".

राजकन्या ओल्गाने संमती दिली व गरुडाशी लग्न केले. गरुड तिला घेऊन स्वतःच्या राज्यात निघून गेला.

आणखी एक वर्ष उलटले. झारपुत्र इवान त्याच्या सर्वात धाकट्या बहिणीला म्हणाला:

"हिरव्या बागेत फिरायला जाऊ या."

ती दोघे थोडा वेळ फिरली. परत आकाश काळ्या मेघांनी दाटले, विजा चमकू लागल्या.

"बहिणी, घरी परतू या!"

घरी परतली, त्यांना बसायलासुद्धा सवड मिळाली नाही, तेवढ्यात विजेचा प्रचंड कडकडाट झाला, छत दुभंगले आणि एक कावळा उडत आत आला. तो कावळा फरशीवर आपटताच त्याचे एका देखण्या तरुणात रूपांतर झाले. यापूर्वीचे तरुण देखणे होते, पण हा त्यांच्यापेक्षाही अधिक देखणा होता.

"झारपुत्र इवान, पूर्वी तुमच्याकडं मी पाहुणा म्हणून यायचा, पण आता सोयरीक बांधायला आलोय. मला राजकन्या आन्ना दे."

"माझ्या बहिणीच्या इच्छेआड मी येणार नाही. जर तिला तू आवडत असशील, तर खुशाल लग्न करा."

राजकन्या आन्नाने कावळ्याशी लग्न केले आणि तिला तो स्वतःच्या राज्यात घेऊन गेला.

झारपुत्र इवान एकटा उरला. सबंध वर्ष त्याने बहिणींविना काढले. त्याला फार उदास वाटू लागले.

"मला वाटतं," तो म्हणाला, "बहिणींना भेटून यावं."

तो प्रवासाला निघाला. घोड्यावरून बरेच अंतर गेल्यानंतर त्याला दिसले – मैदानात अनेक योद्धे घायाळ अवस्थेत मरून पडले होते. झारपुत्र इवानने विचारले:

"इथं कुणी जिवंत माणूस असल्यास ओ द्या – ह्या महान योद्धयांना कुणी ठार मारलं?"

एकमेव जिवंत माणसाने त्याला उत्तर दिले:

"ह्या सर्व महान योद्धयांना ठार मारलं मार्या मोरेवनानं, रूपवान राणीनं!"

झारपुत्र इवान पुढे निघाला. थोड्या वेळाने त्याला पांढऱ्या राहुट्या दिसल्या. त्याच्या भेटीला रूपवान राणी मार्या मोरेवना राहुटीतून बाहेर आली.

"नमस्ते, झारपुत्रा, देव तुला कुठं नेतोय? इथं तू स्वेच्छेनं आलास अथवा तुला कुणी पाठवलंय?"

झारपुत्र इवान उत्तरला:

"निकोप तरुण नेहमी स्वेच्छेनं फिरतात!"

"जर तुला घाई नसेल, तर माझ्या राहुटीत पाहुणा म्हणून ये."

झारपुत्र इवानला आनंद झाला. त्याने राहुटीत दोन रात्री मुक्काम केला. त्याच्यावर मार्या मोरेवनाचे प्रेम जडले आणि त्याने तिच्याशी लग्न केले.

रूपवान राणी मार्या मोरेवना त्याला सांगाती घेऊन स्वतःच्या राज्यात गेली. काही काळपर्यंत ती दोघे एकत्र राहिली, पण एक दिवस राणीने युद्धावर जाण्याचा बेत केला. झारपुत्र इवानवर तिने राज्याची सर्व जबाबदारी टाकली व त्याला आज्ञा केली:

"सगळीकडं फिर, सगळ्यांवर नजर ठेव, फक्त ह्या एका कोठीच्या खोलीत डोकावू नको."

झारपुत्राला धीर धरवला नाही. मार्या मोरेवना गेली न गेली तोच तो कोठीच्या खोलीकडे धावला, त्याने दार उघडून आत डोकावून पाहिले – तेथे अमर कोश्चेय लटकत होता. त्याला बारा साखळदंडांनी बांधलेले होते.

कोश्चेयने झारपुत्र इवानची विनवणी केली:

"माझ्यावर दया कर, मला पाणी प्यायला दे. इथं दहा वर्षं मी हाल सोसतोय – ना खायला, ना प्यायला. माझा घसा पार सुकून गेलाय."

झारपुत्र इवानने त्याला बादली भरून पाणी दिले. कोश्चेय बादलीभर पाणी घटाघटा प्यायला आणि त्याने आणखी पाणी मागितले:

"एक बादली मला पुरेशी नाही, आणखी दे."

झारपुत्राने आणखी एक बादली दिली. कोश्चेयने तीही संपविली व तिसऱ्या बादलीची मागणी केली. तिसरी बादली पिऊन संपविताच त्याच्या अंगात पूर्वीचे बळ आले. जोर लावून त्याने बाराही साखळदंड एका झटक्यात तोडले व तो मुक्त झाला.

"धन्यवाद, झारपुत्र इवान," अमर कोश्चेय म्हणाला. "तुझे कान

जसे तुला स्वतःला कधी पाहता येत नाहीत, त्याप्रमाणं आता मार्या मोरेवनालाही तू कधीच पाहू शकणार नाहीस! "

सोसाटयाच्या वाऱ्यासारखा तो खिडकीमधून बाहेर उडाला, रूपवान राणी मार्या मोरेवनाला त्याने वाटेत गाठले आणि बकोटीखाली तिला पकडून तो स्वतःच्या राज्यात निघून गेला..

झारपुत्र इवान दुःखापायी खूप खूप रडला, मग त्याने पोषाख केला व तो प्रवासाला निघाला.

"कसेही करून मार्या मोरेवनाला मी शोधून काढीन!" तो स्वतःशी म्हणाला.

एक दिवस सरला, दुसरा दिवस उलटला आणि तिसऱ्या दिवशी पहाटे त्याला एक राजवाडा दिसला. राजवाडयापाशीं एक ओक वृक्ष होता, वृक्षावर एक बहिरीससाणा बसला होता. ओक वृक्षावरून बहिरीससाणा उडाला व तो जमिनीवर आपटताच त्याचे देखण्या तरुणात रूपांतर झाले. तो ओरडला:

"अरे, माझ्या लाडक्या मेहुण्या!"

राजकन्या मार्या धावत आली, झारपुत्र इवानला आनंदाने भेटली, त्याच्या प्रकृतीची चौकशी करू लागली, स्वतःच्या जीवनासंबंधी हकीकत सांगू लागली. झारपुत्राने त्यांच्याकडे तीन दिवस पाहुणचार घेतला आणि नंतर तो म्हणाला:

"तुमच्याकडं मी आणखी पाहुणचार घेऊ शकत नाही. माझ्या बायकोचा, रूपवान राणी मार्या मोरेवनाचा, शोध घ्यायला मी निघालोय."

"तिचा शोध घेणं तुला खूप अवघड जाईल," बहिरीससाणा म्हणाला. "तुझा चांदीचा चमचा इथं ठेवून जा. त्याला पाहिलं म्हणजे आम्हाला तुझी आठवण होत राहील."

झारपुत्र इवानने स्वतःचा चांदीचा चमचा बहिरीससाण्यापाशी ठेवला आणि तो पुढे प्रवास करू लागला.

त्याने एक दिवस प्रवास केला, दुसरा दिवस प्रवास केला आणि तिसऱ्या दिवशी पहाटे त्याला एक राजवाडा दिसला. हा राजवाडा पहिल्यापेक्षा अधिक चांगला होता. राजवाडयाशेजारी ओक वृक्ष उभा होता आणि वृक्षावर एक गरुड बसला होता.

वृक्षावरून गरुड उडाला, जमिनीवर आपटला आणि त्याचे देखण्या

तरुणामध्ये रूपांतर झाले. तो ओरडला:

"ऊठ, राजकन्या ओल्गा, आपला लाडका भाऊ येतोय!"

राजकन्या ओल्गा ताबडतोब धावत आली, भावाची चुंबने – आलिंगने घेऊ लागली, त्याच्या प्रकृतीची चौकशी करू लागली, स्वतःच्या आयुष्या-संबंधी सांगू लागली. झारपुत्र इवानने त्यांच्याकडे तीन दिवस पाहुणचार घेतला आणि मग तो म्हणाला:

"आणखी इथं रहायला मला सवड नाही. माझ्या बायकोचा, रूपवान राणी मार्या मोरेवनाचा, शोध घ्यायला मी निघालोय."

गरुड त्याला म्हणाला:

"तिचा शोध घेणं तुला खूप अवघड जाईल. तुझा चांदीचा काटा आमच्यापाशी ठेव. त्याला पाहिलं म्हणजे आम्हाला तुझी आठवण येईल."

झारपुत्राने चांदीचा काटा तेथे ठेवला व तो पुढे प्रवासाला निघाला.

एक दिवस सरला, दुसरा दिवस सरला आणि तिसऱ्या दिवशीं पहाटे पहिल्या दोन राजवाड्यांपेक्षा अधिक सुंदर राजवाडा त्याला दिसला. राज-वाड्याशेजारी ओक वृक्ष उभा होता आणि वृक्षावर एक कावळा बसला होता.

वृक्षावरून कावळा उडाला, जमिनीवर आपटला व त्याचे एका देखण्या तरुणात रूपांतर झाले. तो ओरडला:

"राजकन्या आन्ना, लौकर बाहेर ये, आपला भाऊराया येतोय!"

राजकन्या आन्ना धावत बाहेर आली, आनंदाने भावाला भेटली, त्याची चुंबने – आलिंगने घेऊ लागली, त्याच्या प्रकृतीची चौकशी करू लागली, स्वतःच्या आयुष्यासंबंधीच्या गोष्टी सांगू लागली.

झारपुत्र इवानने तीन दिवस त्यांचा पाहुणचार अनुभवला आणि मग तो म्हणाला:

"मला निरोप द्या. माझी बायको, रूपवान राणी मार्या मोरेवना, हिचा शोध घ्यायला मी निघालोय."

कावळा म्हणाला:

"तिचा शोध घेणं तुला खूप अवघड जाईल. तुझी चांदीची तपकिरीची डबी आमच्यापाशी ठेव. तिला पाहिलं म्हणजे आम्हाला तुझी आठवण येईल."

झारपुत्राने चांदीची तपकिरीची डबी तेथे ठेवली व तो पुढे प्रवास करू लागला.

एक दिवस गेला, दुसरा दिवस सरला व तिसऱ्या दिवशी तो मार्या मोरेवनापाशी पोहोचला.

स्वतःच्या लाडक्याला पाहताच तिने त्याच्या गळ्याभोवती मिठी मारली, तिच्या डोळ्यांमधून आसवांच्या धारा वाहू लागल्या आणि ती म्हणाली:

"अरेरे, झारपुत्र इवाना, तू का माझं ऐकलं नाही? कोठीच्या खोलीत डोकावलास आणि अमर कोश्चेयला सोडून दिलंस."

"मला माफ कर मार्या मोरेवना, जुन्या गोष्टी आठवू नकोस, त्यापेक्षा अमर कोश्चेय आसपास दिसत नाही तोवर माझ्याबरोबर चल. कदाचित तो आपल्याला गाठणार नाही."

त्या दोघांनी तयारी केली व ती निघाली. कोश्चेय शिकारीला गेला होता. संध्याकाळी तो घरी परतत असताना त्याचा मांडीखालील उमदा घोडा अडखळला.

"काय रे मरतुकडचा, अडखळायला काय झालं? तुला अपशकुनाची चाहूल लागली काय?"

घोडा उत्तरला:

"झारपुत्र इवान आला होता. मार्या मोरेवनाला घेऊन गेला."

"त्यांना गाठणं शक्य आहे?"

"जर आपण गहू पेरला, तो पिकेपर्यंत थांबलो, त्याची कापणी-झोडपणी केली, त्याचे दाणे दळून पीठ काढलं, पिठापासून पाच भट्ट्या भरून पाव भाजले, ते खाल्ले, म्हणजे मग आपण त्यांच्या पाठलागाला निघू आणि त्यांना गाठू शकू."

कोश्चेयने घोडा पिटाळला, झारपुत्र इवानला गाठले.

"ऐक," कोश्चेय म्हणाला, "तुझ्या भलेपणाबद्दल पहिल्या वेळी तुला क्षमा करतोय, तू मला पाणी पाजलं होतंस म्हणून! दुसऱ्या वेळीही क्षमा करीन पण तिसऱ्यांदा मात्र सांभाळ – तुझे तुकडे तुकडे करीन."

त्याने झारपुत्रापासून मार्या मोरेवनाला खेचून घेतले आणि तो निघून गेला. झारपुत्र इवान दगडावर बसून रडू लागला.

खूप खूप रडून झाल्यानंतर तो परत मार्या मोरेवनाकडे माघारी आला. अमर कोश्चेय घरात नव्हता.

"चल, मार्या मोरेवना."

"अरे झारपुत्र इवाना, तो आपल्याला गाठील."

"खुशाल गाठू दे. आपण निदान एक-दोन तास एकमेकांच्या संगतीत घालवू."

त्यांनी तयारी केली व ती निघाली.

अमर कोश्चेय घरी परतत असताना त्याच्या मांडीखालील उमदा घोडा अडखळला.

"काय रे मरतुकडचा, अडखळलास कशाला? तुला अपशकुनाची चाहूल लागली काय?"

"झारपुत्र इवान आला होता, मार्या मोरेवनाला बरोबर घेऊन गेला."

"त्यांना गाठणं शक्य आहे?"

"जर आपण सातू पेरले, ते पिकेपर्यंत वाट पाहिली, मग त्यांची कापणी-झोडपणी केली, त्यांच्यापासून बीयर गाळली, झिंगेपर्यंत बीयर प्यायलो, नंतर खच्चून झोप काढली आणि मग त्यांच्या पाठलागावर गेलो, तरी त्यांना गाठू शकू."

कोश्चेयने घोडा पिटाळला, झारपुत्र इवानला गाठले.

"मी तुला सांगितलं होतं, स्वतःचे कान कधी पाहू शकणार नाहीस, त्याप्रमाणं मार्या मोरेवना तुझ्या दृष्टीला कधी पडायची नाही."

त्याने मार्या मोरेवनाला हिसकावून घेतले व स्वतःच्या घरी तिला घेऊन गेला.

झारपुत्र इवान एकटा उरला, तो खूप खूप रडला व परत मार्या मोरेवनाकडे माघारी गेला. त्यावेळी कोश्चेय घरात नव्हता.

"चल, मार्या मोरेवना."

"अरे झारपुत्र इवाना,



जर त्यानं तुला ह्यावेळी गाठलं तर तो तुझी खांडोळी करील!"

"खुशाल करो तो माझी खांडोळी! मी तुझ्याविना जगू शकत नाही!"

त्यांनी तयारी केली व ती निघाली. अमर कोश्चेय घरी परतत असताना त्याच्या मांडीखालील उमदा घोडा अडखळला.

"तू अडखळलास का? एखाद्या अपशकुनाची चाहूल लागली काय?"

"झारपुत्र इवान आला होता, मार्या मोरेवनाला बरोबर घेऊन गेला."

कोश्चेयने घोडा पिटाळला, झारपुत्र इवानला गाठले, त्याची खांडोळी खांडोळी करून त्याच्या शरीराचे बारीक बारीक तुकडे एका डांबरी पिंपात कोंबले, पिंपाला लोखंडी कड्या बसविल्या आणि निळ्या समुद्रात पिंप फेकून दिल्यानंतर तो मार्या मोरेवनाला सांगाती घेऊन घरी परतला.

त्याच वेळी झारपुत्र इवानच्या मेहुण्यांजवळच्या चांदीच्या वस्तू काळ्या पडल्या.

"अरेच्चा," ते म्हणाले, "त्याच्यावर संकट कोसळलेलं दिसतंय!"

गरुडाने निळ्या सागरावर झेप घेतली आणि ते पिंप उचलून किनाऱ्यावर आणले.

बहिरीससाणा जिवंत पाणी आणायला उडाला आणि कावळा मृत पाणी आणायला गेला.

तिघेही एका जागी उडत आले, त्यांनी पिंप फोडले, झारपुत्र इवानच्या शरीराचे तुकडे पिंपातून बाहेर काढले, त्यांना स्वच्छ धुतले व त्यांची योग्य रचना केली.

कावळ्याने मृत पाणी त्या तुकड्यांवर शिंपले. ताबडतोब ते तुकडे एकमेकांना चिकटले व शरीर सांधले गेले. बहिरीससाण्याने जिवंत पाणी शिंपले, तेव्हा झारपुत्र इवान एकदम दचकला, उठला आणि म्हणाला :

"अरेच्चा, मी खूप वेळ झोपलो!"

"जर आम्ही नसतो, तर आणखी झोपून राहिला असतास," मेहुणे म्हणाले. "चल आता आमच्याकडं पाहुणा म्हणून."

"नाही, बंधूंनो, मार्या मोरेवनाला शोधायला मी जातो."

तिच्यापाशी जाऊन त्याने विचारले :

"तसला उमदा घोडा कुठं मिळाला हे अमर कोश्चेयकडून जाणून घे."

मार्या मोरेवनाने योग्य क्षण पकडून कोश्चेयला विचारले. कोश्चेय म्हणाला :

"तिप्पट-नऊ भूमींपलिकडं, तिप्पट-दहा राज्यांपलिकडं, आगीच्या नदीपलिकडं, बाबा-यागा राहते. तिच्यापाशी एक अशी घोडी आहे आणि त्या घोडीवरून ती दररोज जगभर उडून येते. तिच्यापाशी आणखी खूप छान घोड्या आहेत. मी तिच्याकडं तीन दिवस मोतद्दार म्हणून काम केलं, एकाही घोडीला पळू दिलं नाही, म्हणून बाबा-यागानं मला एक तट्टू बक्षीस दिलं."

"पण तू आगीची नदी कशी ओलांडलीस?"

"माझ्यापाशी एक रुमाल आहे – त्याला उजव्या बाजूला तीनदा झटकला म्हणजे उंचच उंच पूल तयार होतो आणि आगीच्या ज्वाळा त्या पुलापर्यंत पोहोचत नाहीत."

मार्या मोरेवनाने हे सर्व लक्षपूर्वक ऐकून घेतले आणि झारपुत्र इवानला सांगितले.

आणि तो जादूचा रुमालही तिने त्याला दिला.

झारपुत्र इवानने आगीची नदी ओलांडली व तो बाबा-यागापाशी गेला. न खाता-पिता तो खूप अंतर प्रवास करती होता. वाटेत त्याला एक विचित्र

पक्षीण व तिची पिले भेटली. झारपुत्र इवान म्हणाला:

"एक पिलू मी खावं का?"

"नको खाऊ, झारपुत्र इवान," विचित्र पक्षीण विनवणीच्या स्वरात म्हणाली, "कधी काळी मी तुझ्या उपयोगी पडेन."

तो आणखी पुढे गेला. रानात त्याला मधमाशांचे पोळे दिसले.

"मी थोडा मध खावा का?" तो म्हणाला.

मधमाशांची राणी म्हणाली:

"माझ्या मधाला धक्का लावू नको झारपुत्र इवान, कधी काळी मी तुला उपयोगी पडेन."

त्याने पोळ्याला धक्का लावला नाही. तो पुढे गेला. त्याला एक सिंहीण तिच्या छाव्यासह भेटली.

"आता निदान ह्या छाव्याला मी खातो. खूप भूक लागलीय, माझे पाय लटपटताहेत."

"छाव्याला हात लावू नको झारपुत्र इवान," सिंहीणीने याचना केली, "कधी काळी मी तुझ्या उपयोगी पडेन."

"ठीक आहे. तुझ्या इच्छेप्रमाणं होवो!"

उपाशीपोटी तो पुढे चालत राहिला. खूप खूप चालल्यानंतर बाबा-यागाच्या घरापाशी पोहोचला. घराभोवती बारा खांब होते, अकरा खांबांवर माणसांची मुंडकी खोचून ठेवलेली होती, फक्त एक खांब मोकळा होता.

"नमस्कार, आजी!"

"नमस्कार, झारपुत्र इवान! कशासाठी आलास? स्वेच्छेनं अथवा तुला काही गरज आहे?"

"तुझी सेवा करून एक उत्तम घोडा मिळवण्यासाठी आलोय."

"ठीक आहे, झारपुत्रा, तू माझी वर्षभर नको, फक्त तीन दिवस सेवा कर. जर माझ्या घोड्या तू सुरक्षित राखल्यास, तर मी तुला जातिवंत घोडा बक्षीस देईन; पण तसं केलं नाहीस, तर मात्र मला दोष देऊ नको — शेवटच्या खांबावर तुझं डोकं लटकेल!"

झारपुत्र इवान कबूल झाला. बाबा-यागाने त्याला खाऊ-पिऊ घातले व कामाला लागण्याची आज्ञा केली.

त्याने घोड्या मैदानात नेल्या न नेल्या तोच घोड्यांनी शेपट्या उभारल्या

व कुरणांमध्ये त्या चौखूर उधळल्या . झारपुत्राने डोळयांची पापणी लवविण्याच्या आत सगळया घोडया गायब झाल्या .

झारपुत्र रडू लागला , शोक करू लागला . तो एका दगडावर बसला व तेथेच त्याला झोप लागली .

सूर्य एव्हाना मावळू लागला होता . तेवढयात विचित्र पक्षीण उडत उडत झारपुत्रापाशी आली व त्याला जागा करू लागली :

" ऊठ , झारपुत्र इवान , घोडया आता घरी परतल्या आहेत . "

झारपुत्र उठला आणि घरी गेला . बाबा-यागा स्वतःच्या घोडयांवर खेकसत होती , किंचाळत होती :

" कशाला तुम्ही घरी परतलात ? "

" घरी परतणार नाही तर काय करणार ? सगळया जगातले पक्षी उडत उडत आमच्यावर चालून आले . आमचे डोळे फोडायच्या बेतात होते . "

" उद्या कुरणांमध्ये उधळू नका , दाट जंगलांमध्ये विखरून जा . "

झारपुत्र इवान रात्री गाढ झोपला . सकाळी बाबा-यागा त्याला म्हणाली :

" ध्यानात ठेव झारपुत्रा , जर घोडया नीट राखल्या नाहीस , एक जरी घोडी हरवलीस , तर तुझं मुंडकं त्या खांबावर लटकेल ! "

दुसऱ्या दिवशी त्याने घोडया मैदानात नेल्या . त्यांनी तात्काळ शेपटया उभारल्या व दाट जंगलांमध्ये धाव घेतली . परत झारपुत्र दगडावर बसला , रडला आणि झोपला . सूर्य जंगलापलिकडे मावळला . सिंहीण धावत आली :

" ऊठ , झारपुत्र इवान , सगळया घोडया परत तबेल्यांमध्ये गेल्यात . "

झारपुत्र इवान उठला आणि घरी गेला . बाबा-यागा पूर्वीपेक्षा जास्त जोराने स्वतःच्या घोडयांवर खेकसत होती :

" कशाला घरी परतलात ? "

" घरी नाही परतणार तर काय करणार ? सगळया जगातले हिंस्र पशू आमच्यावर धावून आले . आम्हाला फाडून खायच्या बेतात होते . "

" उद्या तुम्ही निळया समुद्रावर पळा ! "

झारपुत्र इवान परत रात्रभर गाढ झोपला . सकाळी त्याला घोडया राखायला पाठविण्यापूर्वी बाबा-यागाने बजाविले :

" जर यशस्वी झाला नाहीस , तर तुझं मुंडकं खांबावर लटकेल ! "

तो घोडया मैदानात घेऊन गेला . घोडयांनी तात्काळ शेपटया उभारल्या ,

नजरेआड झाल्या व निळ्या समुद्राकडे धावल्या. मानेपर्यंत पाण्यात उभ्या राहिल्या. झारपुत्र इवान दगडावर बसून रडला आणि झोपी गेला. सूर्य जंगलामागे मावळला आणि मधमाशी उडत उडत येऊन म्हणाली:

"ऊठ, झारपुत्रा, घोडचा सगळ्या तबेल्यांमध्ये परतल्या आहेत. पण घरी परतल्यावर बाबा-यागाच्या नजरेला पडू नको, घोडशाळेत जा आणि गव्हाणींमागं लप. तिथं एक लूतभरं तट्टू लीदीच्या ढिगाऱ्यात लोळतंय. त्याला ऐन मध्यरात्री स्वतःच्या ताब्यात घे आणि घरातून बाहेर पड."

झारपुत्र इवान उठला, घोडशाळेत गेला आणि गव्हाणींमागं पडून राहिला. बाबा-यागा स्वतःच्या घोडचांवर खेकसत होती:

"कशाला परतलात?"

"परतणार नाही तर काय करणार? सर्व जगातल्या मधमाशांच्या झुंडीच्या झुंडी उडत आल्या आणि आमच्या अंगातून रक्त ठिपकेपर्यंत त्यांनी नांग्या मारल्या!"

बाबा-यागा झोपली. ऐन मध्यरात्री झारपुत्र इवानने तिचे लूतभरे तट्टू घेतले, त्यावर खोगीर चढविले, त्यावर तो स्वार झाला आणि आगीच्या नदीकडे दौडत निघाला. नदीपर्यंत पोहोचल्यावर त्याने रुमाल उजव्या बाजूला तीनदा झटकला – अचानक कुठून कोण जाणे, पण नदीवर एक खूप उंच पूल उभा झाला.

झारपुत्राने पूल ओलांडला आणि डाव्या बाजूला फक्त दोनदा रुमाल झटकला. आता अगदी अरुंद आणि सखल पूल उभा होता.

सकाळी बाबा-यागा उठून पाहते तो काय – लूतभरे तट्टू गायब! ती ताबडतोब पाठलागावर निघाली. तिच्या लोखंडी उखळामधून ती सोसाटचाच्या वेगाने उडत होती, चाबूक म्हणून मुसळ फिरवत होती आणि लांब झाडूने वाटेवरच्या खुणा पुसून टाकत होती.

आगीच्या नदीपाशी ती पोहोचली आणि समोर पहात म्हणाली:

"छान पूल आहे!"

ती पुलावरून निघाली, जेमतेम मध्यापर्यंत पोहोचली, तोच पूल मोडली व बाबा-यागा नदीत पडली. तेथेच तिचा पाशवी मृत्यू घडला.

झारपुत्र इवानने तट्टाला हिरव्या कुरणांमध्ये भरपूर चारले आणि त्या तट्टाचे अद्भुत घोडचात रूपांतर घडले.

झारपुत्र मार्या मोरेवनापाशी आला. ती धावतच त्याच्या गळयाभोवती जाऊन बिलगली.

"मृत्यूला टाळणं तुला कसं शक्य झालं?"

त्याने तिला सर्व हकीकत सांगितली व तो म्हणाला: "चल माझ्याबरोबर!"

"मला भीती वाटते झारपुत्र इवान. जर कोश्चेयनं तुला गाठलं, तर परत तो तुझी खांडोळी करील!"

"नाही, यावेळी तो नाही गाठू शकणार! आता माझ्यापाशी उमदा जातिवंत घोडा आहे. तो पक्ष्याच्या वेगानं धावतो."

ती दोघे घोड्यावर बसून निघाली.

अमर कोश्चेय घरी परतत असताना त्याच्या मांडीखालचा घोडा अडखळला.

"काय रे मरतुकडया, अडखळलास का? तुला अपशकुनाची चाहूल लागली काय?"



"झारपुत्र इवान आला होता, मार्या मोरेवनाला घेऊन गेला."

"त्यांना गाठणं शक्य आहे?"

"माहीत नाही. आता झारपुत्र इवानपाशी माझ्यापेक्षा जास्त जातिवंत घोडा आहे."

"नाही, मला नाही सहन होत," अमर कोश्चेय म्हणाला. "मी त्याला गाठतोच!"

त्याने नेमक्या किती वेळात ते सांगता येणार नाही, पण अखेरीस झारपुत्र इवानला गाठले. जमिनीवर उडी मारून धारदार तलवारीचा घाव घालायच्या तो बेतात होता. पण त्याआधीच झारपुत्र इवानच्या घोड्याने सर्व ताकदीनिशी कोश्चेयच्या मस्तकावर टापेचा प्रहार केला आणि झारपुत्राने सोट्याने त्याचा फडशा पाडला.

मग झारपुत्राने लाकडांचा ढीग रचला, आग पेटवली, त्या चितेवर कोश्चेयचा देह जाळला व राख वाऱ्यावर उडविली.

मार्या मोरेवना कोश्चेयच्या घोड्यावर बसली, झारपुत्र इवान स्वतःच्या

घोड्यावर स्वार झाला व प्रथम ती दोघे कावळ्याकडे पाहुणे गेले. मग गरुडाकडे व त्यानंतर बहिरीससाण्याकडे त्यांनी पाहुणचार अनुभवला. सगळीकडे त्यांचे प्रेमाने आणि आनंदाने स्वागत झाले.

"अरे झारपुत्र इवाना, तुला पाहण्याची आशा आम्ही सोडून दिली होती. पण तुझी सारी खटपट व्यर्थ नव्हती हे मात्र खरं! मार्या मोरेवनासारखी दुसरी रूपवान स्त्री सबंध जग धुंडाळलंस तरी सापडणार नाही!"

त्यांनी खूप मेजवान्या झोडल्या आणि ती स्वतःच्या राज्याकडे गेली. तेथे ती दोघे खूप खूप वर्षे छान जगली, खाऊन-पिऊन सुखात राहिली.

इवान छोटा - बुद्धीने मोठा

कोणे एके काळची गोष्ट. एक होता म्हातारा आणि त्याला होती एक बायको. म्हातारा शिकार करायचा, जंगली पाखरे मारायचा व त्याच्यावरच त्यांचा उदरनिर्वाह चालायचा. अशा रीतीने अनेक वर्षेपर्यंत ते जगत होते, पण त्यांच्यापाशी काहीही संपत्ती साठली नाही. म्हातारीला ह्याचे खूप दुःख वाटत होते. "किती भिकार आयुष्य जगलो आपण! ना कधी चांगलं खायला मिळालं, ना प्यायला मिळालं, ना ल्यायला मिळालं! आणि आपल्याला मुलंही नाहीत. आपल्या म्हातारपणात आपली काळजी घ्यायला कुणीही नाही."

"म्हातारे, दुःख करू नको," म्हाताऱ्याने तिचे सांत्वन केले. जोपर्यंत काम करायला माझे दोन हात आहेत आणि मला घेऊन जायला माझे दोन पाय समर्थ आहेत, तोपर्यंत आपल्याला निदान पुरेसं खायला नक्की मिळेल. आणि उगीच उद्याच्या चिंता करू नकोस."

त्या दिवशी सकाळपासून रात्रीपर्यंत म्हातारा जंगलभर भटकला, पण ना त्याला पक्षी मिळाला ना एखादा प्राणी. रिकाम्या हातांनी घरी जाणे त्याला आवडत नव्हते, पण तो करणार काय? सूर्य एव्हाना मावळू लागला होता. घरी परतायची वेळ झाली होती.

तो परत जायला निघाला, एवढ्यात पंख फडफडल्याचा आवाज त्याने ऐकला. नजीकच्या झुडुपामधून एक अनुपम सौंदर्याचा पक्षी उडून गेला.

म्हाताऱ्याने नेम धरीपर्यंत पक्षी नाहीसा झाला होता.

"नशीब खोटं," म्हाताऱ्याने उसासा टाकला. पक्षी जेथून उडून गेला होता त्या ठिकाणी झुडुपात म्हाताऱ्याने सहज डोकावून पाहिले. तेथे घरट्यात तेहतीस अंडी होती!



"अगदीच काही नसण्यापेक्षा हे काही वाईट नाही," म्हातारा म्हणाला आणि त्याने आपला कमरपट्टा घट्ट आवळून आपल्या कफ्तानमध्ये सगळी तेहतीस अंडी ठेवली. मग तो घरी निघाला.

अशा रीतीने बरेच अंतर तो चालला. दरम्यान त्याचा पट्टा थोडा सैल बनला व एकेक अंडे खाली पडायला आरंभ झाला.

अंडे खाली पडले म्हणजे त्यातून एक मुलगा टुणदिशी उडी मारून बाहेर पडायचा. दुसरे अंडे पडले म्हणजे दुसरा मुलगा बाहेर यायचा, अशा रीतीने बत्तीस अंडी पडली व त्यांच्यामधून बत्तीस मुलगे उड्या मारून बाहेर पडले.

तेवढ्यात म्हाताऱ्याने परत आपला कमरपट्टा आवळला आणि एक अंडे – तेहतीसावे – आतच राहिले. म्हाताऱ्याने सहज मागे वळून पाहिले आणि त्याचा स्वतःच्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. बत्तीस गुटगुटीत देखणी मुले त्याच्या पाठीमागून येत होती व ती सगळी दिसायला अगदी एकसारखी होती. ती सर्व मुले एका आवाजात म्हणाली:

"ज्याअर्थी तुम्ही आम्हाला शोधून काढलंत, त्याअर्थी तुम्हीच आमचे

वडील, आम्ही तुमची मुलं! आता आम्हाला घरी घेऊन चला!"

"माझ्या आणि माझ्या बायकोच्या दृष्टीनं केवढा हा सुदिन!" म्हाताऱ्याच्या मनात आले. "एवढी सगळी वर्षं एकही तान्हं बाळ नाही आणि आता पहा – एका फटक्यात बत्तीस मुलगे!"

ते सगळे घरी आले आणि म्हातारा म्हणाला:

"ए म्हातारे, एवढी वर्षं मुलांसाठी झुरत होतीस ना? ठीक तर, आता मी तुझ्यासाठी बत्तीस देखणे मुलगे घेऊन आलोय! मेजावर भांडी लाव आणि पोरांना खाऊ घाल!"

ही मुले कशी सापडली त्याची हकीकत म्हाताऱ्याने सांगितली.

म्हातारी मख्खासारखी उभी होती. तिच्या तोंडून एकही शब्द बाहेर फुटेना. अखेर ती भानावर आली, तिच्या तोंडून चीत्कार उमटला व मग मेज लावण्यासाठी तिची धावपळ सुरू झाली. तेवढ्यात म्हाताऱ्याने कमरपट्टा सोडला आणि तेहतीसावे अंडे खाली पडून त्यातून तेहतीसावा मुलगा टुणकन बाहेर आला. "अरेच्चा, तू कुठून आलास?"

"मी छोटा इवान, तुमचा सर्वात धाकटा मुलगा!"

आणि मग म्हाताऱ्याला आठवले की, त्याला खरोखरीच त्या घरटचात तेहतीस अंडी सापडली होती.

"ठीक आहे, छोटा इवान, बैस जेवायला," म्हातारा म्हणाला. पण ती तेहतीस मुले मेजापाशी जेवायला बसली न बसली, तोच म्हातारीने बनवलेल्या सर्व अन्नाचा फडशा उडाला. मुले उठली तेव्हा ती भुकेली नव्हती, पण त्यांचे पोटही भरलेले नव्हते.

रात्र सरली. दुसऱ्या दिवशी सकाळी छोटा इवान म्हणाला, "बाबा, तुम्ही मुलगे शोधून काढलेत, आता काम शोधून द्या!"

"पोरांनो, मी तुम्हाला कोणतं काम देणार? माझ्या म्हातारीनं आणि मी उभ्या जन्मात कधी नांगरणी अथवा पेरणी केली नाही. आमच्याकडं घोडा किंवा नांगर कधीच नव्हता."

"ठीक. नाही तर नाही," छोटा इवान म्हणाला. "काम शोधण्यासाठी आम्हाला दुसऱ्या माणसांकडं गेलं पाहिजे. बाबा, तुम्ही लोहाराकडं जा आणि आमच्यासाठी तेहतीस कोयते बनवून आणा."

म्हातारा लोहारशाळेत गेला होता तोवर छोट्या इवानने व त्याच्या भावांनी तेहतीस कोयत्यांचे दांडे आणि तेहतीस दांताळी बनविली.

वडील लोहारशाळेतून कोयते घेऊन परत आले. छोट्या इवानने हत्यारे जोडली व तो म्हणाला:

"चला बंधूंनो, आपल्या हिंमतीवर जगण्यासाठी आणि आपल्या म्हाताऱ्या आई-बापांची सेवा करण्यासाठी आपण काम शोधू या आणि पैसे मिळवू या!"

मग मुलांनी आई-बापांचा निरोप घेतला व ते कामाच्या शोधात निघाले.

किती दूर ते चालत गेले हे सांगणे अवघड आहे, पण सरतेशेवटी ते एका मोठ्या शहरी पोहोचले. शहरच्या रस्त्यावरून झारचा दिवाण घोड्यावर बसून चालला होता. दिवाण ह्या मुलांपाशी येऊन म्हणाला:

"काय रे मुलांनो, कुठं निघालात? कामावर चाललात, की कामावरून परत येत आहात? जर कामासाठी निघाला असाल, तर माझ्या पाठीमागून या. मी तुम्हाला झकास काम देतो!"

"काय आहे तुमचं काम?"

"फारसं अवघड नाही," दिवाण उत्तरला. "झारची राखीव कुरणं

आहेत. तिथलं गवत कापायचं, ते गवत वाळवायचं, त्याच्या उडव्या बांधायच्या आणि त्यांच्या गंजी रचायच्या. तुमच्यात पुढारी कोण?"

कुणीही उत्तर दिले नाही तेव्हा छोटा इवान पुढे आला व म्हणाला:

"आम्हाला तिथं घेऊन चला आणि काम दाखवा."

म्हणून दिवाण त्या मुलांना झारच्या राखीव कुरणांकडे घेऊन गेला.

"तीन आठवडे तुम्हाला पुरतील?" दिवाणाने विचारले.

"जर हवा ठीक राहिली, तर तीन दिवस पुरेसे आहेत," छोटा इवान उत्तरला.

झारच्या दिवाणाला हे उत्तर आवडले.

"तर मग पोरांनो, करा सुरू काम!" तो म्हणाला. "अन्नाची आणि पैशाची काळजी करू नका. तुम्हाला हवं ते सर्व काही मिळेल."

छोटा इवान म्हणाला: "आमच्यासाठी फक्त तेहतीस बैल भाजा आणि तेहतीस बादल्या दारू द्या. शिवाय प्रत्येकाला एकेक कलाच* द्या. आणखी आम्हाला कशाचीही गरज नाही."

झारचा दिवाण निघून गेला. बंधूंनी मोठ्या उत्साहाने कोयते पाजळले व त्यांचे हात भराभरा चालू लागले. कोयत्यांचा सपसप आवाज येत होता. संध्याकाळपर्यंत सगळे गवत कापून झाले, दरम्यान झारच्या मुदपाकखान्यामधून मुलांचा शिधा आला होता: तेहतीस भाजलेले बैल, तेहतीस बादल्या दारू आणि प्रत्येकी एकेक कलाच. त्यांनी प्रत्येकी अर्धा बैल खाल्ला, अर्धी बादली दारू रिचवली, अर्धा कलाच खाल्ला व सगळेजण गाढ झोपले.

दुसऱ्या दिवशी जेव्हा सूर्य तापला, तेव्हा बंधूंनी गवत वाळविले, त्याच्या उडव्या बांधल्या आणि संध्याकाळपर्यंत सगळ्या गंजी रचून झाल्या. पुन्हा त्यांनी प्रत्येकी अर्धा बैल खाल्ला, अर्धी बादली दारू ढोसली, अर्धा कलाच संपविला. मग छोट्या इवानने एका भावाला झारच्या पटांगणात पाठविले:

"त्यांना इथं येऊन काम पहायला सांग."

भाऊ दिवाणाला घेऊन परतला आणि लौकरच खुद्द झार आपल्या राखीव कुरणात आला. झारने सगळ्या गंजी मोजल्या व सगळ्या कुरणांमधून तो फिरला. गवताचे एकही उभे पाते त्याला आढळले नाही.

"पोरांनो," झार म्हणाला, "तुम्ही छानपैकी आणि वेळेवर गवत

---

* कडीच्या कुलुपाच्या आकाराचा छोटा पांढरा पाव – अनु.

कापलंत. त्याबद्दल मी तुमचं कौतुक करतो, शिवाय शंभर रूबल आणि चाळीस बादल्यांचं दारूचं पिंप इनाम म्हणून देतो. पण आता आणखी एक तुम्हाला केलं पाहिजे. गवताची राखण केली पाहिजे. दरवर्षी कुणीतरी इथं येऊन गवत फस्त करतं आणि आम्हाला अद्याप चोराचा शोध लागलेला नाही."

छोटा इवान उत्तरला: "महाराज, माझ्या भावांना घरी जाऊं दे आणि मी एकटा गवताची राखण करीन."

झारने संमती दिली. म्हणून सगळे बंधू झारच्या राजवाड्याच्या पटांगणात गेले. तेथे त्यांना ठरल्याप्रमाणे पैसे मिळाले, शिवाय झकास जेवण आणि दारूही मिळाली. त्यानंतर ते घरी जायला निघाले.

आणि छोटा इवान झारच्या राखीव कुरणांकडे परतला. झारच्या गवताची राखण करताना रात्रीच्या वेळांना तो झोपत नसे. दिवसा मात्र तो खायचा-प्यायचा आणि झारच्या मुदपाकखान्यात आराम करायचा.

शरदाचा मोसम सुरू झाला. रात्री काळोख्या आणि मोठ्या बनल्या. एके संध्याकाळी इवान एका गवताच्या गंजीवर चढला व गवतात अंग खुपसून डोळे सताड उघडे ठेवून पडून राहिला. मध्यरात्रीच्या ऐन ठोक्याला अचानक दिवसासारखा उजेड पडला. छोट्या इवानने हळूच डोकावून पाहिले तो काय! सोनेरी आयाळीची एक घोडी उभी होती! ती समुद्रातून उडी मारून बाहेर आली आणि सरळ इवानच्या गवताच्या गंजीकडे तिने धाव घेतली. तिच्या टापांखाली जमीन हादरत होती, वाऱ्यामुळे तिची सोनेरी आयाळ फुलारली होती, तिच्या नाकपुड्यांमधून ज्वाला उमटत होती व तिच्या कानांमधून धुराचे लोट येत होते.

घोडी गवताच्या गंजीपाशी धावत आली व गवत खायला तिने आरंभ केला. पहारेकरी छोट्या इवानने संधी साधून तिच्या पाठीवर उडी मारली. घोडी एकदम गंजीपासून मागे सरली व झारच्या राखीव कुरणांमधून चौखूर उधळली. पण छोट्या इवानने डाव्या हाताने तिची आयाळ गच्च पकडून धरली होती व त्याच्या उजव्या हातात चामड्याचा चाबूक होता. सोनेरी आयाळीच्या घोडीला दलदलीच्या आणि शेवाळभरल्या प्रदेशात पिटाळीत नेताना त्याने तिला चाबकाचे सणसणीत तडाखे मारले.

त्या दलदलीच्या आणि शेवाळी प्रदेशात घोडीने बराच वेळपर्यंत पळापळ केली, पण शेवटी ती चिखलात पोटावर कोसळली व थांबली. ज्या क्षणी

ती थांबली त्या क्षणी ती म्हणाली : "छोटा इवान, मला पकडण्याचं आणि माझ्यावर मांड राखण्याचं धैर्य तू दाखवलंस, तसंच मला वठणीवर आणायची हिंमतही दाखवलीस. आता मला अधिक मारू नकोस, दुखापत करू नकोस. मी तुझी इमानी सेवक बनून राहीन."

इवानने तिला झारच्या पटांगणात आणले आणि तबेल्यात बंद केले. मग तो झारच्या मुदपाकखान्यात गेला व गाढ झोपला. दुसऱ्या दिवशी झारपाशी येऊन तो म्हणाला : "महाराज, तुमच्या राखीव कुरणांमधलं गवत कोण चोरत होतं ते मी शोधून काढलंय आणि मी चोरालाही पकडलंय. चला, तुम्ही स्वतःच पहा!"

झारने सोनेरी आयाळीची घोडी पाहिली व तो अत्यंत खूष झाला.

"शाबास इवान," तो म्हणाला, "जरी तुला छोटा इवान म्हणत

असले, तरी बुद्धीनं तू मोठा आहेस. तुझ्या निष्ठावंत सेवेचं इनाम म्हणून यापुढं मी तुला माझा मुख्य मोतद्दार नेमत आहे."

आणि तेव्हापासून इवानला सगळेजण 'इवान छोटा – बुद्धीने मोठा' अशा टोपणनांवाने ओळखू लागले

तर छोटा इवान झारच्या तबेल्यांमध्ये मुख्य मोतद्दार म्हणून कामाला लागला. झारच्या घोडयांची निगराणी करताना तो रात्र रात्र झोपत नसे. झारचे घोडे दिवसागणिक अधिक मुलायम व भरदार दिसू लागले. त्यांची त्वचा रेशमासारखी तकाकू लागली; त्यांच्या आयाळी व शेपटचा नेहमी व्यवस्थित विंचरलेल्या आणि फुलारलेल्या असत. ते देखणे घोडे खरेच पहावेसे वाटत.

खूष झालेल्या झारला तर इवानचे कौतुक करायला शब्द सापडेनात.

"शाबास इवान छोटा – बुद्धीने मोठा! असा झकास मोतद्दार माझ्या पदरी कधीही नव्हता!" पण जुन्या मोतद्दारांना इवानचा मत्सर वाटू लागला.

"एका खेडवळ पोरटयाचे हुकूम ऐकायचे! वा रे झारच्या तबेल्यांचा मुख्य मोतद्दार!"

त्या सगळयांनी इवानविरुद्ध खोडी करण्याचा कट रचला. पण छोटा इवान बिनधास्तपणे आपले काम नेहमीप्रमाणे करीत होता.

त्यावेळी झारच्या तबेल्यांमध्ये एक म्हातारा शिपुरडा भटकत भटकत आला. तो पक्का दारूडा होता.

"मंडळी, काल रात्रीपासून कपाळशूळ उठलाय! त्यावर औषध म्हणून घोटभर दारू द्या. एवढी कृपा केलीत, तर तुमच्या मुख्य मोतद्दाराचा काटा काढायची युक्ती मी तुम्हाला सांगतो."

तबेल्यातील जुन्या मोतद्दारांनी मोठ्या आनंदाने त्या शिपुरडयाला दारू पाजली.

दारूचा प्याला घटाघटा पिऊन शिपुरडा म्हणाला: "आपोआप वाजणारी गूस्ली,* नाचणारा हंस आणि बागडणारे मांजर मिळविण्यासाठी आपला झार केव्हाचा तळमळतोय. ह्या गोष्टी मिळवायला अनेक चांगले तरुण स्वेच्छेने गेले होते आणि अनेकांना सक्तीनं पाठवण्यात आलं होतं, पण एकही माणूस कधी परतला नाही. आता झारपाशी जाऊन सांगा की; ह्या गोष्टी आपण अगदी सहज आणून देऊ अशी छोटा इवान बढाई मारत होता. झार त्याला

---

* एक प्रकारचे तंतुवाद्य – अनु.

लगोलग पाठवील आणि छोटा इवान कधीही परत येणार नाही ! "

मोतद्दारांनी शिपुरड्याला आणखी दारू पाजून त्याचे आभार मानले. मग ते सरळ झारच्या पुढील दारापाशी गेले. झारच्या खिडक्यांखाली उभे राहून ते गप्पा मारू लागले. झारच्या जेव्हा ते नजरेस पडले तेव्हा तो राजवाड्यातून बाहेर आला व त्याने विचारले:

"भल्या माणसांनो, कशाबद्दल बोलणं चाललंय? काय पाहिजे तुम्हाला?"

"महाराज, इवान छोटा – बुद्धीने मोठा बढाई मारत होता की, आपोआप वाजणारी गूस्ली, नाचणारा हंस आणि बागडणारे मांजर तो सहज आणू शकेल. म्हणून आमचा इथं वाद चाललाय. काहीजण म्हणतात की तो आणू शकेल, तर काहींचं सांगणं तो पोकळ बढाया मारतोय!"

झारने जेव्हा अशी बोलणी ऐकली तेव्हा त्याचा चेहरा बदलला, त्याचे हात-पाय थरथर कापू लागले.

"अरेरे," त्याच्या मनात विचार आला, "जर ह्या दुर्मिळ गोष्टी मला मिळाल्या तर किती बहार येईल! इतर सगळे झार माझा हेवा करतील. शिवाय आजपर्यंत ह्या गोष्टींसाठी मी इतकी माणसं पाठवली, पण एकही माणूस परतलेला नाही!"

त्याने तात्काळ मुख्य मोतद्दाराला बोलावणे धाडले.

आणि मुख्य मोतद्दार समोर हजर होताच झार मोठ्यांदा ओरडला:

"इवान, वेळ वाया घालवू नकोस. आपोआप वाजणारी गूस्ली, नाचणारा हंस, बागडणारे मांजर ह्यांना ताबडतोब घेऊन ये!"

इवान छोटा – बुद्धीने मोठा उत्तरला:

"अहो कमाल आहे! महाराज, मी ह्या गोष्टींचं कधी नांवही ऐकलेलं नाही! तुम्ही मला कुठं पाठवू इच्छिता?"

ह्यावर झारचा भयंकर संताप उडाला व त्याने पाय आपटला.

"काय बकबक करतोस? शाही आज्ञांचं पालन करत नाहीस? ताबडतोब जा! जर ह्या गोष्टी मला आणून दिल्यास, तर मी तुला इनाम देईन. पण नाही आणल्यास, तर माझ्या तलवारीनं तुझा शिरच्छेद करीन!"

जड अंतःकरणाने आणि खालच्या मानेने छोट्या इवानने झारचा निरोप घेतला. सोनेरी आयाळीच्या घोडीवर तो खोगीर चढवू लागला तेव्हा तिने

विचारले. "मालक, तुम्ही दुःखी का? काही बिनसलंय?"

"दुःख करू नको तर काय करू? झारनं मला हुकूम दिलाय: आपोआप वाजणारी गूस्ली, नाचणारा हंस आणि बागडणारं मांजर आणून दे. मला तर ह्याबद्दल काहीच ठाऊक नाही."

"ठीक आहे. ह्यात विशेष कठीण काही नाही," सोनेरी आयाळीची घोडी म्हणाली. "माझ्या पाठीवर बसा आणि आपण म्हातारी चेटकीण बाबा-यागा हिच्याकडं जाऊ. ह्या अद्भुत गोष्टी कुठं मिळतील हे तिला विचारा."

म्हणून इवान छोटा – बुद्धीने मोठा दूरच्या प्रवासाच्या तयारीला लागला. तो घोडीवर स्वार कसा झाला एवढेच त्याला लोकांनी शेवटचे पाहिले, पण वेशींबाहेर पडताना मात्र कुणीही त्याला पाहिले नव्हते, एवढ्या वेगात तो निघून गेला होता.

किती दूरपर्यंत त्याने दौड केली हे सांगणे अवघड आहे, पण शेवटी तो एका निबिड अरण्यात घुसला. ते अरण्य एवढे दाट होते की, सूर्याचा एकही किरण तेथे घुसू शकत नव्हता. सोनेरी आयाळीची घोडी हडकुळी बनली आणि खुद्द छोटा इवान थकून गेला. पण अखेरीस जंगलातील एका घळीपाशी ते पोहोचले. त्यांना एक छोटी झोपडी दिसली. ती झोपडी कोंबडीच्या पायावर उभी होती व त्या पायाला चाती होती. ती झोपडी पूर्वेकडून पश्चिमेकडे सारखी गरगर फिरत होती. इवान घोडीवरून त्या झोपडीपर्यंत गेला आणि म्हणाला:

"छोटया झोपडी, छोटया झोपडी, झाडांकडं पाठ कर, माझ्याकडं तोंड कर. वर्षानुवर्षं नाही राहणार, दिवस उजाडताच निघून जाणार!"

छोटया झोपडीने आपले तोंड इवानकडे वळविले. छोटया इवानने घोडीला एका खांबाला बांधले, तो धावतच पायऱ्या चढला आणि त्याने झोपडीचे दार उघडले. झोपडीत म्हातारी, लांबनाकी चेटकीण बाबा-यागा लांब दांड्याचा झाडू घेऊन बसली होती. तिच्या पुढ्यात खलबत्ता होता.

पाहुणा दृष्टीस पडताच बाबा-यागा किरट्या आवाजात ओरडली: "हूं, हूं, रशियन रक्ताची गाठ कधी पडली नव्हती माझ्याशी, आता त्याचा वास येतोय माझ्या दाराशी! कोण आहे तिथं? कुठून आलंय? कुठं चाललंय?"

"आजीबाई, पाहुणचाराची ही काय रीत झाली? तो भुकेला आणि गारठलेला असताना त्याला प्रश्न विचारून सतावतेस? रूसमध्ये प्रथम वाटसरूला



खाऊ-पिऊ घालतात, ऊब देतात, विश्रांती देतात, न्हाऊ घालतात आणि मग कोण-कुठला ह्याच्या चौकशा सुरू करतात."

"अरे लाडक्या, देखण्या पोरा," बाबा-यागा ओरडली, "ह्या म्हातारीवर रागावू नको रे! आणि आपण रूसमध्ये नाही हे तुला माहीत आहे. पण आत्ता मी सगळं ठीक करते!"

आणि ती धावपळ करू लागली. तिने मेजावर खाद्य-पेये मांडली, पाहुण्याचे स्वागत केले, मग धावत जाऊन बाऱ्यामधील चुलाणा पेटविला. इवान छोटा – बुद्धीने मोठा ह्याने गरमागरम आंघोळ केली, बाबा-यागाने त्याला मऊ मऊ बिछाना तयार करून दिला व त्याला आरामशीर निजविले. मग चेटकीण त्याच्या बिछान्याशेजारी बसली व तिने विचारले:

"पोरा, आता सांग, तुझी वाट कुठं जाते? तू इथं स्वेच्छेनं आलास, अथवा कुणाच्या दुष्ट इच्छेपायी तुला इथं यावं लागलं?"

"मला झारनं पाठवलंय," इवान उत्तरला. "आपोआप वाजणारी गूस्ली, नाचणारा हंस आणि बागडणारं मांजर आणण्यासाठी! आजीबाई, ह्या गोष्टी कुठं मिळतील हे तू मला सांगितलंस तर फार फार उपकार होतील बघ!"

"बेटा, ह्या गोष्टी कुठं आहेत ते मला ठाऊक आहे, पण त्या मिळवणं फार कठीण आहे. अनेक चांगली चांगली पोरं त्यांच्या प्राप्तीसाठी गेली आहेत, पण एकही माणूस कधी परतलेला नाही!"

"आजीबाई, जे काम करणं आवश्यक आहे, ते केलंच पाहिजे. तेव्हा माझ्या संकटकाळात मला मदत कर आणि कुठं जायचं हे सांग."

"अरे भल्या मुला, मला तुझी खूप दया येते आणि तुला मदत करण्याशिवाय दुसरा उपाय नाही हेही मला दिसतंय. तुझी सोनेरी आयाळीची घोडी इथं सोडून जा. माझ्यापाशी ती सुरक्षित राहील. आणि हा सुताचा छोटा गुंडा घे. उद्या जेव्हा बाहेर पडशील तेव्हा जमिनीवर हा गुंडा टाक आणि तो जसा गडगडत जाईल, तसा त्याच्या मागं मागं जा. माझ्या मधल्या बहिणीकडं तुला तो नेईल. तिला नुसता हा गुंडा दाखव, म्हणजे ती तुला शक्य ती सर्व मदत करील आणि माहीत असलेलं सर्व काही सांगील. मग तुला ती आमच्या सर्वांत मोठ्या बहिणीकडं पाठवील."

दुसऱ्या दिवशी पहाटेपूर्वीच तिने आपल्या पाहुण्याला जागे केले, त्याला

अन्न-पाणी दिले व अंगणापर्यंत निरोप दिला. इवान छोटा – बुद्धीने मोठा ह्याने बाबा-यागाचे आभार मानले व तिचा निरोप घेऊन तो लांबच्या प्रवासाला निघाला. कृतीपेक्षा बोलणे लौकर घडते, पण गुंडा गडगडत गडगडत जात होता व पोरगा त्याच्या पाठोपाठ चालला होता.

एक दिवस तो चालला, दुसरा दिवस चालला, तिसरा दिवस चालला. अखेरीस गुंडा एका छोटचा झोपडीपाशी जाऊन थांबला. ती झोपडी चिमणीच्या पायावर उभी होती व पायाला चाती होती. गुंडा झोपडीपाशी थांबताच इवान छोटा – बुद्धीने मोठा ह्याने साद घातली. "छोटचा झोपडी, छोटचा झोपडी, झाडांकडं पाठ कर, माझ्याकडं तोंड कर."

आणि झोपडी त्याप्रमाणे वळली व पायऱ्या चढून मुलगा वर गेला. त्याने दरवाजा उघडला आणि कर्कश्य आवाज त्याला ऐकू आला:

"हूं, हूं, रशियन रक्ताची पूर्वी कधी गाठ पडली नव्हती माझ्याशी, आता त्याचा वास येतोय माझ्या दाराशी! कोण आहे तिथं? कुठून आलंय? कुठं चाललंय?"

छोटचा इवानने तिला सुताचा गुंडा दाखविला आणि ती आश्चर्याने ओरडली:

"अगबाई, तू तर माझ्या बहिणीनं पाठवलेला पाहुणा! कुणी परका नव्हे! तसं ताबडतोब का नाही सांगितलंस?" तिने लगबगीने मेजावर मिष्टान्नांची आणि पेयांची मांडामांड केली व त्याचे आगत-स्वागत केले.

"भरपूर खा-पी," ती म्हणाली, "आणि पडून आराम कर. मग आपण कामासंबंधी बोलू."

इवान छोटा – बुद्धीने मोठा भरपूर खाल्ला-प्यायला व विश्रांतीसाठी पहुडला, तर चेटकिणीची मधली बहीण बाबा-यागा त्याच्या बिछान्यापाशी बसून हळू हळू चौकशा करू लागली. त्याने तिला स्वतःची सर्व माहिती सांगितली आणि दूरच्या प्रवासामागील हेतूही सांगितला. मग बाबा-यागा म्हणाली:

"वाट काही फार दूरची नाही, पण तू जिवंत राहशील अथवा नाही ते मला ठाऊक नाही. आपोआप वाजणारी गूस्ली, नाचणारा हंस आणि बागडणारं मांजर ह्या सगळ्या गोष्टी आमचा भाचा झ्मेई गोरीनिच ह्या भयानक सर्पराक्षसापाशी आहेत. अनेक चांगली चांगली मुलं आजपर्यंत तिथं गेली,

पण एकही माणूस कधी परतला नाही. सगळे सर्पराक्षसाचे बळी ठरले. आता तो आहे आमच्या सर्वांत मोठ्या बहिणीचा मुलगा. तेव्हा तुला मदत करण्याची आपण तिला विनंती केली पाहिजे, नाही तर तूही जिवंत परतणार नाहीस. काय करायचं मला ठाऊक आहे. माझा जादूचा दूत रावेन ह्याला मी तिच्याकडं आधी इशारा द्यायला पाठविते. आता लौकर झोप, कारण उद्या तुला खूप लौकर उठावं लागणार आहे."

देखण्या तरुण पोराने मस्त झोप काढली आणि भल्या पहाटे तो उठला. स्नान करून त्याने बाबा-यागाने बनविलेले भोजन केले. मग तिने त्याला लाल लोकरीचा गुंडा दिला, बाहेर नेऊन त्याला वाट दाखविली आणि तेथे त्यांनी एकमेकांचे निरोप घेतले. गुंडा पुढे गडगडत जात होता व इवान छोटा – बुद्धीने मोठा त्याच्या पाठोपाठ चालत जात होता.

अशा रीतीने सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत आणि सूर्यास्तापासून पहाटेपर्यंत तो चालत राहिला. जेव्हा तो थकला तेव्हा त्याने गुंडा उचलला, खाली बैठक मारली, पावाचा तुकडा खाल्ला, झऱ्याचे घोटभर पाणी घेतले आणि तो पुढे निघाला. तिसऱ्या दिवसाच्या अखेरी गुंडा एका मोठ्या घरापाशी थांबला. बारा दगडांवर बांधलेले आणि बारा खांबांवर तोलून धरलेले ते मोठे घर होते. सबंध घराभोवती उंच कुंपण होते.

कुत्रा भुंकला आणि चेटकिणीची सर्वांत मोठी बहीण, बाबा-यागा, बाहेर धावत आली. तिने कुत्र्याला गप्प केले व ती म्हणाली:

"ये, देखण्या मुला, तुझ्याबद्दल मला सारं काही ठाऊक आहे. माझ्या मधल्या बहिणीचा जादूचा दूत रावेन इथं आला होता. तुझ्या यातना नाहीशा करायला आणि गरजा पूर्ण करायला मी मदत करीन. पण आधी आत ये, थोडं खा-पी, कारण प्रवासामुळं तू खूप शिणला-भुकेला असशील."

तिने त्याला आत नेले व भरपूर खाऊ-पिऊ घातले.

"आता तुला लपलं पाहिजे – लौकरच माझा मुलगा झ्मेई गोरीनिच येईल. तो घरी परततो तेव्हा नेहमी चिडलेला आणि भुकेलेला असतो. तुला तो खाऊन टाकील अशी मला भीती वाटते." तिने गुप्त दार उघडले व ती त्याला म्हणाली: "तळघरात जा छोटा इवान आणि मी तुला हाक मारीपर्यंत तिथंच बसून रहा."

तिने गुप्त दार बंद केले न केले तोच भयानक गलबला व आवाज

ऐकू आला. धाडकन दार उघडले गेले आणि झ्मेई गोरीनिच एवढ्या जोरात आत उडत आला की, घराच्या भिंती गदगदा हलल्या.

"मला इथं रशियन वास येतोय," तो गरजला.

"अरे बाळा, इथं कुठून येणार रशियन वास? वर्षानुवर्षांत एखादा भुरा लांडगा दबत दबत इथं आला नाही, किंवा तेजस्वी बहिरीससाणा उडत आला नाही. तू स्वतः जगभर उडत असतोस आणि तूच हा वास स्वतः-बरोबर आणलास!"

असे म्हणून तिने लगबगीने मेजाची मांडामांड केली. भट्टीमधून तिने भाजलेला तीन वर्षांचा बैल खेचून काढला आणि कोठीघरातून बादलीभर दारू आणली. झ्मेई गोरीनिचने एका घोटात बादली रिकामी केली आणि तोंडी लावणे म्हणून भाजलेला बैल फस्त केला. मग तो अधिक आनंदी बनला.

"आई, आता मी कुणाबरोबर मजा करू? माझ्याशी पत्ते कोण खेळील?"

"तुझ्याशी पत्ते खेळायला आणि मजेला मी कुणीतरी शोधून काढीन, पण त्याला तू अपाय करशील अशी मला भीती वाटते."

"आई, बोलाव ना त्याला! आणि भिऊ नको. मी कुणालाही अपाय करणार नाही. आत्ता मला पत्ते खेळायची, मजा करायची फार हुक्की आलीय!"

"बघ हं मुला, तुझे शब्द लक्षात ठेव," बाबा-यागा म्हणाली व तिने बाहेर जाऊन गुप्त दार उघडले.

"वर ये इवान छोटा – बुद्धीने मोठा. तुझ्या यजमानाची एक इच्छा पुरी कर. त्याच्याशी पत्ते खेळ."

आणि ते मेजाशी पत्ते खेळायला बसले. झ्मेई गोरीनिच म्हणाला:

"आपण असं खेळू: जिंकणारा हरणाऱ्याला खाईल!"

सबंध रात्रभर ते पत्ते खेळले व बाबा-यागाने आपल्या पाहुण्याला मदत केली, त्यामुळे सकाळच्या पहिल्या किरणावेळी छोट्या इवानने डाव जिंकलेला होता. मग झ्मेई गोरीनिच विनवणीच्या सुरात म्हणाला:

"आमच्याबरोबर आणखी एक रात्र रहा. कदाचित मी उलट जिंकीन."

नंतर तो उडून गेला. दरम्यान इवान छोटा – बुद्धीने मोठा गाढ झोपला.

बाबा-यागाने त्याला सुरेख जेवण खाऊ घातले.

सूर्यास्ताला झ्मेई गोरीनिच परतला. त्याने आणखी भाजलेला तीन वर्षांचा बैल खाल्ला, दीड बादली दारू ढोसली व मग तो म्हणाला:

"चला, आता खेळायला बसू. मी स्वतःला परत जिंकून घेईन."

पण झ्मेई गोरीनिच ती सबंध रात्र झोपला नव्हता आणि सबंध दिवस तो जगभर उड्डाण करीत होता, त्यामुळे लौकरच तो पेंगुळला. आणि बाबा-यागाच्या मदतीने छोटा इवान परत जिंकला. मग झ्मेई गोरीनिच म्हणाला:

"आता मला कामासाठी उडत गेलं पाहिजे. पण संध्याकाळी आपण तिसरा डाव खेळू!"

इवान छोटा – बुद्धीने मोठा भरपूर झोपला. त्याने छान विश्रांती घेतली. पण झ्मेई गोरीनिच दोन रात्री झोपला नव्हता, शिवाय विशाल जगामध्ये त्याने भ्रमंती केली होती. त्यामुळे तो घरी आला तेव्हा प्रचंड थकलेला होता. त्याने भाजलेला एक बैल खाल्ला, दोन बादल्या दारू ढोसली व मग पाहुण्याला बोलाविले:

"बैस देखण्या मुला, आणि आज मी स्वतःला परत जिंकून घेतो."

पण तो एवढा थकला होता आणि पेंगुळला होता, की लौकरच देखण्या मुलाने तिसऱ्यांदा डाव जिंकला.

झ्मेई गोरीनिच खूप घाबरला. गुडघे टेकून त्याने दयेची याचना केली.

"इवान छोटा – बुद्धीने मोठा, मला खाऊ नको, मला ठार मारू नको. तुझ्यासाठी मी काहीही करीन." आपल्या आईसमोरही गुडघे टेकून त्याने तिची विनवणी केली:

"आई, त्याला म्हणावं, मला मारू नको!"

अर्थात छोटया इवानला हेच हवे होते.

"ठीक आहे झ्मेई गोरीनिच. मी तीन डाव जिंकले आहेत. तर तू मला तीन अद्भुत गोष्टी दे: आपोआप वाजणारी गूस्ली, नाचणारा हंस आणि बागडणारं मांजर. म्हणजे आपली फिटंफाट होईल!"

झ्मेई गोरीनिच अत्यानंदाने हसला. त्याने पाहुण्याला आणि त्याची म्हातारी आई बाबा-यागा हिला भराभरा आलिंगने दिली.

"मी मनापासून त्या वस्तू देतो!" तो ओरडला. "मला त्याहून चांगल्या वस्तू मिळू शकतील."

त्यांनी खूप जोरदार मेजवानी केली. झ्मेई गोरीनिचने छोटया इवानचा खासा पाहुणचार केला व त्याला भाऊ म्हणून संबोधले. इवानला घरी पोहोचवण्याची त्याने तयारी दाखविली.

"तू पायपीट कशाला करतोस? आपोआप वाजणारी गूस्ली, नाचणारा हंस आणि बागडणारं मांजर यांचं ओझं कशाला वाहतोस? तुला पाहिजे तिथं मी एका क्षणात घेऊन जातो!"

"ठीक आहे बाळा," बाबा-यागा म्हणाली. "तुझ्या पाहुण्याला माझ्या सर्वात धाकटया बहिणीकडं, तुझ्या मावशीकडं, घेऊन जा. आणि परतीच्या वाटेवर तुझ्या मधल्या मावशीला भेटायलाही विसरू नकोस. त्या दोघींनी बऱ्याच काळात तुला पाहिलेलं नाही."

मेजवानी संपली. छोटया इवानने अद्भुत वस्तू घेतल्या. मग त्याने बाबा-यागाचा निरोप घेतला. झ्मेई गोरीनिचने त्याला धरले व निळया आकाशात झेप घेतली. एक तासाच्या आत ते सर्वात धाकटया बाबा-यागाच्या झोपडीपाशी जमिनीवर उतरले. त्या झोपडीची मालकीण धावत बाहेर आली.

त्या दोघांना पाहून तिला आनंद झाला.

इवान छोटा – बुद्धीने मोठा ह्याने वेळ गमावला नाही. त्याने सोनेरी आयाळीच्या घोडीवर खोगीर चढविले. मग सर्वात धाकट्या बाबा-यागाचा व तिचा भाचा झ्मेई गोरीनिच याचा त्याने निरोप घेतला. त्यानंतर स्वतःच्या झारच्या राज्याकडे तो निघाला.

अखेरीस सर्व अद्भुत गोष्टी बरोबर घेऊन छोटा इवान सुरक्षितपणे घरी पोहोचला. त्यावेळी झारकडे पाहुणे आलेले होते: तीन झार त्यांच्या झारेविचां* बरोबर आले होते, तीन राजे त्यांच्या राजपुत्रांबरोबर आले होते. शिवाय मंत्रीगण, बायारे** आले होते.

देखणा पोरगा दालनात आला व त्याने झारला आपोआप वाजणारी गूस्ली, नाचणारा हंस आणि बागडणारे मांजर ह्या गोष्टी नजर केल्या. झार बेहद्द खूष झाला.

"इवान छोटा – बुद्धीने मोठा, ह्यावेळी तू फार झकास कामगिरी बजावलीस. माझ्या कौतुकाचा आणि तुझ्या इनामाचा स्वीकार कर. आत्तापर्यंत तू मुख्य मोतद्दार होतास, पण आजपासून मी तुला माझा सल्लागार म्हणून नेमतो."

बायारांनी आणि मंत्र्यांनी नाके मुरडली. आपापसात ते कुजबुजले:

"आमच्यात एक मोतद्दार बसणार! किती

---

* झारेविच – झारचा युवराज – अनु.

** बायारे – रशियातील प्राचीन व मध्ययुगीन काळातील जमीनदारवर्ग – अनु.

शरमेची बाब! झारला स्वतःच्या कृत्याची नीट जाणीव आहे का?"

तेवढ्यात आपोआप वाजणाऱ्या गूस्लीने सूर छेडले, बागडणारे मांजर गाऊ लागले आणि नाचणाऱ्या हंसाने नृत्याची पहिली पावले टाकली. नाच-गाण्याचा जल्लोष सुरू झाला आणि शाही पाहुण्यांना एका जागी गप्प बसून राहणे अशक्य ठरले. सर्वजण नाचू लागले.

बराच वेळ उलटला, पण अजूनही सगळे नाचत होते. राजांचे आणि झारांचे मुकुट एका बाजूला कलले. त्यांचे राजपुत्र आणि झारेविच मजेने बैठ्या नाचात गिरक्या मारीत होते. बायारे आणि मंत्री घामाघूम होऊन धापा टाकीत होते. पण कुणालाही थांबता येईना. अखेरीस हात हलवीत झारने विनंती केली.

"थांबव ते इवान छोटा – बुद्धीने मोठा! पुरे कर गंमत! आम्ही सगळे पार थकलो!"

तेव्हा देखण्या मुलाने तीनही अद्भुत गोष्टी पोतडीत भरल्या आणि सगळे निवांत झाले. सर्व पाहुणे जागा मिळेल तेथे फतकल मारून बसले व हाश्शहुश्श करू लागले.

"वा, काय मजा आली नाही? असं कधी पाहिलं होतं?"

परदेशी पाहुण्यांना झारचा हेवा वाटला आणि झार परमावधीच्या खुषीत होता.

"आता सगळे झार आणि राजे मत्सरानं पेटून उठतील. अशा अद्भुत गोष्टी कुणाहीपाशी नाहीत," झारच्या मनात आले.

पण बायारे आणि मंत्री मात्र एकमेकांमध्ये खुसपूस करीत होते:

"हे असंच चालू राहिलं तर लौकरच हा गांवढळ पोरगा राज्यातला प्रमुख अधिकारी बनेल आणि सगळ्या सरकारी कचेऱ्यांमध्ये तो आपल्या गांवढळ नातेवाईकांची भरती करील. आणि जर आपण त्याचा काटा काढला नाही, तर आम्हा सरदारांना तो मृत्यूच्या जबड्यात लोटील!"

म्हणून दुसऱ्या दिवशी बायारे व मंत्री एकत्र जमले आणि झारच्या नव्या सल्लागाराची ब्याद कशी नष्ट करावी ह्याचा विचार करू लागले. खूप खूप विचार केल्यानंतर एका म्हाताऱ्या सरदाराने सुचविले:

"त्या दारुड्या शिपुरड्याला बोलावून घेऊ या. अशा बाबतीत तो पूर्वीपासून तरबेज आहे."

दारूडा आला व झुकून नमस्कार करीत म्हणाला :

"माननीय मंत्री आणि बायारे मंडळी, मी तुम्हाला कशासाठी हवा आहे ते मला ठाऊक आहे. जर तुम्ही मला अर्धी बादली दारू दिलीत, तर झारच्या नव्या सल्लागाराची कशी वाट लावायची ह्याची युक्ती मी तुम्हाला सांगतो."

"बोल," बायारे आणि मंत्री म्हणाले, "आणि अर्धी बादली तुला मिळेल!"

सुरुवातीला त्यांनी त्याला प्यालाभर दारू दिली. दारुड्याने ती घुटक्यात संपवली व तो म्हणाला :

"आपला झार विधुर होऊन चाळीस वर्षे उलटली. तेव्हापासून अनेक वेळा त्यानं सुंदर राजकन्या आल्योनाचा अनुनय करण्याचा प्रयत्न केला, पण तो नेहमी अपयशी ठरला. तीनदा त्यानं तिच्या राज्यावर स्वारी केली, खूप सैनिक गमावले; पण बळाच्या जोरावरही तो तिला जिंकू शकला नाही. इवान छोटा–बुद्धीने मोठा ह्याला सुंदर राजकन्या आल्योनाकडं पाठवायला झारला सांगा. एकदा तो गेला म्हणजे कधीही परतणार नाही."

बायारांना आणि मंत्र्यांना धीर आला. सकाळ झाली तेव्हा ते झारकडे गेले.

"महाराज, असा सुरेख सल्लागार शोधण्यात तुम्ही किती चतुराई दाखवलीत! त्यानं आणलेल्या अद्भुत गोष्टी प्राप्त करणं काही सोपं काय नव्हतं! पण आता तो बढाई मारतोय की, सुंदर राजकन्या आल्योनाला पळवून तो तुमच्या पायांशी सादर करील!"

सुंदर राजकन्या आल्योनाचे नांव ऐकताच झार बेचैन बनला. अधीरतेने त्याने सिंहासनावरून खाली उडी मारली.

"काय सुरेख कल्पना!" झार ओरडला. "मला ही पूर्वी का सुचली नाही? सुंदर राजकन्या आल्योनाकडं धाडायला तोच एक माणूस योग्य आहे."

म्हणून त्याने आपल्या नव्या सल्लागाराला बोलावून घेतले.

"ताबडतोब तिप्पट-नऊ भूमीपलिकडच्या तिप्पट-दहा राज्यात जा आणि सुंदर राजकन्या आल्योना मला आणून दे!"

इवान छोटा–बुद्धीने मोठा उत्तरला :

"पण महाराज, ती काही आपो-आप वाजणारी गूस्ली नव्हे. अथवा नाचणारा हंस अगर बागडणारं मांजर नव्हे. तिला पोतडीत कोंबता येणार नाही. शिवाय, इथं येण्याची कदाचित तिची इच्छाही नसेल!"

पण झारने पाय आपटला, दाढी गदगदा हलविली आणि हात उडविले.

"माझ्याशी वाद घालू नको! मी काहीही ऐकून घेणार नाही. तुला हव्या त्या पद्धतीनं तिला आण. जर सुंदर राजकन्या आल्योनाला तू आणलंस, तर मी तुला एका शहरचा कारभार करायला देईन. त्या शहराभोवतालची सगळी जमीन तुझ्या सत्तेखाली राहील आणि तुझी मंत्रीपदावर नेमणूक करीन. पण जर तिला आणलं नाहीस, तर मी तुझं डोकं उडवीन!"

छोटचा इवानने झारचा निरोप घेतला तेव्हा तो खूप दुःखात गढला होता. त्याने सोनेरी आयाळीच्या घोडीला खोगीर चढविले. तिने त्याला विचारले:

"मालक, तुम्ही एवढे दुःखी आणि विचारात का आहात? काही संकट आलंय का तुमच्यावर? अथवा दुर्दैवाचा घाला पडलाय?"

"मोठं संकट नाही, पण आनंदी होण्यासारखंही काही नाही. सुंदर राजकन्या आल्योनाला आणून दे, अशी झारनं माझ्यावर कामगिरी टाकलीय. त्याने तीन वर्षं स्वतः तिचा अनुनय केला होता, पण त्याला यश आलं नाही. तिला जिंकण्यासाठी त्यानं तीन युद्धं केली, पण तो जिंकू शकला नाही. आणि मला तो एकटचाला पाठवतोय तिला आणायला!"

"हे काही फार अवघड काम नाही," सोनेरी आयाळीची घोडी म्हणाली. "मी तुम्हाला मदत करीन आणि आपण कसं तरी जमवू!"

छोटचा इवानने तयार व्हायला फारसा वेळ लावला नाही व लौकरच ते निघाले. लोकांनी त्याला शेवटचा पाहिला स्वार होताना – पण तो जाताना पाहण्याइतकी चपळता कुणापाशीही नव्हती.

किती दूरपर्यंत तो दौडत होता ते सांगणे अवघड आहे, पण शेवटी तो तिप्पट-दहा राज्यापर्यंत पोहोचला. एक भक्कम कुंपण त्याला आडवे आले. पण सोनेरी आयाळीच्या घोडीने अगदी सहजपणे त्या कुंपणावरून पलिकडे उडी घेतली आणि देखणा पोरगा झारच्या राखीव बागेत हजर झाला. मग सोनेरी आयाळीची घोडी म्हणाली:

"मी आता सोनेरी सफरचंदाची फळे असलेल्या झाडाचे रूप घेते आणि तुम्ही माझ्या शेजारी लपा. उद्या सुंदर राजकन्या आल्योना फिरायला येईल आणि सोनेरी सफरचंद तोडायची तिला इच्छा होईल. ती जवळ आली म्हणजे नुसतं भोवताली घोटाळू नका, तर तात्काळ तिला पकडा आणि मी जवळच तयार असेन. एकही मिनिट गमावू नका. माझ्यावर स्वार व्हा आणि आपण सुसाट पसार होऊ. मात्र ध्यानात ठेवा, जर घोटाळा केलात, तर आपल्या दोघांचंही मरण ओढवेल."

दुसऱ्या दिवशी सुंदर राजकन्या आल्योना बागेत फिरायला आली. तिने सोनेरी सफरचंदांचे झाड पाहिले आणि ती दायांना, मोलकरणींना, दासींना ओरडून म्हणाली:

"पहा किती सुंदर सफरचंदाचं झाड! आणि सगळी सफरचंदं सोनेरी! मी एक फळ तोडून आणीपर्यंत तिथंच थांबा!"

धावत ती झाडापाशी आली, तेवढ्यात छोटा इवान अचानक कुठूनतरी उडी मारून तेथे अवतीर्ण झाला आणि त्याने सुंदर राजकन्येचे हात पकडले. त्याच क्षणाला सफरचंदाच्या झाडाचे सोनेरी आयाळीच्या घोडीत रूपांतर झाले. घोडीने टापा जमिनीवर आपटल्या व त्याला घाई करायला लावली. देखणा पोरगा झेपावून स्वार झाला. दाया, मोलकरणी आणि दासींनी शेवटचे एवढेच पाहिले.

बायकांनी किंकाळ्या फोडल्या. रक्षक धावत आले. पण राजकन्येचा पत्ता लागेना. झारला जेव्हा ही वार्ता समजली तेव्हा त्याने चारही दिशांना पाठलागासाठी घोडेस्वार पाठवले. पण दुसऱ्याच दिवशी सगळे रिकाम्या हातांनी परतले. त्यांनी घोड्यांचा ऊर फुटेतो दौड केली होती, पण राजकन्या अथवा तिचे हरण करणारा इसम, ह्यांचे ओझरते दर्शनसुद्धा त्यांना घडले नव्हते.

दरम्यान इवान छोटा – बुद्धीने मोठा अनेक देश पार करून गेला होता.

अनेक सरोवरे आणि नद्या त्याने मागे टाकल्या होत्या.

आरंभी सुंदर राजकन्या आल्योनाने मुक्त होण्याची धडपड केली, पण मग तिने तो नाद सोडला व ती रडू लागली. थोडेसे ती रडायची, मग देखण्या मुलाकडे टक लावून पहायची, परत रडायची आणि परत पहायची. दुसऱ्या दिवसापासून त्याच्याशी तिने संभाषण सुरू केले.

"हे अनोळखी, तू कोण आहेस आणि कुठून आलास? तुझी जन्मभूमी कुठं आहे? तुझे नातेवाईक कोण आहेत? आणि तुला काय नांवानं हाक मारतात?"

"माझं नांव इवान आणि लोक मला इवान छोटा – बुद्धीने मोठा म्हणून हाक मारतात. मी अमूक अमूक झारच्या राज्यात राहतो. माझे आई-वडील शेतकरी आहेत."

"इवान छोटा – बुद्धीने मोठा, मला सांग: तू माझं हरण स्वतःसाठी केलंस अथवा दुसऱ्या कुणाच्या हुकूमांवरून केलंस?"

"झारनं मला हुकूम दिला होता तुला आणायचा," तो म्हणाला.

सुंदर राजकन्या आल्योनाने हात झटकले व ती ओरडली:

"त्या मूर्ख म्हाताऱ्याशी आयुष्यात कधीही मी लग्न करणार नाही! तीन वर्षं त्यानं माझी मनधरणी केली, पण त्याला ते जमलं नाही. माझ्या राज्याविरुद्ध त्यानं तीन युद्धं केली, अनेक सैनिक गमावले, पण तो मला जिंकू शकला नाही आणि आताही त्याला माझा लाभ होणार नाही."

हे शब्द ऐकून देखणा मुलगा मनोमनी खूष झाला, पण तो काहीही बोलला नाही. फक्त त्याने स्वतःशी विचार केला:

"अशी बायको जर मला मिळाली असती तर किती छान झालं असतं!"

हळू हळू त्याची मायभूमी त्याच्या दृष्टीपथात आली. म्हातारा झार हे सगळे दिवस छोट्या इवानची वाट पहात खिडकीत बसून होता. देखणा पोरगा शहराच्या जवळ आला तेव्हा झार एव्हाना राजवाड्याच्या प्रवेशद्वाराशी त्याच्या स्वागताला उभा होता. छोटा इवान राजवाड्याच्या पटांगणात प्रवेशला आणि झार तात्काळ धावत पायऱ्या उतरून गेला व सुंदर आल्योनाला त्याने घोडीवरून उचलले आणि तिचे शुभ्र हात धरले.

"ही सगळी वर्षं," झार म्हणाला, "मी माझी माणसं पाठवत होतो,

मी स्वत: तुझी मनधरणी करायला आलो आणि तू मला नेहमी नकार दिलास. पण ह्यावेळी तुला माझ्याशी लग्न करावंच लागेल."

आल्योनाने किंचित स्मित करून म्हटले:

"महाराज, प्रथम मला प्रवासाचा शीण घालविण्यासाठी विश्रांतीची परवानगी द्या आणि नंतर लग्नाची बोलणी सुरू करा."

झार लगाबगीने तिच्या विश्रांतीची व्यवस्था करू लागला. त्याने सर्व दासींना, दायांना, मोलकरणींना हाका मारल्या:

"माझ्या खास पाहुणीची सर्व व्यवस्था केलेली आहे ना?"

"केव्हाची तयारी झालीय, महाराज!"

"ठीक. ध्यानात ठेवा, तुमची ती झारीत्सा होणार आहे. तेव्हा तिच्या सर्व आज्ञा पाळा आणि तिच्या सेवेत मुळीच कसूर ठेवू नका."

मग दासींनी राजकन्येला तिच्या महालात नेले. इवान छोटा – बुद्धीने मोठा झाला झार म्हणाला:

"शाबास इवान! ह्या सेवेबद्दल मी तुझी माझा पंतप्रधान म्हणून नेमणूक करतो आणि तीन शहरं भोवतालच्या सर्व ज़मिनींसकट तुला इनाम देतो."

एक दिवस उलटला, दुसरा उलटला आणि झार अधिक अस्वस्थ बनला. लग्नाला तो अगदी उतावीळ झाला होता. म्हणून सुंदर राजकन्या आल्योनापाशी जाऊन तो म्हणाला:

"कोणत्या दिवशी आपण पाहुण्यांना बोलवायचं? आणि चर्चमध्ये आपण केव्हा जायचं?"

पण ती उत्तरली:

"माझी विवाहाची अंगठी आणि घोडागाडी नसताना मी लग्न कशी करणार?"

"एवढीच अडचण असेल," झार म्हणाला, "तर माझ्या राज्यात चिक्कार घोडागाड्या आहेत आणि अंगठ्या आहेत. अगदी उत्तमोत्तम. पण तुला त्यात जर काही पसंत पडलं नाही, तर सागरापार दूत पाठवून तुझ्या वस्तू आपण मागवून घेऊ."

"नाही महाराज, माझ्या स्वत:च्या गाडीशिवाय दुसऱ्या गाडीतून मी चर्चला जाणार नाही आणि माझ्या स्वत:च्या अंगठीविना मी लग्न करणार नाही."

तेव्हा झारने विचारले.

"तुझी लग्नाची अंगठी आणि तुझी गाडी कुठं आहेत ?"

"माझी अंगठी माझ्या प्रवासी पेटीत आहे आणि माझी प्रवासी पेटी माझ्या गाडीत आहे, आणि माझी गाडी बूयान बेटापाशी खोल समुद्रात आहे. तिथून माझी लग्नाची अंगठी आणि गाडी आणीपर्यंत लग्नाचा विषय न काढलेला बरा !"

झारने मुकुट उतरविला व डोक्याची मागील बाजू कराकरा खाजविली.

"पण समुद्राच्या तळामधून तुझी गाडी मी कशी आणणार ?"

"ती चिंता माझी नव्हे. तुम्हाला हवं ते करा."

आणि ताडकन ती स्वतःच्या महालात निघून गेली.

झार एकटाच बसून राहिला. बराच वेळपर्यंत बसून त्याने खूप खूप विचार केला व शेवटी त्याला इवान छोटा – बुद्धीने मोठा ह्याची आठवण झाली.

"अंगठी आणि गाडी ह्या वस्तू मला केवळ तोच आणून देऊ शकेल !" झारच्या मनात आले.

त्याने तात्काळ छोटचा इवानला बोलावून घेतले व त्याला तो म्हणाला :

"माझ्या निष्ठावंत सेवका, इवान छोटा – बुद्धीने मोठा, मी काय सांगतो ते ऐक. आपोआप वाजणारी गूस्ली, नाचणारा हंस आणि बागडणारं मांजर फक्त तूच मला मिळवून देऊ शकलास. सुंदर राजकन्या आल्योना तूच मला आणून दिलीस. आता माझ्यासाठी तिसरी कामगिरी कर – तिची लग्नाची अंगठी आणि गाडी आणून दे. अंगठी तिच्या प्रवासी पेटीत आहे, प्रवासी पेटी तिच्या गाडीत आहे आणि तिची गाडी बूयान बेटाजवळ समुद्राच्या तळाशी आहे. ह्या वस्तू तू मला आणून दिल्याच पाहिजेत. तू मला अंगठी आणि गाडी आणून दिलीस, तर मी तुला माझ्या राज्याचा तिसरा हिस्सा देईन."

इवान छोटा – बुद्धीने मोठा म्हणाला :

"पण महाराज, मी देवमासा आहे का ? तिच्या अंगठीसाठी आणि गाडीसाठी मी समुद्राच्या तळाशी कसा जाणार ?"

झार संतापला, त्याने पाय आपटले व तो ओरडला :

"आता तसली बकबक बंद ! इथं झार कोण आहे ? तू अथवा मी ? हुकूम देणं माझं काम आहे आणि हुकूम पाळणं हे तुझं काम आहे ! वस्तू

आण, म्हणजे इनाम मिळेल. आणि आणल्या नाहीस, तर तुझं डोकं उडवीन!"

छोटा इवान तबेल्यात गेला. त्याने सोनेरी आयाळीच्या घोडीवर खोगीर चढविले. तिने विचारले:

"मालक, खूप दूर निघाला आहात?"

"अजून मला माहीत नाही, पण मला गेलंच पाहिजे एवढं मात्र खरं! राजकन्येची अंगठी आणि गाडी आणून देण्याचा झारनं मला हुकूम दिलाय. अंगठी तिच्या प्रवासी पेटीत आहे, तिची प्रवासी पेटी तिच्या गाडीत आहे, तिची गाडी बूयान बेटापाशी समुद्राच्या तळाशी आहे आणि तिथं आपण निघालो आहोत."

सोनेरी आयाळीची घोडी म्हणाली:

"आपण आजवर केलेल्या कामगिरींपेक्षा ही कामगिरी जास्त अवघड जाईल. इथून अंतर फार दूर नाही, पण ह्या कामगिरीचा शेवट चांगला न होण्याची शक्यता आहे. गाडी कुठं उभी आहे ते मला माहीत आहे, पण ती मिळवणं सोपं नाही. मी स्वतः समुद्राच्या तळाशी जाईन, स्वतःला गाडीला जुंपून घेईन आणि गाडी खेचून आणीन. जर समुद्रघोडचांनी मला पकडलं नाही तर मी सुरक्षित राहीन, पण जर त्यांनी पकडलं तर मात्र माझं अथवा गाडीचं तुम्हाला कधीही दर्शन होणार नाही."

इवान छोटा – बुद्धीने मोठा विचारात पडला. त्याने खूप खूप विचार केला. शेवटी त्याला मार्ग सुचला. मग तो झारपाशी गेला.

"महाराज," तो म्हणाला, "मला बारा बैलांच्या कातडी पाहिजेत, बारा पूड डांबर फासलेला दोरखंड पाहिजे, बारा पूड डांबर आणि एक कढई पाहिजे."

"तुला हवं ते काहीही आणि कितीही घे," झार म्हणाला. "फक्त काम लौकर पार पाड!"

तर देखण्या पोराने एका गाडीत बारा बैलांची कातडी, दोरखंड आणि डांबराची मोठी कढई लादली, घोडी त्या गाडीला जुंपली व तो निघाला.

काही वेळाने ते सागरकिनाऱ्यापाशी झारच्या राखीव कुरणांमध्ये आले. येथे त्याने घोडीवर बैलांच्या कातडी पांघरल्या व दोरखंडाने त्या कातडी घट्ट बांधल्या.

"जरी समुद्रघोडचांच्या तू दृष्टीला पडलीस, तरी ह्या कातडींमधून

तुला ते लौकर चावू शकणार नाहीत."

त्याने बाराच्या बारा कातडी गुंडाळल्या आणि बाराच्या बारा पूड दोरखंड बांधायला वापरला. मग डांबर गरम करून बाराच्या बारा पूड डांबर वरती ओतले.

"आता समुद्रघोड्यांची भीती बाळगायचं मला कारण नाही," सोनेरी आयाळीची घोडी म्हणाली. "इथं कुरणांवर बैस आणि तीन दिवस माझी वाट पहा. तुझी गूस्ली वाजव आणि अजिबात डोळे मिटू नको."

तिने समुद्रात बुडी मारली व ती पाण्याखाली दिसेनाशी झाली.

इवान छोटा – बुद्धीने मोठा समुद्रकिनाऱ्यावर एकटाच बसला. एक दिवस उलटला – दुसरा दिवस गेला आणि अजूनही तो टक्क जागा होता. गूस्ली वाजवीत आणि समुद्राकडे निरखून पहात वेळ काढीत होता. पण तिसऱ्या दिवशी त्याला पेंगुळल्यासारखे वाटू लागले – झोप येऊ लागली. गूस्लीसुद्धा मदत करीना. न झोपण्याची त्याने खूप धडपड केली, पण अखेरीस तो झोपेला शरण गेला.

तो फार काळ झोपला नाही, अथवा फार काळ झोपलाही असेल, पण एकदम त्याला टापांचा आवाज ऐकू आला व त्याने वर पाहिले. पाहतो तो त्याची घोडी किनाऱ्यावर उडी मारून येत होती व मागून गाडी खेचून



आणीत होती. तिच्या दोन्ही अंगांना सोनेरी आयाळीचे सहा समुद्रघोडे घट्ट बिलगले होते.

इवान छोटा – बुद्धीने मोठा घोडीला भेटायला पुढे धावला. सोनेरी आयाळीची घोडी म्हणाली :

"जर तुम्ही मला बैलांच्या कातड्यांमध्ये गुंडाळलं नसतं, त्यांना दोरखंड बांधून डांबर थापलं नसतं, तर आता तुम्ही मला कधीही पाहिलं नसतं. त्या समुद्रघोड्यांच्या आख्ख्या कळपानं माझ्यावर हल्ला केला. नऊ कातड्यांचे त्यांनी तुकडे तुकडे केले आणि दुसऱ्या दोन कातडीही फाटल्या. आणि ह्या सहा समुद्रघोड्यांनी दोरखंडांमध्ये आणि डांबरात एवढ्या जोरात दात खुपसले की, त्यांना मोकळं होताच येईना. पण ते ठीक आहे. त्यांचा तुम्हाला उपयोग होईल."

तेव्हा देखण्या मुलाने समुद्रघोड्यांना लगाम घातले, हाती चाबूक धरला आणि त्यांना वठणीवर आणायला आरंभ केला. त्यांना चाबूक मारताना तो म्हणत होता :

"मालक म्हणून माझा स्वीकार कराल की नाही? माझे हुकूम ऐकाल? ऐकलं नाहीत तर तुम्हाला जिवंत सोलून काढीन आणि तुमचे देह लांडग्यांपुढं फेकून देईन!"

समुद्रघोड्यांनी गुडघे टेकले व दयेची याचना केली :

"देखण्या मुला, आम्हाला आणखी मारू नकोस. आम्ही तुझा प्रत्येक शब्द पाळू, तुझी इमानानं सेवा करू आणि तुझ्यावर संकट आलं, तर तुला मदत करू."

तेव्हा इवानने त्यांना मारणे बंद केले आणि सातही जणांना गाडीला जुंपून तो झारच्या दारापाशी थडकला. आपल्या घोडीला व समुद्रघोड्यांना, त्याने तबेल्यात नेऊन बांधले आणि तो स्वतः झारकडे गेला.

"महाराज, खालच्या अंगणात गाडी उभी आहे आणि सर्व हुंडा गाडीत आहे."

पण झारने त्याचे साधे आभारसुद्धा मानले नाही. तो तडक गाडीपाशी धावत गेला, त्याने पेटी उचलली व सुंदर राजकन्या आल्योनापाशी ती पेटी झार घेऊन गेला.

"आल्योना, सुंदर राजकन्ये, तुझ्या सर्व इच्छा आणि लहरी मी पूर्ण

केल्या आहेत. ही तुझी अंगठी आणि पेटी. तुझी गाडी खाली उभी आहे. आता सांग, आपण लग्न केव्हा करायचं? कोणत्या दिवशी पाहुण्यांना बोलवायचं?"

पण सुंदर राजकन्या उत्तरली:

"मी लग्न करीन आणि लौकरच आपला विवाहसमारंभ होईल. पण आपल्या विवाहदिवशी तू असा म्हातारा आणि पांढऱ्या केसांचा दिसलेला मला आवडणार नाही. लोक काय म्हणतील? नक्कीच ते आपल्याला हसतील: 'बघा, हा पांढऱ्या केसांचा म्हातारा तरुण पोरीशी लग्न करतोय! म्हाताऱ्या नवऱ्याची तरुण बायको त्याला सोडून कुणाचंही स्वागत करते हे त्याला माहीत नाही?' आणि कुचाळक्या करणारी तोंडं बंद करणं अवघड असतं हे तुला माहीतच आहे. आपण लग्न करण्यापूर्वी तू अधिक तरुण बनलास, तर सर्व काही ठीक होईल."

झार म्हणाला: "अधिक तरुण व्हायला मी एका पायावर तयार आहे. पण कसं व्हायचं ते मला तू शिकव. आमच्या राज्यात पूर्वी असं घडल्याचं कुणी कधी ऐकलेलं नाही.".

तेव्हा सुंदर राजकन्या आल्योनाने झारला सांगितले.

"तीन प्रचंड तांब्याच्या कढया आण. एका कढईत फक्त दूध भर आणि दुसऱ्या दोन कढयांमध्ये झऱ्याचं पाणी. दुधाची कढई आणि पाण्याची एक कढई तापवायच्या. त्या उकळायला लागल्या म्हणजे प्रथम दुधात उडी मार, नंतर गरम पाण्यात उडी मार आणि शेवटी थंड पाण्यात उडी मार. अशा रीतीनं तीनही कढयांमधून तू आपलं संपूर्ण अंग बुचकळून काढलंस, म्हणजे बाहेर पडशील तेव्हा विशीतल्या देखण्या तरुणात तुझं रूपांतर झालेलं असेल."

"पण मला भाजणार नाही?" झारने विचारले.

"माझ्या राज्यात मुळी म्हातारी माणसंच नाहीत. प्रत्येकजण असे उपचार करून घेतो आणि आजवर कधी कुणाला भाजलेलं नाही."

आल्योनाच्या सांगण्यानुसार झारने सर्व जय्यत व्यवस्था केली. पण दूध आणि पाणी जेव्हा रटारटा उकळू लागले तेव्हा त्याला त्यात उडी मारायचा धीर होईना. तो घाबरला, सारखा कढयांभोवती चकरा मारू लागला. अचानक त्याने स्वतःच्या कपाळावर हात मारला:

"अरे कसला विचार करतोय मी? इवान छोटा – बुद्धीने मोठा प्रथम स्नान करील आणि मग मी पाहीन. जर सर्व ठीक असेल, तर मी स्वतः बुडी मारीन. जर ठीक नसलं, तर तो भाजून निघेल. त्याच्यासाठी रडायलाही कुणी नाही. त्याचे सगळे घोडे माझ्या मालकीचे होतील आणि मी त्याला कबूल केल्याप्रमाणं माझ्या राज्याचा वाटाही त्याला द्यावा लागणार नाही."

म्हणून त्याने इवान छोटा – बुद्धीने मोठा ह्याला पाचारण केले.

"काय पाहिजे महाराज आपल्याला? मी नुकताच प्रवासातून आलोय आणि मला विश्रांतीची गरज आहे ह्याची तुम्हाला कल्पना असली पाहिजे."

"मी तुला फार काळ थांबवून धरणार नाही. फक्त ह्या तीन कढयांमध्ये बुचकळ्या मार आणि नंतर विश्रांतीला जा."

छोटया इवानने कढयांमध्ये डोकावून पाहिले. दुधाची आणि पाण्याची अशा दोन कढया उकळत होत्या. फक्त तिसऱ्या कढईतील पाणी थंड आणि शांत होते.

"महाराज, मला जिवंतपणी उकळायची तुमची इच्छा आहे काय?" त्याने विचारले. "माझ्या प्रामाणिक सेवेचं तुम्ही मला हे इनाम देता काय?"

"अरे तसं नाही इवान. जर म्हाताऱ्या माणसानं त्यांच्यात स्नान केलं तर तो विशीतला सुंदर तरुण बनतो."

"पण महाराज, मी कुठं म्हातारा आहे? आणि आणखी तरुण बनण्याची मला गरज नाही."

झारचा संयम सुटत चालला.

"अरेच्चा, कसला वितंडवादी माणूस आहेस रे तू! नेहमी वाद घालतोस! जर तू स्वेच्छेनं बुडी मारली नाहीस तर मी तुझ्यावर सक्ती करीन. मला वाटतं, तुला खोड्यात अडकवलं पाहिजे!"

पण तेवढ्यात सुंदर राजकन्या आल्योना आपल्या महालामधून धावत तेथे आली. तिने संधी साधून हळूच छोटया इवानच्या कानात सांगितले:

"तू बुडी मारण्यापूर्वी तुझ्या सोनेरी आयाळीच्या घोडीला कळव. मग न भिता स्नान करू शकशील."

आणि झारला ती म्हणाली:

"मी सांगितल्याप्रमाणं तू सगळी व्यवस्था केलीस अथवा नाही हे पहायला

मी आल्ये होते." तिने कढयांमध्ये वाकून पाहिले.

"अगदी सांगितल्याप्रमाणं सगळी व्यवस्था आहे," ती म्हणाली. "आता तू स्नान कर आणि लग्नाच्या तयारीसाठी मी तात्काळ जाते."

ती तडक आपल्या महालात निघून गेली.

छोटचा इवानने झारकडे एक दृष्टीक्षेप टाकीत म्हटले:

"ठीक आहे. तुम्हाला आणखी एकदाच आणि अखेरच्या वेळी खूष करतो. कुणीही दोनदा मरत नाही, पण एका मरणाला कुणीही फसवू शकत नाही. माझ्या सोनेरी आयाळीच्या घोडीला शेवटचं पाहण्याची मला परवानगी द्या. कदाचित तिच्याशी माझी ही अखेरची भेट असेल. आम्ही दोघांनी आजवर कितीतरी एकत्र प्रवास केलाय."

"जा, पण फार वेळ लावू नको."

छोटा इवान तबेल्यात गेला आणि घोडीला व समुद्रघोडयांना त्याने सर्व हकीकत सांगितली.

"जेव्हा आम्ही तीनदा फुरफुर आवाज करू," घोडे म्हणाले, "तेव्हा बुडी मार आणि कसलीही भीती बाळगू नको."

मग इवान परत झारकडे गेला.

"महाराज, आता मी तयार आहे," तो म्हणाला. "याच क्षणाला मी बुडी मारतो." तेवढयाच त्याला घोडयांची फुरफुर तीनदा ऐकू आली: एक, दोन, तीन – डुबुक! – गरम दुधात देखणा मुलगा गेला. मग तो बाहेर उडी मारून आला आणि गरम पाण्यात त्याने बुडी मारली. शेवटी त्याने गार पाण्यात बुचकळी मारली. तिसऱ्या कढईमधून तो बाहेर पडला तेव्हा पहाटेच्या आकाशाप्रमाणे अत्यंत सुंदर दिसत होता. त्याचे सौंदर्य अतुलनीय होते.

झारने हे सर्व पाहिले आणि त्याच्या मनातील चलबिचल थांबली. ताबडतोब तो वर चढला आणि त्याने गरम दुधात उडी मारली! तेथे तो उकळून मेला!

सुंदर राजकन्या आल्योना लगबगीने पटांगणात आली. आपल्या शुभ्र हातांनी तिने छोटचा इवानला जवळ धरले व त्याच्या बोटात आपली अंगठी सरकवली. मग छोटेसे स्मित करीत ती म्हणाली:

"झारच्या आज्ञेनुसार तू मला पळवून आणलंस, पण आता तो जिवंत

व्हा तुझ्या इच्छेप्रमाणं तू वागू शकतोस. तुझी इच्छा
ा ने आणि तसं नको असलं तर मला स्वत:पाशी ठेवून
ान छोटा – बुद्धीने मोठा ह्याने तिचे शुभ्र हात पकडले, ि
ी व स्वत:ची अंगठी तिच्या बोटात सरकवली.

नंतर लौकरच त्याने आपल्या खेड्यात दूत पाठविले व
णि भावांना लग्नाच्या मेजवानीला बोलावून घेतले. थोड्य
वणे तरुण – छोट्या इवानचे भाऊ – आणि त्याचे आई-व
येऊन दाखल झाले.

ठा विवाहसोहळा झाला, मेजवानी झाडली. छोट्या इवान
ीसह संसार सुरू केला. ते सुखाने जगू लागले व आप
काळजी घेऊ लागले.



सीमेओन सात – कामगार सात

कोणे एके काळी रहात होते सात भांऊ, सात सीमेओन – सात कामगार.

एकदा ते शेतात नांगरायला गेले. गव्हाची पेरणी करायला गेले. नेमक्या त्याच वेळी तेथून झार चालला होता. झारबरोबर त्याचे सरदार-उमराव होते. झारने शेतात काम करणाऱ्या सात भावांना पाहिले तेव्हा त्याला नवल वाटले.

"हा काय प्रकार?" झार म्हणाला. "एकाच शेतात सात नांगरे, सर्वांची उंची सारखी आणि तोंडवळाही सारखा. हे कोण कामगार आहेत ह्याबद्दल माहिती करून घ्या."

झारचे सेवक ताबडतोब धावले आणि सात सीमेओनना – सात कामगारांना – झारपाशी घेऊन आले.

"काय रे, उत्तर द्या," झार म्हणाला, "तुम्ही कोण आहात आणि काय काम करता?"

त्या तरुणांनी झारला उत्तर दिले:

"आम्ही सात भाऊ, सात सीमेओन, सात कामगार. आमच्या वडलांची आणि आजोबांची जमीन आम्ही नांगरतोय, शिवाय आमच्यापैकी प्रत्येकजणाला एकेक स्वतंत्र धंदा शिकवलेला आहे."

"अस्सं, कुणाला कोणता धंदा शिकवलाय?" झारने विचारले.

सर्वात मोठा भाऊ म्हणाला:

"मी जमिनीपासून आकाशापर्यंत उंच लोखंडी खांब उभारू शकतो."

दुसरा म्हणाला:

"मी त्या खांबावर चढून सर्व दिशांना न्याहाळू शकतो, कुठं काय

चाललंय पाहू शकतो."

"मी," तिसरा म्हणाला, "सीमेओन दर्यावर्दी. फटाफट गलबत बांधतो, समुद्रावर संचार करतो आणि पाण्याखालीसुद्धा फिरू शकतो."

"मी," चौथा म्हणाला, "सीमेओन धनुर्धारी. उडती माशी बाणानं मारतो."

"मी – सीमेओन खगोलशास्त्रज्ञ. तारे मोजतो, एकही चुकवत नाही."

"मी सीमेओन शेतकरी. एका दिवसात नांगरणी, पेरणी करून पीक गोळा करतो."

"आणि तू काय करतोस?" झारने सर्वात धाकटचा सीमेओनला विचारले.



"झार-बाप्पा, मी नाचतो आणि गातो, अलगुज वाजवतो."

झारचा सरदार तुच्छतेने म्हणाला:

"झार-बाप्पा, कामगार आपल्याला उपयोगी आहेत, पण नुसता नाचणारा-गाणारा माणूस मुळीच नको! असे लोक भुईला भार! निष्कारण पाव गिळतात आणि क्वास ढोसतात!"

"बरोबर असेल तुमचं," झार म्हणाला.

सर्वात धाकटचा सीमेओनने झारला नम्रपणे मुजरा करून म्हटले:

“झार-बाप्पा, मला माझी कला दाखवायची परवानगी दे, शिंगावर गाणं वाजवायला परवानगी दे.”

“ठीक आहे,” झार म्हणाला, “एकदा शेवटचं वाजवून घे आणि माझ्या राज्यातून चालता हो!”

सर्वात धाकटचा सीमेओनने भोजाचे शिंग घेतले आणि रशियन नाचाचे संगीत तो वाजवू लागला. ते संगीत ऐकताच तेथे हजर असलेला प्रत्येक माणूस नाचू लागला, उडचा मारू लागला. झार नाचत होता, त्याचे उमराव नाचत होते, पहारेकरीही नाचत होते. तबेल्यांमधले घोडे थयथया नाचू लागले. गोठ्यांमधल्या गायी ताल धरू लागल्या. कोंबडे-कोंबडचा बागडू लागल्या. पण सरदार सर्वात जोराने नाचत होता. त्याच्या चेहऱ्यावरून घामाच्या धारा वाहात होत्या, त्याची दाढी थरथरत होती, डोळ्यांमधून आसवे गळत होती. तेवढ्यात झार ओरडला:

“वाजवणं पुरे कर! आता आणखी नाचवत नाही, आता अधिक बळ नाही!”

सर्वात धाकटा सीमेओन म्हणाला :

"भल्या माणसांनो, तुम्ही विश्रांती घ्या. पण सरदारा, तुझ्या दुष्ट जिभेबद्दल, तुझ्या वाईट नजरेबद्दल, आणखी नाचत राहशील."

सगळे लोक शांत उभे राहिले, फक्त एकटा सरदार नाचत होता. तो एवढा नाचला की, शेवटी त्याचे पाय हलेनात आणि तो खाली को[illegible] मासा वाळवंटात तडफडावा तसा तो जमिनीवर तडफडत होता. सर्वात सीमेओनने शिंग बाजूला फेकले.

"पाहिलात माझा धंदा!" तो म्हणाला.

झार हसला, पण सरदार मात्र संतापाने लाल झाला होता. [illegible]ने अपमानाचा सूड घेण्याचे मनाशी ठरविले.

"अरे सर्वात मोठ्या सीमेओन, तुझं कसब दाखव!" झार म्हणाला.

सर्वात मोठ्या सीमेओनने पंधरा पूड* वजनाचा हातोडा घेतला आणि जमिनीपासून आकाशापर्यंत पोहोचणारा लोखंडी खांब घडविला. दुसरा सीमेओन त्या खांबावर पटकन चढला आणि सर्व दिशा न्याहाळू लागला. झारने ओरडून विचारले :

"बोल : काय दिसतंय?"

दुसरा सीमेओन उत्तरला :

"समुद्रावर गलबतं फिरताना दिसताहेत. शेतात गहू पिकताना दिसतोय."

"आणखी काय दिसतंय?"

"महासागरावरच्या बूयान बेटावरल्या सोनेरी राजवाड्यात रूपवान येलेना खिडकीत बसली आहे, रेशमी गालीचा विणतेय."

"ती कशी आहे?" झारने विचारले.

"तिच्या रूपाचं वर्णन परीकथेत सांगता येणार नाही, लेखणीनं लिहिता येणार नाही. तिनं चंद्रकोरीच्या आकाराचा मुकुट डोक्यावर घातलाय आणि प्रत्येक केसात मोती माळलाय."

रूपवान येलेनाला स्वतःची बायको बनविण्याची झारला इच्छा झाली. तिच्याकडे लग्नाची मागणी घालायला आपला दूत पाठविण्याची त्याची इच्छा

---

* १ पूड – १६ किलोग्राम – अनु.

होती. दुष्ट सरदार झारचे कान फुंकू लागला:

"झार-बाप्पा, रूपवान येलेनाला मागणी घालण्यासाठी ह्या सात सीमेओनना पाठव. ते कसबी आहेत. जर रूपवान राजकन्येला त्यांनी इथं आणलं नाही, तर ह्या सातहीजणांची मुंडकी उडवून वध करण्याचा हुकूम दे."

"ठीक आहे, पाठवतो त्यांना!" झार म्हणाला.

रूपवान येलेनाला घेऊन येण्याचा त्याने सात सीमेओनना हुकूम केला म्हणाला: "नाही आणलंत, तर माझी तलवार तुमची मुंडकी धडापासून वेगळी करील!"

आता काय करणार? दर्यावर्दी सीमेओनने धारदार कुऱ्हाड हाती घेतली आणि खटाखट एक गलबत तयार केले. गलबताला सुसज्ज बनवून पाण्यात सोडले. गलबतात वेगवेगळा माल भरला, मौल्यवान नजराणे घेतले. भावांवर नजर ठेवण्यासाठी झारने दुष्ट सरदाराला त्यांच्याबरोबर जाण्याची आज्ञा केली. दुष्ट सरदाराचा चेहरा भीतीने पांढरा पडला, पण झारची आज्ञा ऐकणे भाग होते. जर दुसऱ्यांसाठी त्याने खड्डा खणला नसता, तर स्वतः त्यात तो पडला नसता.

ते गलबतामध्ये बसले, शिडे फडफडू लागली, लाटा आदळू लागल्या. त्यांचे गलबत महासागरामधील बूयान बेटाच्या दिशेने निघाले.

त्यांचा प्रवास किती काळ चालला ते माहीत नाही, पण अखेरीस ते परकी राज्यात जाऊन पोहोचले. रूपवान येलेनाची त्यांनी भेट घेतली, तिला मौल्यवान नजराणे दिले आणि झारची लग्नाची मागणी तिला सांगितली.

रूपवान येलेनाने नजराणे स्वीकारले. त्यांना ती निरखून पहात होती, तेवढ्यात दुष्ट सरदार तिच्या कानात पुटपुटला:

"रूपवान येलेना, तू लग्नाला कबूल होऊ नको. झार म्हातारा आहे, दुबळा आहे. त्याच्या राज्यात लांडगे आरोळ्या मारतात, अस्वलं भटकतात."

रूपवान येलेना संतापली आणि मागणी घालायला आलेल्या सोयरीकवाल्यांना तिने हाकलून दिले. आता काय करायचे?

"बंधूनो," सर्वात धाकटा सीमेओन म्हणाला, "तुम्ही गलबतावर जा, शिडं उभारा, प्रवासाची तयारी करा, खाण्याच्या वस्तूंचा साठा घ्या. राजकन्येला आणण्याची जबाबदारी माझी!"

सीमेओन शेतकऱ्याने समुद्राची वाळू एका तासात नांगरली, रायची पेरणी केली, पीक कापले, सबंध प्रवासात पुरतील एवढे पाव भाजले. गलबत सुसज्ज करण्यात आले, सर्वात धाकट्या सीमेओनची सगळे वाट पाहू लागले.

सर्वात धाकटा सीमेओन राजवाड्यात गेला. रूपवान येलेना खिडकीपाशी सून रेशमी गालीचा विणत होती. खिडकीखालच्या बाकड्यावर सर्वात धाकटा सीमेओन बसला व असे म्हणाला:

"तुमच्या महासागरावरल्या बूयान बेटावर रहायला छान आहे, पण मायभू रूसमध्ये इथल्यापेक्षा जास्त छान आहे! आमच्याकडं कुरणं हिरवीगार, नद्या निळ्याशार! आमची मैदानं असीम, भोजाची झार पांढरीशुभ्र, कुरणांमध्ये फुलं आकाशी रंगाची. आमच्याकडं पहाटेची संध्याकाळशी भेट होते, आकाशात चंद्र ताऱ्यांची राखण करतो. आमच्याकडं दव मधासारखं गोड, आमचे झरे रुपेरी. सकाळी गुराखी हिरव्या कुरणात जातो, भोजाचं

शिंग वाजवतो आणि तुमची इच्छा असो व नसो. तुम्ही त्याच्या मागून चालू लागता ..."

सर्वात धाकटा सीमेओन भोजाचे शिंग वाजवू लागला. रूपवान येलेना सोनेरी उंबरठा ओलांडून बाहेर पडली. सीमेओन शिंग वाजवीत बागेतून चालू लागला आणि रूपवान येलेना त्याच्या पाठोपाठ जाऊ लागली. सीमेओनने बाग ओलांडली – तिने बाग ओलांडली. सीमेओनने कुरण ओलांडले – तिने कुरण ओलांडले. सीमेओन वाळूवरून चालू लागला – ती वाळूवरून चालू लागली. सीमेओन गलबतात चढला – ती गलबतात चढली.

सीमेओन बंधूंनी ताबडतोब फळी ओढून घेतली, गलबत वळविले आणि निळ्या सागरामधून ते निघाले.

सीमेओनने शिंग वाजविणे थांबविले. तात्काळ रूपवान येलेना भानावर आली. तिने पाहिले–सभोवार सर्वत्र महासागर आणि बूयान बेट दूर राहिलेले. रूपवान येलेनाने देवदारी तक्तपोशीवर स्वतःला झोकून दिले. तिचे निळ्या तारकेत रूपांतर झाले व ती आकाशात उडाली. इतर ताऱ्यांच्या गर्दीत मिसळून गेली. तेव्हा खगोलशास्त्रज्ञ सीमेओन धावला, आकाशातील सर्व तारे त्याने मोजले आणि नवी तारका शोधून काढली. मग धनुर्धारी सीमेओन पुढे सरसावला आणि त्याने नव्या तारकेवर सोनेरी बाण मारला. तारका गलबताच्या देवदारी तक्तपोशीवर येऊन आदळली, तिचे परत रूपवान येलेनामध्ये रूपांतर झाले.

सर्वात धाकटा सीमेओन तिला म्हणाला:

"राजकन्ये, आमच्यापासून दूर पळू नकोस. आमच्यापासून लपून राहणं अशक्य. जर आमच्याबरोबर जलप्रवास करायचा तुला एवढा त्रास वाटत असेल, तर आम्ही तुला तुझ्या घरी पोहचवतो. खुशाल झार आमची मुंडकी उडवो!" रूपवान येलेनाला सर्वात धाकट्या सीमेओनची दया आली.

"गायक-सीमेओना, माझ्यापायी तुझा शिरच्छेद घडू देणार नाही. त्यापेक्षा म्हाताऱ्या झारकडं तुमच्याबरोबर गलबतामधून जाईन."

अशा रीतीने त्यांनी एक दिवस प्रवास केला, दुसरा दिवसही प्रवासात घालविला. सर्वात धाकटा सीमेओन राजकन्येपासून एक पाऊलसुद्धा दूर जात नव्हता, रूपवान येलेना त्याच्यावर खिळविलेली नजर क्षणभरही ढळवीत नव्हती.

पण दुष्ट सरदाराच्या ध्यानात ही गोष्ट आली व त्याने कपटी डाव मनाशी रचला. एव्हाना घर जवळ आले होते, किनारा दिसू लागला होता. सरदाराने भावांना डेकवर बोलाविले आणि मधुर मद्याचे चषक दिले.

"बंधूंनो, आपल्या मायभूमीच्या नांवानं पिऊ या!" तो म्हणाला.

बंधू मधूर मद्य प्यायले, त्यांना झिंग चढली आणि डेकवर ते अस्ताव्यस्त गाढ झोपी गेले. आता त्यांना ना मेघगर्जना उठवू शकत होती, ना वादळ, ना आईचे अश्रू. त्या मद्यामध्ये झोपेचे औषध मिसळलेले होते.

फक्त रूपवान येलेना व सर्वात धाकटा सीमेओन ते मद्य प्यायली नव्हती.

अशा रीतीने ते मायदेशाला पोहोचले. मोठे भाऊ अजूनही झोपलेले होते. त्यांना जागे करणे शक्य नव्हते. सर्वात धाकटचा सीमेओनने रूपवान येलेनाला झारकडे नेण्याची तयारी केली. दोघेही रडत होती, विव्हळत होती, एकमेकांपासून दूर जाण्याची त्यांची इच्छा नव्हती. पण काय करणार? दिलेला शब्द पाळलाच पाहिजे.

दुष्ट सरदार सर्वांआधी झारकडे पळत गेला. झारच्या पायांवर लोटांगण घालीत म्हणाला:

"झार-बाप्पा, सर्वात धाकटा सीमेओन तुझ्याविरुद्ध दुष्ट कारस्थान रचतोय, तुला ठार मारायचा त्याचा बेत आहे, राजकन्येचं हरण करण्याचा त्याचा इरादा आहे. त्याचा वध करायची आज्ञा दे!"

सीमेओन राजकन्येसह झारकडे येताच झारने राजकन्येला आदरपूर्वक राजवाडयात नेले आणि सीमेओनला तुरुंगात टाकण्याची आज्ञा केली. धाकटा सीमेओन ओरडला:

"माझ्या बंधूंनो, अरे सहा सीमेओन बंधूंनो, तुमच्या धाकटयाला मदत करा!"

त्याचे सहा भाऊ गाढ झोपलेले! त्यांना जागे करणे अशक्य!

धाकटया सीमेओनला तुरुंगात टाकण्यात आले. त्याला लोखंडी साखळ-दंडांनी बांधण्यात आले.

भल्या सकाळी धाकटचा सीमेओनला वधस्थळी आणण्यात आले. राजकन्या रडत होती, तिचे अश्रू मोत्यांप्रमाणे ओघळत होते. दुष्ट सरदार मात्र हसत होता.

धाकटा सीमेओन म्हणाला:

"हे निष्ठुर झार, जुन्या रूढीप्रमाणं तू माझी मृत्यूपूर्वीची शेवटची इच्छा पूर्ण कर. मला अखेरच्या वेळी शिंग वाजवायची परवानगी दे."

दुष्ट सरदार मोठ्यांदा ओरडला:

"नको देऊ, झार-बाप्पा, नको देऊ!"

झार म्हणाला:

"पूर्वजांच्या रूढी मोडणार नाही. वाजव, सीमेओन, लौकर वाजव, कारण माझे मारेकरी केव्हाचे तिष्ठत आहेत, त्यांच्या धारदार तलवारी उशीरामुळं बोथट बनत आहेत."

धाकट्याने भोजाचे शिंग वाजवायला आरंभ केला.

डोंगर ओलांडून, दऱ्या ओलांडून त्या शिंगाचा आवाज गलबतापर्यंत पोहोचला. मोठ्या भावांच्या कानी तो आवाज पडला. ते जागे झाले, दचकून म्हणाले:

"म्हणजे आमचा सर्वात धाकटा भाऊ संकटात आहे!"

झारच्या राजवाड्याच्या पटांगणात ते धावत आले. मारेकऱ्यांनी धारदार तलवारी उपसल्या होत्या, सीमेओनचे मुंडके उडवायच्या बेतात ते होते, पण तेवढ्यात अचानक सहा सीमेओन बंधू तेथे अवतरले! सीमेओनखगोल-शास्त्रज्ञ, सीमेओन-टेहळ्या, सीमेओन-शेतकरी, सीमेओन-दर्यावर्दी, सीमेओन-धनुर्धारी, सीमेओन-लोहार.

म्हाताऱ्या झारवर चालून जात ते धमकावीत म्हणाले:

"आमच्या धाकट्या भावाला मुक्त कर आणि त्याला रूपवान येलेना दे!"

घाबरलेला झार म्हणाला:

"घ्या तुमचा धाकटा भाऊ आणि राजकन्येलाही देऊन टाकतो. मला नाही तरी ती आवडली नाहीच, लौकर घ्या तिला तुमच्या ताब्यात."

मोठ्या धुमधडाक्याने धाकट्या सीमेओनचे व राजकन्या येलेनाचे लग्न झाले. जंगी मेजवान्या झडल्या, नाच-गाण्यांचा जल्लोष झाला. मग धाकट्या सीमेओनने स्वतःचे शिंग घेतले व नाचाचे संगीत तो वाजवू लागला.

झार नाचतोय, राजकन्या नाचतेय, उमराव नाचताहेत, उमरावांच्या बायकाही नाचताहेत. तबेल्यांमधले घोडे नाचू लागले, गोठ्यांमधल्या गायी ताल धरू लागल्या. कोंबडे आणि कोंबड्या बागडू लागल्या.

सर्वांपेक्षा जास्त जोराने सरदार नाचत होता. तो एवढा नाचला एवढा नाचला, की शेवटी खाली जमिनीवर कोसळला आणि त्याचे प्राण कुडीमधून निघून गेले.

लग्नाचा सोहळा संपला, सगळे आपापल्या कामाला लागले. सीमेओन सुतार घरे बांधू लागला; सीमेओन-शेतकरी गहू पिकवू लागला; सीमेओन दर्यावर्दी समुद्रसंचाराला गेला; सीमेओन-खगोलशास्त्रज्ञ तारे मोजू लागला; सीमेओन-धनुर्धारी रूसचे रक्षण करू लागला... रूस मायभूमी सर्वांना भरपूर काम देत होती.

धाकटा सीमेओन गाणी गातो, शिंग वाजवतो, सर्वांच्या मनाला आनंद देतो, काम करायला मदत करतो.

माननीय वाचक !

प्रस्तुत पुस्तकाबाबतची आपली मते आणि सूचना जाणून घेण्यास आम्हाला आनंद वाटेल.

रशियन आणि सोविएत साहित्याचे तुमच्या मातृभाषेतील अनुवाद आमच्या लोकांच्या संस्कृतीची व जीवनाची सखोल ओळख करून घेण्यास आपल्याला मदत करतील, अशी आशा आहे. आमचा पत्ता : 'रादुगा' प्रकाशन, १७ झूबोवस्की बुलवार, मॉस्को, ११०२१, सोविएत संघ.